

REFBK-0007006

ठा. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. नं.



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नालय शाखा

# वीरांच्या भेटी

: लेखक :

जगप्रवेशचंद्र

: अनुवादक :

का. म. ताम्हनकर

REFBK-0007006

सोल एजंटस:-

प्रसन्न प्रकाशन

बागवे निवास

टिळक रोड, दादर

-: प्रकाशक :-
का. म. ताम्हनकर, बी. ए.
२३९ गिरगांव रोड,
मुंबई ४

खास प्रकाशन-परवाना नं. पी. सी. १४६३-१९४७-४८

-: मुद्रक :-
शांताराम नारायण सापळे
नवयुग प्रिंटिंग प्रेस,
पोर्तुगीज चर्च स्ट्रीट,
दादर-मुंबई नं. १४

# पुरस्कार

"मीट् दि हीरोज" ह्या इंग्रजी पुस्तकाचा हा मराठी अनुवाद. भाषांतर करण्याचे कार्य कमी दर्जाचें किंवा सोपें आहे असें नाहीं. मूळ भाषेचें सौंदर्य कायम ठेऊन सुगम अनुवाद करणें महत्त्वाचें आहे.

लाल किल्ल्यांत बंदीवासांत असतांना, आझाद हिंद सेनेंतील ज्या तीन अधिकाऱ्यांचे खटले बरेंच दिवस गाजले त्या कर्नल धिल्लन, क. सेहगल, मे. ज. शहानवाज् यांच्या सुटके नंतर, त्यांच्या घेतलेल्या मुलाखती, त्यांनीं काढलेले उद्गार, आणि त्यांच्या व्यक्तित्वाचा लेखकाच्या मनावर झालेला परिणाम, याचें वास्तव चित्र लेखकानें रेखाटलें आहे. आझादहिंद सेनाधिकाऱ्यांबद्दल जनतेच्या भावना कशा होत्या याचें स्पष्ट दर्शन हें पुस्तक वाचतांना झाल्याशिवाय राहात नाहीं. दिलखुलास लिखाण आणि खिलाडुवृत्ती यांचा गोड संगम प्रस्तुत पुस्तकांत आढळेल. अनुवादकानें अनुवादांत मूळ पुस्तकाचें हें स्वरूप कायम ठेवलें आहे.

आझाद हिंद सेनेचें कार्य करीत असतांना ज्या स्वदेशाभिमानी अधिकाऱ्यांनीं आत्मयज्ञ केला अशांच्या आठवणी विचारून घेऊन, त्या जर लिहिल्या असत्या तर तें योग्य झालें असतें. जिवंत माणसांच्या गुणगौरवाबरोबरच मृतांची आठवण स्फूर्तिदायक असते.

प्रस्तुत पुस्तकांतील कांहीं विधानें चुकीचीं व गैरसमज करणारीं आहेत. मुलाखतींतून प्रतिबिंबित होणारी आत्मस्तुतीहि मला पसंत नाहीं.

आझाद हिंद फौज आणि तिचें कार्य ह्याबद्दल हिंदुस्थानांतील चाळीस कोटी लोकांना माहिती व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. ज्या ज्या भाषांतून अशा प्रकारची माहिती देणारी पुस्तकें तयार होतील, त्या त्या भाषांतील चांगल्या पुस्तकांची निवड करून व प्रचलित भाषेंत भाषांतर करून आझाद हिंद फौजेच्या थोर परंपरेचें लोण बहुजनसमाजाच्या खालच्या थरापर्यंत पोंचविलें पाहिजे. हें श्रेय घेणाऱ्या लेखकांना, भाषांतर कर्त्यांना आणि प्रकाशकांना आमचे धन्यवाद !

महाराष्ट्रीय वाचकवर्ग ह्या पुस्तकाचें स्वागत करील अशी आशा आहे.

मुंबई
९-४-४७

**जगन्नाथराव भोसले**
ज. कमांडर आझाद हिंद फौज

# अनुवादकाचे चार शब्द

प्रस्तुत मूळ इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद करण्याची संधि पत्रपंडित श्रीयुत श्री. रा. टिकेकर यांनीं दिल्याबद्दल त्यांचा व मूळ ग्रंथकारांनीं तसा त्यांना अधिकार दिल्याबद्दल त्यांचाहि मी उपकृत आहे. एका विशिष्ट काळांत हें काम मिळालें व मनाच्या विरंगुळयास फार उपकारक ठरलें. पत्रवाङ्मय–व्यवसायांत ख्यातनाम झालेले श्रीयुत विठ्ठलराव बागवे यांनीं आपल्या प्रसन्न प्रकाशनाच्या प्रारंभासाठीं या अनुवादित पुस्तकाची त्वरेने निवड केली म्हणून हे अनुवादाचे काम १९४६ च्या मे महिन्याचे आंतच पुरे झालें व मुद्राणालयासाठीं तयार झालें. पण आजकाल मुद्रणालयांचा व्यवहार म्हणजे प्रायः ' कुंभकर्णाच्या जांभई ' सारखा झाला असल्यामुळें, प्रत्यक्ष प्रकाशांत येण्यासाठीं या ग्रंथाला सव्वा वर्षावर दीर्घ कालावधि लागला आहे !

आझाद हिंद फौजेविषयीं माहिती मिळण्यास आतुर झालेल्या बहुसंख्य वाचकांच्या दृष्टीनें प्रस्तुतचें पुस्तक उपयुक्त असल्याचा निर्देश ज. जगन्नाथराव भोसले यांनीं या पुस्तकासाठीं लिहिलेल्या छोट्या पुरस्कारांत केलाच आहे. नेताजी सुभाष बोस यांच्या खेरीज आझाद हिंद फौजेविषयीं अधिकारानें बोलण्याइतके महत्त्व, जनरल जगन्नाथराव भोसले यांच्याइतकें इतर कोणालाहि नाहीं, याची जाणीव नुकताच रजपतपटावर दाखविलेला ' चलो दिल्ली ' बोलपट पाहून प्रत्येकाला आतां होण्यासारखी आहे. म्हणूनच या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचा पुरस्कार करण्याची आम्ही त्यांना गळ घातली; या पुस्तकांतील कांहीं भाग व विधानें यांच्याशीं सहमत नसतांहि, ज. जगन्नाथराव भोसले यांनीं आपल्या सहजस्वभावी औदार्यामुळें छोटासा पुरस्कार या पुस्तकासाठीं दिला, याबद्दल आम्ही त्यांना धन्यवाद देतों.

वास्तविक ज. जगन्नाथराव भोसले व नेताजींच्या आझाद हिंद–फौजेंतील हजारों मराठा वीर यांच्याबद्दल वाचकांना असावी तितकी व तशी माहिती अद्याप प्रकाशांतच आलेली नाहीं. कोणी तरी लेखक व प्रकाशक हें महत्त्वाचें

कार्य हातीं घेऊन ज. जगन्नाथराव यांच्या नेतृत्वानें आणि सहकार्यानें तें पुरें करतील अशी मला मजबूत आशा आहे. दुर्दैवानें 'प्रसिद्धीवांचून प्रतिष्ठा नाहीं' हें आजच्या जमान्याचें वर्म असल्यामुळें मराठी लेखक–प्रकाशकांनीं तें ओळखून महाराष्ट्राच्या व हिंदुस्थानच्याहि 'भावी राष्ट्रीय फौजेंतील' या महा घटकांची योग्य ती सेवा प्रकाशन–साधनांनीं केली पाहिजे. 'प्रसन्न प्रकाशन' संस्था यांतील मोठा वांटा उचलील अशीहि मी आशा नमूद करून ठेवतों.

अखेर प्रसन्न प्रकाशनचे चालक श्री. बागवे, श्री. टिकेकर, ग्रंथकार व ज. जगन्नाथराव भोसले यांचे फिरून एकवार आभार मानून मराठी वाचकांना हा अनुवाद सादर करतों.

२३९ गिरगांवरोड
प्राविण्य कचेरी मुंबई ४
ता. १–७–४७

का. म. ताम्हनकर

E4454
60005
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# भाग १ ला

## आम्ही मोहिमेवर निघालों !

ता. ९ जानेवारी रोजीं माझी व मनमोहनची व्होल्यामध्यें भेट झाली. हात पुढें करून मी त्याच्याशीं हस्तांदोलन करण्यास पुढें झालों तेव्हां मला थोडासा धक्काच बसला ! कारण मनमोहनचा सदा हंसतमुख चेहरा किंचित् म्लान झालेला दिसला. त्याच्या गालावर आनंदाची व उत्साहाची लाली दिसली नाहीं. कांहीं तरी दुःखद आठवणींची कृष्ण–छाया त्याच्या चेहऱ्यावर पसरली असावी, असा मी अंदाज केला.

मनमोहननें हात पुढें करून विषण्ण मनानें माझ्याशीं हस्तांदोलन केलें. 'कारे, काय झालं ? कांहीं बिनसलय कीं काय ?' मी विचारलें.

मनमोहननें माझ्या हातांतील हात सोडवून घेऊन माझ्या खांद्यावर ठेवला, अन् स्वारी हळु हळूं बोलूं लागली. " काय समजलास, काल मी जो प्रसंग पाहिला तितका हृदयस्पर्शी प्रसंग माझ्या उभ्या आयुष्यांत कधीं मी पाहिला नाहीं. अजूनहि तो नाट्यपूर्ण देखावा जणु माझ्या डोळ्यासमोरच दिसतोय ! डोळे वर करून पहावें तों तोच चित्रपट डोळ्यांपुढून सरकतो आहे, असा भास होतो; तें दृश्य डोळ्यांपुढून कांहीं केल्या हालतच नाहीं. "

थोडासा घसा साफ करून मनमोहन, आपल्या घोगऱ्या गंभीर आवाजांत पुढें बोलण्याचा प्रयत्न करीत होता. या महत्त्वपूर्ण प्रसंगाच्या प्रस्तावनेला कशी छान सुरवात करावी, यासाठीं त्याची चुळबूळ चाल-

लेली दिसली. या गंभीर प्रसंगाचें सुंदर वर्णन ऐकण्यास मीहि उत्सुक व आतुर होतोच; म्हणून त्याच्या ओठांतून बाहेर पडणारे शब्द ऐकण्यासाठीं मीहि पुतळ्याप्रमाणें स्तब्ध राहिलों. एखाद्या वात्रट पोरानें फुलपांखराला पेटींत कोंडलें कीं, त्याच्या पंखांची उघडझांप होतें, तशी मनमोहनच्या ओठांची अस्फुट उघडझांप होत होती ! अखेर त्याचे पुढील शब्द माझ्या कानावर उमटले:—

"परवां मी आर. बी. बद्रिदासजींच्या बंगल्यावर गेलों होतों. तुला माहीतच आहे कीं, शहानवाझ, धिलॉन आणि सैगल शरद् बोसना भेटण्यासाठीं तिकडेच गेले होते. शहानवाझ शरद्बाबूंना कडकडून भेटले त्यावेळीं, त्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा सुरूं होत्या. श्रीराम—भरत भेटीप्रमाणें ते इतका वेळ एकमेकांच्या बाहु-पाशांत होते कीं, दोघे एकजीव झाल्याचाच मला भास झाला ! मी सभोंवार नजर फिरविली त्या वेळीं दोघांच्या आसपास असलेल्या सर्वांचेच डोळे ओलावलेले मला दिसले. याचा परिणाम माझ्यावरहि झाल्यावांचून। राहिला नाहीं. मी ओठ आंवळले, मान थोडी बाजूला वळविली; पण इतकेंहि करून माझ्या हृदयांतील भावनांची भरती मला आंवरतां आली नाहीं. अखेर त्या गर्दींतून मी कसाबसा बाहेर पडलों आणि भावनांचा पूर माझ्या डोळ्यांवाटे बाहेर लोटला ! तुला नवल वाटेल, पांच मिनिटें मी स्फुंदस्फुंदून रडलों !"

होय, पांच मिनिटें ओक्साबोक्शी रडलों ! पांच मिनिटें असें रडण्याचें सुख कोणी कोणी अनुभवलें आहे ? वेळाच्या हिशोबानें पांच मिनिटें क्षुल्लक असतील; परंतु रडूं लागलात कीं तींच पांच

मिनिटें तुम्हांला युगासारखीं वाटतील ! हा प्रत्यक्ष अनुभव आहे, प्रत्येकानं तो घेऊन पहावा. मी पुष्कळदां असा रडलों हें कबूल करण्यास मला तरी लाज वाटत नाहीं. पण या वर्णनानें आतां ही कथा लांबवीत नाहीं. व्यक्तिगत अनुभवाचे हे प्रसंग नाजूक तसेच पवित्र असतात. चेहेऱ्यावरील मळ जसा साबणानें साफ होतो, तसाच जीवात्म्याला बोंचणारा भावनांचा केरकचरा अश्रुपूरानें धुवून निघतो ! ”

होय, म्हणूनच शरद्‌बाबू व शहानवाझ यांच्या त्या भावनोद्रेकाचें मूल्य मला समजतें. “ ह्या उभयतांनीं नजरेला नजर भिडविलीं त्या वेळीं सुभाषबाबूंच्या गतेतिहासाचा मूर्तिमंत चित्रपटच त्यांच्या नजरेपुढें उभा झाला असल्यास नवल नाहीं ” असे उद्‌गार माझ्या तोंडून बाहेर पडले !

वरील शद्ब ऐकून मनमोहनच्या डोळ्यांत अकस्मात्‌ विजेचें तेज चमकलें ! या तेजांत कांहीं तरी नव्या कल्पनेची चमक मला दिसली.

“ गड्या, आझाद हिंद फौजेंतील या अघाडीवरील त्रिमूर्तीवर एक ग्रंथच लिहिला तर कसें ? ” मनमोहननें उत्साहभरांत मला विचारलें.

‘ आझाद–वीरांचा ’ आणि ‘ ग्रंथ ’ या दोन शद्बांनीं मलाहि भारून टाकलें. ‘ भले शाबास ’ अशी गर्जना सहजगत्या माझ्या तोंडून बाहेर पडली !

कारण उघडच आहे.

खमंग अन्न चाखण्याची आवड जशी मला आहे, तशीच पुस्तकेंहि लिहिण्याची हौस आहे. प्रियतमेची कल्पना जशी मला

ब्रह्मानंदांत नेऊन सोडते, तसाच 'वीरकथा' हा शब्द माझ्या नसानसांना विजाळून सोडतो ! ही कल्पना गंभीर आहे हें विसरूं नका. 'वीर' आणि 'प्रियतमा' या शब्दांची सांगड मी घातली असली तरी, ती भावनांच्या उत्कटपणाचे दृष्टीनें घातली असून ही उत्कट भावना गंभीर व प्रामाणिक आहे. राष्ट्रवीरांच्या 'वीर–कथा' गाऊनच माझ्यासारख्या एकांड्या शिलेदाराला विभूति–पूजेचे समाधान मिळवावयाचें आहे.

वाचकांचें या वीरांचा परिचय करून घेण्याचें औत्सुक्य विलक्षण वाढलें असेल, हें जाणून माझ्या वैयक्तिक भावनांचें वर्णन आतां आवरतें घेतो.

वाचक बंधूहो, चला तर, बसा या माझ्या छोट्या ऑस्टिन गाडींत. गाडी चालू करण्यास हातभार लावालच तुम्ही !

ठीक ठीक. फरर् फरर्......झाली गाडी चालू ! न्यायमूर्ति ना. अच्रुराम यांच्या बंगल्याकडे, नं २ गोल्फ रोडनें, आपण आतां चाललों आहों.

* * *

( २ )

कायहो, तीर लागलेल्या पक्षाप्रमाणें किंचाळलेतसे ? काय गाडी जरा दमानें चालवूं म्हणतां ? बरं बरं. रस्त्यावरून संथ जाणाऱ्या माणसांच्या प्रवाहांतून मोटारबोटीप्रमाणें आमची ऑस्टिन रस्ता कांपीत चालली. इतक्यांत रस्त्यावरील नाक्यावर एका पोलिसानें उजवा हात गाडीपुढें धरल्याबरोबर, गाडींतील रथीचा चेहेरा उतरला व त्यानें गाडीला ब्रेक लावण्यास मला विनविलें.

'मित्रा माझ्या गाडीला आहेत कुठं ब्रेक?' मी हळुंच वाचक मित्राच्या कानांत कुजबुजलों!

'काय म्हणतां? ब्रेक ना ..? असं म्हणून माझ्या मित्रानें कांपऱ्या हातांनीं तोंड झांकून घेतलें. इतक्यांत माझी गाडी जवळ जवळ गाडी अडविणाऱ्या पोलिसाच्या पाठीशींच थडकली! पण त्या 'गणेश टेबलानें' प्रसंगावधान साधून, एकदम् पवित्रा बदलला. बुटांचा 'करकट्' आवाज होऊन 'दाहिनी रुक्' झालें; आणि आमची ऑस्टिन् केंव्हांच पुढें सरकून आपला रस्ता कापीत चालली!

माझा उतारू हा प्रकार डोळ्यावर झांकलेल्या हाताच्या पोकळींतून पहात होता. हाडें न मोडतां किंवा डोकें रक्तबंबाळ न होतां, वायुवेगानें आपण पुढें सटकलेले पाहून, त्यानें समाधानाचा हायसा सुस्कारा सोडला!

'कसं काय बाबा जमलं हें?' माझ्या मित्रानें जरा जिवांत जीव आल्यावर हळुंच विचारलें!

दोस्त वाचस्पती, हे पोलीस मोठे चाणाक्ष असतात. भयंकर 'घरघर' करीत–एखादी गाडी अंगाशीं भिडली कीं, ते ओळखतात कीं, या बेट्याच्या गाडीला ब्रेक नाहींत! मग ते शिस्तीपेक्षां स्वतःच्या प्राणांचीच कदर जास्त करतात; अन् 'पहिला आला पहिल्यानें सोडला' हा न्याय लावून शिस्तीची व स्वतःच्या प्राणांची बाजू ते राखतात! कां? आहे कीं नाहीं आपला रस्ता सीधा व सोपा!

‘ पण... ’

‘ पण—बिणला जीवनांत जागाच नाहीं मित्रा, मी वाचस्पतींना मध्येंच थांबवून माझेंच घोडें पुढें दामटींत म्हटलें, “ आपण असल्या ‘ पणाना ’ वाजवीपेक्षां जास्त महत्त्व दिलें कीं, निराशेच्या चिखलांत रुतलोंच ! ‘ जर व जरी तरी ’ हे निराशावाद्यांचे खेळ होत; आणि असले ‘ जरतारी ’ लोकच ‘ हिशेबी ’ म्हणून स्वतःची प्रौढी मिरवीत असतात ! ”

या जगांत कोणतेंहि कार्य करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे तें कार्य करावयास लागणें हाच होय. कोठेंहि जावयाचें असलें तर त्या दिशेनें तडक रस्ता धरा. मग आपलें पोंचावयाचें ठिकाण गार हिरवळीचें, आशावादाचें व आनंदाचें असो, किंवा निराशेचा वा असमाधानाचा तो खंदक असो !

माझी ही शहाणपणाची, वा मूर्खपणाची, बडबड ऐकून वाचस्पति आपल्या जागीं हुषारीनें बसले आणि विजयी उत्साहानें मांडीवर थाप मारून म्हणाले “ राव, आमच्याहि तारुण्यांत आम्ही खूप पराक्रम केलेत बरं कां ! ”

“ वा ! मग फारच छान ! आमच्या शूर वीरांच्या भेटीस जातांना आम्हांला खरोखर उमदा दोस्तच लाभला म्हणायचा ! या वीरांची भेट कोठें आणि कशी होईल, याची आपल्याला कल्पना नाहीं. तेव्हां अशा अनिश्चित प्रवासाच्या धाडसांत तुमची दोस्ती बरीच

उपयोगी ठरेल, यांत शंका नाहीं" असें म्हणून मी वाचस्पती-दोस्ताची पाठ थोपटली !

*　　　*　　　*

## ( ३ )

नितांतसुंदर अशा लॉरेन्स बागेला वळण घेऊन माझी ऑस्टिन गाडी पुढें झटकली तेव्हां, मी तिचा वेग थोडासा कमी केला.

'कां हो, आतां कशाला हा संथ सौम्यपणा ?' वाचस्पतींनीं मला टोमणा दिलाच !

मी उत्तरलों:—"वा दोस्त, आंतल्या सुंदर बागेकडे तर पहा ! हिवाळ्यानं त्या झाडांची काय दशा केलीय पाहीलीत कां ? तीं पानं परस्परांच्या कानांत काय कुजबुजतात तें एकलंत ? पानं म्हणतात "या मातकट जीवनाचे अखेरचे दिवस आपण झटपट् साजरे करून घेऊंया. कारण उद्यां आपण खालीं कोसळणार आणि निर्जीव ठरणार ! मग माळी येऊन एका खाड्यांत आम्हांला गाडील अन् खुशाल खतासाठीं कुजवील" !

मी पुढें म्हणालों "अन् दुःखावेगानें सळसळणारा वारा काय बोलतोय तेंहि ऐका ! या वेळीं या झाडांना झपाट्यानें झोंबावयाचें नाहीं ! कां ? आपल्या नंगेपणाची अब्रू झांकण्यासाठीं वाळलेल्या पानाचीं जीं कषाय-वस्त्रें या वृक्ष-गोसाव्यांनीं आपापल्या अंगाभोंवतीं लपेटलीं आहेत, तीं झपाट्यानें उडवून लावून, या झाडांची अब्रू उघडी

करण्याचें पाप आपण कशाला पत्करा, असा या संथ वाऱ्याच्या बोलीचा सूर, मित्रा, तुला नाहीं समजला ? ”

माझी ऑस्टिन एका फाटकानें बागेंतच शिरली. झाडाच्या फांद्यावर आसन्नमरण झालेल्या पानांचा आम्हांला अखेरचा निरोप घ्यावयाचा होता ! कां ?

बागेंत इतस्ततः विखुरलेलीं तीं वाळकीं पानें ! पण ‘ डबी बझार ’ मध्यें मांड्या ठोकून निर्वाणपद प्राप्त झाल्याप्रमाणें बसलेल्या त्या लालांच्या बगळे–कंपू पेक्षां, त्या वाळक्या निःसत्त्व पाचोळ्या-मध्यें देखील मला जास्त ‘ सत्व ’ दिसलें ! हिंदुधर्माच्या या निर्लज्ज प्रतीकांशीं, हिंदुधर्माच्या भवितव्याविषयीं चर्चा करण्यापेक्षां, माझ्या मेजावर विखुरलेल्या फुलांच्या निर्माल्याशींच असली चर्चा करणें मी पत्करीन ! कोठें तो श्रीकृष्णाचा, श्रीरामचंद्राचा अन् सीतामाईचा धर्म, अन् कोठें या लाल्यांचा नरक !

ॲटम् बॉंबनें जळून खाक झालेल्या त्या हिरोशिमा शहरांत म्हणे, अजून देखील ‘ रेडिओ ॲक्टिव्ह लहरी ’ धुमाकूळ माजवीत आहेत ! काळ्या बाजारी मांसानें तुस्त झालेल्या या लाल्यांच्या तुंदिल दोंदांत त्या सर्व दाहक–रेडिओ लहरी, कां बरें घुसत नाहींत ?

*　　*　　*

# भाग २ रा
## प्रेम सैगलची भेट.

आमचें त्या बंगल्यावर ' जय हिंद ' म्हणून एका चपराशानें स्वागत केलें ! त्याचा पोषाख चेरी रंगाच्या कापडाचा होता; कंबरे-भोंवतीं सोनेरी रंगाचा रुंदच रुंद चकचकीत पितळी पट्टा होता.

चपराशाच्या ' जय हिंद ' स्वागताचें मला थोडेसें नवलच वाटलें. प्रेम सैगलच्या निवासस्थानीं ' जय हिंद ' चें नाद–निनाद घुमावे, हें माझ्या मतें स्वाभाविक होतें. सैगलच्या घराभोंवतीं ' जय हिंद ' च्या फलकांची गर्दी दिसती तर त्याचें मला आश्चर्य वाटलें नसतें. फार काय, त्याच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावरहि ' जय हिंद' च्या पताका फडकल्या असत्या तर, त्यांतहि नवल करण्यासारखें नव्हतें.

पण एक हायकोर्टाचा चपराशी माझें ' जय हिंद' नें स्वागत करील, ही मात्र माझी बिलकुल कल्पना नव्हती ! एकूण क्रांतीचीं चक्रें खूप जोरानें फिरूं लागलीं तर ? या अदृश्य राक्षसी चक्रांना जोराचा वेग देणें हें पुढाऱ्यांचेंच काम नव्हे कां, असेहि विचार माझ्या मनांत उभे राहिले !

नकळत माझें मस्तक मी त्या चपराशापुढें नमविलें आणि आनंदानें मीहि ' जय हिंद ' चा घोष केला. मी त्याच्याकडे नजर लावली तों, मला त्याचा चेहरा स्मित हास्यानें उजाळलेला दिसला !

एका चिठीवर माझें नांव लिहून ती चिठी प्रेम सैगलला देण्याला मी त्याला सांगितलें; पण एका स्वागत–समारंभाला ते गेले असल्याचें मला समजलें.

वाट पहाण्यात अर्थ नव्हता. कारण स्वारी परत अमुकच वेळेत येईल याचा काय नेम? म्हणून वाचस्पतीसह 'लोरॅंज' कडे चहापानासाठीं गेलो.

* * *

## ( २ )

लोरॅंज हॉटेलच्या पायऱ्या चढून आम्ही आंत जातों तों, तीन चुणचुणीत तरुणी व एक मध्यम वयाचा गृहस्थ आपल्या पाहुण्याची वाट पहात असल्याचें आम्हांला आढळून आलें. या मुलींना पाहुण्याच्या स्वागताचें इतकें औत्सुक्य व उत्साह दिसला कीं, असा 'भाग्यवान् पाहुणा' तरी कोण असावा, याबद्दलच्या कुतूहलानें माझ्या मनाची पकड घेतली! मुलींच्या शेजारीं एक वेताची परडी ताज्या सुंदर हारांनीं व गुच्छांनी भरली होती.

मला वाटलें सैगलच्या स्वागताचीच तर ही सामुग्री नसावी?

'हे लोक कोणाची बरं वाट पहाताहेत?' असें हॉटेलच्या एका नोकराला मी बाजूला बोलावून हळूंच विचारलें. 'हांजीं, जयहिंद सैगल' त्यानें सांगितलें!

कॅशर जवळच्या गर्दीतून वाट कापीत मी मुख्य दालनांत घुसलों आणि एका खुर्चीत अंग टाकून चहाची वर्दी दिली.

हॉटेलमधील गर्दीचा व गोंगाटाचा मला यावेळीं राग आला! कोण तो गोंगाट व गलबला! जणुं काय झू मधील माकडचेष्टाच!

एका कोपऱ्यांत लाहोरच्या ललना कांहींशा सभ्य संभाषणांत मग्न होत्या. दुसऱ्या एका कोपऱ्यांत कांहीं मुस्लिम लीगवाले ' कॉंग्रेसचा उदय व अधःपात ' यांचा पाकिस्तानी पुलावा करण्यांत दंग होते; मध्यभागांतील जागांवर कांहीं कम्युनिस्टांनीं पंजाब असेंब्लींतील किती जागा ' शास्त्रोक्त दृष्टिकोनाच्या संघटनेनें ' काबीज करतां येतील, याची ' साम्यवाद छापाची वाटाघाट ' चालविली होती !

तीन्ही कंपूंचा मिळून गलका इतका मोठा होता कीं, गव्हर्नरच्या बंगल्याचें छप्पर त्यानें खचित जमिनदोस्त झालें असतें ! माझी खात्री पटली कीं, पुढें मागें लाहोर शहर धुळीला मिळालेंच तर, एखाद्या धरणीकंपाला, किंवा लढाईच्या चढाईला, त्याचें श्रेय न मिळतां, समाजाच्या पुढारणी, मुस्लिम लीगवाले व कम्युनिस्ट, या त्रिदोषांना, एकत्र चहापार्टी देण्याच्या कोणाच्या तरी अत्याचारानेंच, लाहोरची धुळधाण अशी झालेली असेल !

मी चहा घाईघाईनें ढोसला अन् एक सिगारेट शिलगावली. ' तुमच्या चहापार्टींत आम्ही सामील होऊं कां, असें त्या हुषार मुलींनाच विचारलं तर ?' माझें विचारचक्र सुरू झालें !

वाचस्पति मित्रा, वीर दर्शनाच्या कृतनिश्चयाचें धाडस आपण पत्करलेंच आहे. अर्थात् औपचारिक अडचणींना आपण काय म्हणून थारा द्यावा ? म्हणून म्हणतो ' मित्रा वाचस्पति, सावकाश चहा संपीव, चॉकोलेट बिस्किटावर थोडा हात मार, तोंपर्यंत व्हरांड्यांत उभ्या असलेल्या त्या तरुणींशीं सैगलच्या स्वागतांतील भागीचें थोडे संधान जमवून येतों. '

नवी बाहुली घेऊन येणाऱ्या बाबांची वाट पहात उभ्या राहणाऱ्या छोकरीच्या उत्साहानें, सैगलची वाट पहात पायाच्या चौड्यांवर उभ्या असलेल्या त्या तीघींपैकीं एका तरुणीशी मी ' नमस्ते ' करून बोलण्याची संधि तावडतोब साधली. तिला यावेळीं प्रत्येक पळ महत्वाचें वाटत असल्याचें दिसलें. या ' आझाद वीरा ' विषयीं मला एक पुस्तक लिहावयाचें असल्यामुळें सैगलना भेटण्याला मीहि उत्सुक असल्याचें मी त्या तरुणीला सांगून टाकलें ! उत्तर काय मिळतें या शंकेनें माझी छाती धडधडत होती ! माझ्या आगंतुक सलगीचा या मुलीला राग तर नाहीं येणार !

" वा, वा, फारच छान ! आमच्या स्वागत मंडळांत तुम्हीं दाखल झाल्याचा आम्हांला आनंदच होईल " असें गोड व सुरेल उत्तर माझ्या कानीं पडलें !

' हा माझा मोठा सन्मानच समजतों ' असें मीहि मोठ्या विनयानें उत्तर दिलें !

परत आपल्या जागीं येऊन वाचस्पतींच्या खांद्याला स्पर्श करून मी म्हटलें " चला दोस्त, वीर–भेटीची संधी तर मिळणार ! चहाची व्यवस्था वर आहे, आपण आपल्या जागा तर धरून बसूं. "

× × × ×

[ ३ ]

चहापानाच्या जागीं एका कोचावर विशीच्या आंतबाहेरील वयाचे दोन तरुण बसले होते. अद्याप इतर कोणच त्या जागीं नसल्यामुळें, आम्ही परस्परांचा परिचय करून घेतला.

• जाड बाटोळा चष्मा वापरणाऱ्या तरुणाचें नांव सत्यप्रकाश आणि उजळ रंगाच्या दुसऱ्याचें नांव आतार महंमद. टोकिओंत आझाद हिंद सैन्यांत दाखलहोण्यासाठीं लष्करी शिक्षण घेण्याकरितां सुभाष बाबूंनीं पाठविलेल्या ४५ तरुणांपैकीं हे दोघे, असें आम्हांला समजलें.

आम्ही जाग्यावर बसून या दोन तरुणांशीं गप्पा सुरूं केल्याला पांच मिनिटें झालीं नाहींत तोंच, जिन्यावरून जलदीनें वर येणाऱ्यांची पावलें वाजूं लागलीं. मिस ' अ ' धापा टाकीतच वर येऊन बोलली " आले बरं कां ? आलेच ते ! "

येणाऱ्या व्यक्तीवर नजर खिळवून आम्हीहि औत्सुक्यानें उभे राहिलों. थोड्याच क्षणांनीं प्रेम सैगलची आतां खचित भेट होणार !

थोड्याच क्षणांत एक उंचा पुराव देखणा तरुण वीर आमच्यापुढें उभा राहिला ! आपादमस्तक स्वच्छता हा या पुरुषाचा विशेष दिसला. अंगांत पांढरा शुभ्र शर्ट, त्याच्या खिशांतून डोकावणारा तकतकीत हातरुमाल, सुव्यवस्थित टाप टिपीची ती तुमान्, छातीला शोभा आणणारा तो टाय, तोंड पहावं इतके पॉलिशनें चकचकीत झालेले बूट, असा प्रेम सैगलच्या साध्या पोषाखाच्या स्वच्छतेचा थाट होता. एखाद्या सर्जननें त्याला ऑपरेशन--थिएटर मध्ये खुशाल प्रवेश--परवाना दिला असता !

सखोल गंभीर आवाजांत सर्वांनीं ' जयहिंद ' ची घनघोर गर्जना केली.

ह्या तीन मुलींचा हर्ष तर गगनांत मावेनासा दिसला ! विजयाचा अभिमानाचा व हर्षातिरेकाचा तो प्रसंग त्यांना वाटला ! आणि खरंच

त्यांना तसा अभिमान तरी कां वाटूं नये? आजकाल अभिमान वाटण्याजोगाच प्रसंग त्यांनीं साधला नव्हता काय?

लाखों लोकांना प्यार झालेला प्रेम सैगल आज त्यांचा पाहुणा बनला होता. आझाद हिंद फौजेचा एक शूर वीर आज या मुलींना मन मोकळे पणानें गप्पा मारण्यास लाभला होता! त्यागाचें प्रतीक बनलेला हा धैर्याचा मेरू आज त्यांच्या संगती बसून चहा पिणार होता!

× × ×

[ ४ ]

स्त्री–स्वभावाची मार्मिक गुरुकिल्ली तिच्या चेहऱ्यांत आणि पुरुष स्वभावाची मार्मिक गुरुकिल्ली ह्यांच्या आवाजांत सांपडते, म्हणतात. तुसड व हीन मनोवृत्तीच्या जनानीं ओठाना दयाळूपणाचें वळण कोणतेंहि कॉसमेटिक अगर मुख–रंग देऊंच शकत नाहीं. स्वतःच्या बोलण्यावर श्रद्धा नसलेल्या माणसाच्या आवाजाला कोणतीहि ऐतिहासिक नाटकी शक्कल खरेपणाची ‘ झार ’ कशी देणार!

या चहापान समारंभांत वरील दोन तत्त्वांना महत्व आहे, म्हणूनच मी त्यांचा मुद्दाम उल्लेख केला आहे.

हा आमच्या समोर बसलेला वीरच पहा. स्वतः बोलत असलेल्या प्रत्येक शब्दाच्या खरेपणावर आणि परिणामकतेवर त्याची नितांत श्रद्धा असल्यामुळें, त्याचा आपल्या कानांवर पडणारा आवाज कसा बरं स्वच्छ आणि मेघगर्जनेसारखा घवघवीत आहे! बोलत असतांच्या

त्याच्या भावनेचें वर्णन ' श्रद्धेची मूर्तीमंत मूस ' या वांचून दुसऱ्या कोणत्या शब्दांनीं करतां येईल ?

आतां त्या वीरा भोंवतीं बसलेल्या त्या तीन तरुणी पहा. इतक्या गोड व सुंदर मुली कुठं दिसल्या कां तुम्हांला ? मला तरी नाहीं दिसल्या ! ' मेक अप् ' कां काय म्हणतात, तसल्या भानगडींचा स्पर्शहि या मुलींच्या स्वच्छ व सुंदर मुख–कमलांना झालेला दिसत नाहीं ! त्यांच्या त्या कोंवळ्या ओंठांना ती जळकी ओठ–कांडी लागती तर त्यांची ती निसर्ग–सुंदर अरुणोदयाची लाली केव्हांच नष्ट झाली असती ! अशी सहज सुंदर माणसेंच प्रामाणिक असतात नाहीं ?

सुंदर सात्विक स्वभावाच्या या मुलींनीं माझ्या मनावर इतका परिणाम केला आहे की, त्यांचें वर्णन केल्यावाचून मला पुढील कथेकडे वळताच येत नाहीं ! रंगीत शाईनें लिहावं अन् सोनेरी अवतरणं त्यांच्या शब्दा भोंवतीं चितारावीं, असं मला वाटूं लागलय ! बोलपटांच गद्य–पद्य मला लिहितां येईल कां ? छे, भलतंच !

मिस् अ म्हणजे मूर्तिमंत उषाच ! सात्विक शांत स्वभाव पण तजेलदार अन् विनयशील उषा लाजरी अन् विनयवति कां असते ? पहाटे उठूनच अनुभव घ्या; म्हणजे उषेचा तो विनयशील रेशमी बुरखाच तुम्हाला पूर्वेला दिसेल ! उषेच्या इतर सात्विक गुणांचं वर्णन केलंच कां पाहिजे ?

मिस् बी म्हणजे मध्यान्हीची सूर्यप्रभाच ! दिपवून टाकणारी, उत्साह–प्रेरक अन् खुल्या दिलाची ! सूर्यप्रभा जसा कोपरान् कोपरा

उजाळून टाकते, तशी या प्रभेनेंहि आम्हीं सर्वांचीं हृदयें उजाळून टाकलीं होतीं !

अन् मिस सी म्हणजे मूर्तिमंत संध्याच ! थोडीशी काळी सावळी, विचारमग्न, एकांतप्रिय, पण सुहृदांचें सांत्वन करणारी अशी ती आहे. शंकाच असेल तर, सूर्यास्ताचे वेळीं फिरावयास जाऊन या गुणांची ओळख करून घ्या.

आपल्या या त्रिगुण स्वभावाप्रमाणेंच चहापानाच्या ह्या समारंभांत या मुलींनीं आपापल्या भूमिका कशा वठविल्या असतील, याची कल्पना आतां वाचकांना येईल.

× × ×

[ ५ ]

लाल किल्ल्यांतून सुटका झाल्या पासून प्रेम सैगलला सभा मागून सभा गाजवाव्या लागल्या हें सर्वांना माहीतच आहे. सभांत बोल-बोलून त्यांचा आवाज बसला होता. शरीरानें अगदी घोटीव आणि हालचालींत कमालीचा रेखीव असल्यामुळें, या पार्श्वभूमीवरील प्रेम सैगलचा बसका आवाज फारच बेडौल वाटत होता. निसर्गतः एखादी तरुणी रतीच्या पुतळीसारखी रेखीव असावी, पण ओठच तेवढे नीग्रो-सारखे काळे अन् पुढें झुकलेले असावे, तसा प्रेमच्या बसक्या आवाजाचा सर्वांना प्रकार वाटावा, यांत नवल नाहीं !

“ आमच्या लोकांनीं पहिली गोष्ट कोणती करावयाची असल्यास आझाद हिंद फौजेतील सैनिकांचा चालू असलेला छळ थांबविला

पाहिजे. वास्तविक आम्हां लोकांविषयीं हिंदी जनतेला प्रेम तरी किती अलोट ! मी तर जनतेच्या प्रेमातिशयानें मरून चूर झालों आहे ! ही माझी डायरीच पहा ना ? तासातासाच्या स्वागत–समारंभांच्या टिपणींनीं नुसती खचून भरली आहे ! " सद्गदित अंतःकरणानें सैगल सांगत होता.

" नाहीं तर मेली माझी डायरी ! नव्या वर्षाला घेतल्यापासून स्वच्छ कोरीच आहे ! कोण बोलावयतंय . माझ्यासारखीला ? " मिस् संध्या सुस्कारा टाकून बोलली !

" तसं कांहीं वाईट वाटून घेऊं नका ! मी कॉलेजियन होतो तेव्हांचा माझाहि अनुभव तसाच आहे. जांभया देत तोंड वासून पडलेल्या माझ्या डायरीच्या पानांची कींव आली म्हणजे, कॉलेजचे किती तास चुकविले, याचीच मी तींत नोंद करीत असे " संध्याचें सांत्वन सैगलनें केलें !

आम्ही सर्वजण खो खो हंसूं लागलों ! पण आम्हांला हंसविणारा सैगल ?

त्याला जणुं हंसण्याची कलाच अवगत नसावी ! त्याच्या बोलण्यानं आम्ही हंसत होतो तर तो खोकतच सुटला होता !

हिंदुस्थानांतील थोर पुरुषांच्या फुफुसांत धूळ जाऊन बसत असावी, असा सर्वसाधारण सिद्धांत कोणी तरी ठोकून दिल्यास नवल नाहीं !

मिस् प्रभा म्हणजे पराक्रमाची मुकेली ! ' झांशी–राणी–पथकाच्या पराक्रमांची कांहीं तरी हकीगत सांगा ना ' तिनें प्रेम सैगलला प्रेरणा केली.

लगेच प्रेमाचा आवाज उंचावला अन् त्यानें उत्साहानें सुरवात केली—

" झांशी राणी-पथक हा आझाद-हिंद-फौजेचा लढाऊ घटक होता, हें मला शक्य तितकें स्पष्ट करून सांगितलें पाहिजे. हें पथक केवळ फसव्या प्रचारासाठीं होतें, अशा प्रकारची बाष्कळ बडबड बरीच माझ्या कानीं आल्यामुळें, मला या घटनेवर विशेष जोर देणें आवश्यक आहे. निदान या दीडशहाण्या थापाड्यांपेक्षां मला झांशी-राणी पथकाविषयीं जास्त माहिती आहे, येवढें तरी, कोणीहि कबूल केलेंच पाहिजे !

श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत सर्व वर्गाच्या भगिनींची झांशी-राणी पथकांत भरती झाली होती. वयाचे दृष्टीनें पाहिल्यास, या पथकांत विशीच्या आंतील तरुणी होत्या, तशा सहा सात मुलें झालेल्या पोक्त माताहि होत्या ! आपापल्या मुलांचें कल्याण अगर भवितव्य, यापेक्षां, सर्व देवतांना नेताजींचें स्वातंत्र्यध्येयच जास्त उदात्त व उज्ज्वल वाटत होतें. "

" एकदा एका पंजाबी पोक्त भगिनीनें मजकडे येऊन तक्रार केली कीं, माझ्या पतीला मी नेताजींचें ध्येय समजून सांगण्याची पराकाष्ठा आज कित्येक दिवस करत्ये आहे, पण राम शिवा गोविंदा ! दगडावर पाऊस पडावा तशी गत ! कांहीं केल्या त्यांचं मन कांहीं या बाजूला वळत नाहीं ! "

प्रेम सैगल पुढें बोलला, "या बाई तव्येतीनें जरा थकलेल्या आणि बऱ्याच वयस्क असल्यामुळें, झांशी-राणी पथकांत त्यांनीं दाखल होऊं

नये; कारण कामाचा ताण बराच पडतो अन् हालअपेष्टाहि बऱ्याच सोसाव्या लागतात, असा मी सल्ला दिला. पण छे! तुम्हांला खरं देखील वाटणार नाहीं! दुसरे दिवशींच एक रायफल खांद्यावर लटकावून अन् छाती फुगवून या बाईनीं झांशी–राणी पथकांत नांव दाखलहि केलें!"

"झाशी–राणी पथकांतील या महिलांना सर्व प्रकारचें लष्करी शिक्षण व आधुनिक लढाईचीं सर्व तंत्रें शिकविण्यांत आलीं होतीं"

आपल्याशींच विचार करीत असलेली हिशेबी मिस् संध्या यावर बोलली—

"अशा या झांशी–राणी पथकांतील स्त्रियाशीं सामना देण्याचा प्रसंग ब्रिटिश फोजेंतील हिंदी सैनिकांवर आल्यावर, कसं काय झालं असेल हो?"

तिच्याकडे पाहून स्मितपूर्वक प्रेम सैगलनें उत्तर दिलेः—

"ब्रिटिश तंत्रांतील हिंदी सैनिक झाले तरी, आपल्याच माता, भगिनी व कन्या, यांच्याशीं कसे बरे लढणार!"

इतक्यांत मिस् उषा हलकेंच उठली अन् प्रत्येकाच्या समोरील कपांत आपल्या हातांतील किटलींतून तिनें चहा ओतला. प्रेम आपली कथा पुढें चालविणार होता, पण मिस् प्रभानें त्याला बोटाच्या खुणेनें प्रेमळ बहिणीच्या अधिकारानें सुचविलें कीं, चहा गरम आहे तोंच घेतला पाहिजे. बसक्या घशाला शेकण्यास अन् आलेला, थकवा नाहींसा करण्यास, गरम चहाचीच गरज होती.

बिचाऱ्या प्रेमला हा प्रेमाचा हुकूम मानावाच लागला! मध्यान्हीची प्रभा कोणाला दिपविणार अन् नमविणार नाहीं?

मी तर चहाचे चांगले दोन कप वशाखालीं घातले ! या यजमान मुलींची भेट होण्याची फिरून खात्री नसल्यामुळें, त्यांचे आभार मानण्याची संधीहि, मी येथेंच नोंद करून, साधून घेतों !

*  *  *

## ( ६ )

चहापानानंतर बराच वेळ कोणीच बोललें नाहीं. मग मीच या आळीमिळीच्या सामसुमीला वाचा फोडली–

' नेताजी ही पदवी सुभाषबाबूंना कोणी दिली–? '

प्रेम सैगलची गाडी लगेच चालू झाली–

" तुम्हांला कदाचित् ठाऊक असेल कीं, हिंदुस्थानांतून निसटल्यावर सुभाषबाबू जर्मनींत गेले. जर्मनींतील हिंदी लोकच त्यांना प्रेमानें ' नेताजी ' असें संबोधूं लागले ! जर्मनींतील हिंदी लोकांनीं या प्रसंगीं आपलें एक लष्करी पथक संघटित केलें होतें. सुभाषबाबू तेथें गेल्यानंतर त्यांनाच या पथकानें आपले सेनानी अगर ' नेताजी ' बनविलें ! "

" तुम्हांला आश्चर्य वाटेल कीं, जर्मनींत सुभाष अगर नेताजी गेल्यावर या हिंदी सैनिक–पथकाचा दबदबा जर्मनींत खूपच वाढला. अनेक हिंदी सैनिकांना जर्मन मुलींशीं लग्नें लावण्याचे परवानें मिळाले आणि त्याप्रमाणें अनेक हिंदी सैनिकांनीं जर्मन मुलींशीं लग्नें केलींहि !"

" उलटपक्षीं हिंदुस्थानच्या अतिपूर्व टापूंत हिंदी लोकांविषयीं फार

अनादर होता ! फार काय, हिंदवासीयांविषयीं त्यांना तिटकाराहि होता म्हणाना ! याचीं दोन कारणें पुढीलप्रमाणें होती—

( अ ) पाहिलें कारण आर्थिक होतें. मलायी मजूर जें काम ठराविक वेतन घेऊन करी त्याच्या अर्ध्याच वेतनांत तितकेंच काम करण्याची हिंदी मजुराची तयारी असे ! यामुळें मला यांतील मूळ रहिवाशांशीं हिंदी मजुरांची हाडवैरी चढाओढ निर्माण झाली, यांत काय नवल ? अर्थात् मलायी लोक हिंदी लोकांना यामुळेंच अगदीं पाण्यांत पाहूं लागले !

( ब ) दुसरें कारण राजकीय. सर्वच हिंदी लोकांचा मलायी लोकांना यामुळें तिटकारा वाटे. हिंदी लोक स्वतः तर ब्रिटिशांचे गुलाम बनलेच; पण मलायी लोकांनाही गुलाम बनविण्यास याच हिंदी लोकांनीं हातभार लावला ! मग कां त्यांनीं हिंदी लोकांचा तिटकारा करूं नये ?

" पण या अतिपूर्व टापूंत नेताजी बोस आल्याबरोबर मलायी लोकांची मनोवृत्ति पार पालटून गेली. त्यांच्या जीवनांत प्रथमच त्यांनीं हिंदी पौरुष्याचा खरा नमुना नेताजी सुभाष यांच्या स्वरूपांत पाहिला ! हिंदी संस्कृतीचें जिवंत प्रतीक, हिंदी आकांक्षांची घडीव मूर्ति, नेताजी बोस यांच्या स्वरूपांत या लोकांना प्रथमच दिसली ! "

" नेताजींच्या सहवासानें एकाच रात्रींत हिंदी लोकांविषयींचे गैरसमज मलायी जनतेच्या मनांतून पार विरघळून गेले ! आमच्या आझाद-हिंद चळवळीचें महत्त्व त्यांना पटलें आणि **हिंदभूच्या स्वातंत्र्याच्या पवित्र ध्येयाला त्यांचा पाठिंबा मिळूं लागला !** "

मी विचारलें:—“ आझाद हिंद फौजेच्या संघटित निशाणाखाली, तुम्ही लोकांनीं सर्वांचे विचार व आचार यांच्यांत जें सुरेल ऐक्य साधलेत, तें केवळ सामान्य मानवाच्या कुवतीपलीकडचे होतें, यांत शंकाच नाहीं ! संघटनेची इतकी मजबूत व दुर्दम्य सांखळी तुम्ही कशी बनवूं शकला, यांतील रहस्याचा खुलासा कराल कां ? ”

खिशांतून उजवा हात सैगलनें बाहेर काढून उंचावला आणि फुरफुरणाऱ्या लढाऊ घोड्याप्रमाणें अंग हालवून स्थिर व ताठ बसल्यावर मेघगर्जनेसारख्या गंभीर आवाजांत तो बोलूं लागला:—

“ हिंदमातेचें स्वातंत्र्य हें अंतिमध्येय नेताजींनीं आम्हां सर्वां-पुढें ठेविलें होतें. आम्हांला व्यक्तिशः व संघशः पटवून देण्यांत आले होतें कीं, या ध्येयाचा खडकाळ रस्ता धोके, उपासमार व हाल अपेष्टा, इत्यादि संकटांच्या कांट्याकुट्यादींनीं खचून भरलेला आहे ! नेताजींचें ते स्फूर्तिदायी शब्द अजूनहि माझ्या कानांत घुमत आहेत– ”

“ आपली हिंदभू स्वतंत्र झाल्यावर तुम्हांला मंत्रिपदें अगर बड्या असामी देईन, असं आमीष मी तुम्हांला दाखवीत नाहीं; तुम्ही केलेल्या त्यागयज्ञाबद्दल बक्षिसांचीहि लालूच मजजवळ नाहीं. मात्र तुमच्या विजयी मोर्चांत, तहान–भूक मारण्याचीं दिव्यें खचित आहेत; दारिद्र्य आणि हाल-अपेष्टा तुमच्या स्वागताला सज्ज आहेत ! तुमच्या कष्टमय प्रवासांत जणु–अगदीं जबडा पसरून सज्ज असलेला–अतिक्रूर कृतांत काळच म्हणांणा खडा आहे, हें मी तुम्हांला निश्चित सांगूं शकतों ! ”

प्रेम सैगलच्या तोंडून वरील घनगर्जना होत असतां, ज्या ऐतिहासिक भूमीवर नेताजींनीं वरील निर्वाणीची घोषणा केली, त्या जागींच जणुं, तो भावनेच्या ओघांत खेंचला जात होतासें दिसलें ! प्रेमचा देह आमच्या जवळ असला तरी, त्याचें मन, त्याचा आत्मा, अगदीं अंतरात्मा, अतिपूर्वेच्या त्या भूमीवर नेताजींशीं त्याच सुरांत सांथ देण्यासाठीं धडपडत असावा, असेंच क्षणभर मला वाटलें !

सैगलचा अंतरात्मा अशा रीतीनें ब्रम्हदेशच्या जंगलांत भटकत असतां, आमच्या समोरील त्याचा समाधिगत चेहेरा थोडासा मुरडला. त्याच्या भावनापूर्ण हृदयांत कांहीं तरी कांपाकांप सुरूं होती ! अखेर कंपित आवाजांत प्रेम सैगल पुढें बोलूं लागला:—

" अरेरे ! आज हिंदुस्थानांतील वातावरण मात्र मला वेगळेंच दिसत आहे ! विचार अन् आचार यांच्या सुरेल संगीताऐवजीं माझ्या कानांवर बेसूर व बदसूरच येथें पडत आहेत ! स्वातंत्र्यप्राप्तीचें पवित्र ध्येय डोळ्यांसमोर ठेवून तें ताबडतोब गांठण्याची पराकाष्ठा करण्याऐवजीं, स्वतंत्र हिंदुस्थानांत मानाच्या जागा व भागी मिळविण्या-साठीं पक्ष आणि वर्ग यांचा जिकडे तिकडे बुजबुजाट झालेला आहे !"

" होय हो," मिस संध्या मध्येंच म्हणाली " हे कम्युनिस्टच पहा ना ! सारा देश 'साम्यवादी' बनविण्याच्या फाजील उत्साहांत, आद्य ध्येय जे स्वातंत्र्य, तेंच नेमकें विसरून बसलेत हे भाई ! "

मिस् प्रभाला देखील या भाईवर कांहीं तरी आग पाखडण्याची प्रेरणा झालीसें तिच्या डोळ्यांतील चमकेवरून दिसलें; पण प्रेमनेंच न

कळत फिरून बोलण्यास सुरवात केल्यामुळें, अभावितपणें हा अभि- वर्षाव टळला ! तो म्हणालाः—

" तुम्हांला नवल वाटेल कीं, मी देखील एक कम्युनिस्टच आहे. कारखान्यांतील कामगार व शेतांतील शेतकरी यांच्याच हातीं अखेरची सत्ता असावी, या तत्त्वावर माझा अंतःकरणपूर्वक विश्वास आहे. हिंदुस्थानांतील कोटिकोटींचा बहुजनसमाज हाच अखेर खरा सत्ताधारी. हिंदुस्थानांतील गुरुकिल्लीचे आणि व्यापक मोठे धंदे व कारखानें राष्ट्राच्याच मालकीचे झाले पाहिजेत, अशीहि माझी श्रद्धा आहे "

मूठ वळून चढत्या आवेशानें ती दाणकन् समोरील टेबलावर आपटीत सैगल पुढें बोलला—

" पण—पण मातृभूमि स्वतंत्र झाल्याखेरीज, या सर्व ' ईझम्स ' चा अगर वादांचा मला अर्थच समजत नाहीं ! गुलामीच्या शृंखला प्रथम ताडकन् तोडणें हेंच आपलें आद्य कर्तव्य आहे. ' इझम् ' च्या दुष्ट चक्रांत अडकलों कीं, आमचें मुख्य ध्येय जें देशाचें स्वातंत्र्य, त्याचें विस्मरण आम्हांला पडणारच ! असं झालें कीं, घोड्यापुढें गाडी जोडल्यासारखेच होईल ! कम्युनिस्टांना माझी विनवणी आहे कीं, सध्यां तुमचा तो मार्क्स् विसरा, अन् गांधीजींबरोबर आघाडीवर चला ! कारण आजकालच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचे मूर्तिमंत प्रतीक गांधीजीच होत ! हिंदुस्थान एकदां स्वतंत्र झाला कीं, कायदे–मंडळें काबीज करण्याला आमचे कम्युनिस्ट भाई खुशाल मोकळेच राहतील. मग करा सर्व विधिमंडळें काबीज अन् द्या भांडवलदारांच्या प्रतिनिधींना खुशाल बाहेर फेंकून ! "

* * *

( ७ )

मला शंका आली कीं, मी प्रेम सैगलचे भाषण ऐकतोय कीं, नेहरुंचं? आवाज प्रेमचा खरा, पण तत्वप्रणाली नेहरुंची !

भाषण संपल्यावर प्रेम आम्हां सर्वांकडे अर्धवतुळ दृष्टीक्षेपानें पाहूं लागला. आम्हीं सर्व कांहीं मिनिटें, पुतळ्यांप्रमाणें स्तब्ध होतो. मग आवाज अगदीं वरच्या सप्तकांत नेऊन प्रेम पुढें बोलूं लागला:—

" मध्यवर्ती सत्ताकेंद्रांतून उद्यां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जर हिंदूंचेंच वर्चस्व प्रस्थापित झालें तर आमची गुलमागिरी संपणारच नाहीं, असें माझें तरी स्पष्ट मत आहे. कोणत्याहि एका पक्षाचा अगर जातीचा भावी स्वतंत्र हिंदुस्थानांत वरचष्मा असतां नये, असें मला वाटतें. हिंदुस्थानचा खरा आत्मा बहुजनसमाजांत असून त्यांच्याच प्रतिनिधींच्या हातीं संपूर्ण सत्ता गेली पाहिजे. "

" म्हणून देशांतील सर्व पक्ष व गट यांना माझी फिरून विनंति आहे कीं, आपण देशांचें स्वातंत्र्य प्रथम मिळवूंया. मग हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाला हवी असेल तशी राज्यघटना क्रमाक्रमानें अस्तित्वांत येईल. मला अजीर्णाचा तिटकारा आहे, तसाच, सत्तेसाठीं हपापलेल्या राजकारणाचाहि तिटकारा आहे. म्हणूनच सध्यांच्या पक्षभेदी राजकीय घोषणांनीं काळीज जळून माझें मन अस्वस्थ होतें ! "

" आझाद–हिंद फौज असल्या हपापी राजकारणापासून अलिप्त होती. असलें हपापी राजकारण आम्हांला प्लेगासारखेंच वाटे ! प्लेगच्या जंतूंना कोणीहि आपल्या शरीरांत थारा कसा देईल ? "

" नेताजींनीं आमच्या पुढें एक आणि एकच उच्च ध्येय ठेविलें होतें—"

आमच्या अपेक्षित उत्तराची प्रेमनें क्षणभर वाट पाहिली नाहीं, तोंच—प्रेमसह आम्हां सर्वांच्या तोंडून,

' **हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य** ' अशी घोषणा एकाच वेळीं घोषित झाली !

प्रेम पुढें म्हणाला—

" हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर आमचें पुढें काय होणार याची आम्हां पैकीं कोणीहि पर्वा केली नाहीं. प्रत्येक धर्माचे, पक्षाचे व मतप्रणालीचे लोक आमच्यांत होते; पण आझाद-हिंद फौजेंत आम्ही सर्वजण एकच एक ध्येयानें प्रेरित झालों होतों. "

" हिंदुस्थानभर असें समान बंधुत्त्वाचें नातें प्रस्थापित होण्यासाठीं मी तरी माझ्या प्राणांचा होम करण्यास तयार आहे. "

प्रेमच्या भाषणाचा हा भाग संपत असतां, संपत आलेल्या सिगारेटचें थोटुक रक्षापात्रांत टाकतांना, माझी नजर सहज मिस प्रभाकडे वळली. तिच्या नेत्रांत लाल चमकेनें उत्साहाची बिजली चमचमत होती ! उत्साही बिजलीचें हें तेज असहायतेनें लोपून जाऊं नये म्हणूनच कीं काय, मिस प्रभा जाग्यावरून उठली आणि झारदार आवाजांत तिनें प्रेम सैगलला सवाल केला--

" समान-बंधुत्वाच्या अशा नवयुगाचें स्वागत करण्यासाठीं आमच्यासारख्या मुलींनीं काय करावें तें सांगाल कां ? "

मिस् प्रभाच्या या आंदोलनोत्सुक विलक्षण उत्साहाचें प्रेमला कौतुक वाटलें ! मोठ्या दादानें छोट्या बहिणीला प्रोत्साहन द्यावें, अशा वात्सल्यपूर्ण शब्दांनीं तो म्हणाला—

" तुम्ही मुलींनीं आपल्या बंधूंना पकडून आझाद–हिंद–फौजेंतील त्यागी सैनिक म्हणून दाखल होण्याचें महत्त्व त्यांना पटवून द्यावें. सत्तेचा हपाप हें हालाहल वीष आहे. अन् असलें वीष पिणाऱ्यांची काय स्थिति होतें, हें आपापल्या बंधूंना तुम्ही पटवून द्यावें ! "

पण औपचारिक स्वरूपाच्या या उपदेशानें प्रभाचें समाधान झालें नाहीं. कार्यावर अन् झटपट् परिणामावर तिचें लक्ष ! कामासाठीं शिवशिवणाऱ्या तिच्या हातांत कांहीं तरी जादूच्या कांडीसारखें झटपट परिणामीं साधन पाहिजे होतें. या जागेंतून बाहेर झटकल्या-बरोबर तिला झपाटेबंद काम हवें होतें ! वायुलहरींच्या वेगानें, पेशावर, डिब्रुगड, मद्रास इत्यादि शहरीं सुसाट जावें आणि हिंदी जनतेंत या नव्या दृष्टिकोनाची क्रांति घडवून आणण्यासाठीं या उपदेशामृताचा वर्षाव करावा, असें तिच्या या उत्साहाचें अनावर स्वरूप होतें !

केवळ आपले बंधु किंवा नजीकचे नातेवाईक यांच्यांत इष्ट बदल घडवून आणण्यानें, प्रभाची ही दुर्दम्य देशसेवेची भूक, कशी भागणार ? देशांतील, कोट्यावधि अज्ञानी, रक्तहीन, हाडाचे सांपळें, राजकारणाचा भुसकट काथ्याकूट करणारे आराम खुर्चीवालें मुत्सद्दी आणि दुराग्रही व घमेंडखोर पक्ष–पुढारी, अशा सर्व प्रकारच्या चाळीस कोट देश बांधवांतील क्रांति प्रभाला पाहिजे होती !

अशा प्रकारच्या क्रांतीचे बाबतींत नैराश्यामुळें अगर विफलतेमुळें होणाऱ्या असहाय असमाधानाच्या मनोवृत्तीनें प्रभाला ग्रासून टाकिलें होतें ! अंग हलवून अन् ताठ बसून तिनें फिरून प्रेम सैगलला सवाल टाकला—

" आम्ही तरुण हिंदी मुलींनीं यावेळीं काय करावं तें नक्की सांगा; असला मोघम उपदेश नको ! "

त्या जागीं वर अन् आसपास पसरणाऱ्या सिगारेटच्या धूम्रवलयांत देखील प्रभाचा हाच सवाल भिरभिरत असल्याचा मला भास झाला !

या उतावीळ व उत्साही मुलीचें समाधान करणाऱ्या वडील भावाच्या वात्सल्यानेंच प्रेम सैगल पुढें बोलला—

" हिंदुस्थानाच्या या स्वातंत्र्य–युद्धांत तुम्ही तरुण हिंदी मुलींनीं तडफेनें उडी घेण्यास बिलकुल हरकत नाहीं. "

वरील परवानगीनें फुशारूनच जणुं काय, ' निघालीच आतां आघाडी-वर ' अशा थाटानें प्रभा ' हुश्शार'च्या पवित्र्यांत सुसज्ज झाली ! तिचें अनुयायित्व पत्करण्याची तयारी आपल्या चेहेऱ्यांत व्यक्त करणाऱ्या संध्येलाहि तिनें ' हुश्शार ' होण्याचा इषारा बोटानें डिवचून दिला !

इतक्यांत प्रेम सैगल करितां एक चिठी घेऊन कोणी तरी इसम आला आणि ' ही स्वातंत्र्याच्या आघाडीची तयारी ' या चित्रपटांत अर्ध्यावरच कापली गेली !

× × × ×

[ ८ ]

मिस् उषानें चहाचे रिकामे कप् फिरून ताज्या गरम चहानें भरले आणि प्रेमवर नव्या प्रश्नांचा मारा करण्यापूर्वी त्या प्रश्नांना गरम चहाची ऊब पुरविण्याचा इषाराहि दिला ! मी एक सिगारेट शिलगावली आणि कोचावर रेलून नव्या प्रश्नांच्या शोधांत गर्क झालों.

प्रेमनें हातांत गेला पावतास तसेंच अर्धवट राहिलेलें चॉकलेट-बिस्किट तोंडांत टाकून संपविल्यावर, मी पहिल्या प्रश्नाच्या गोलंदाजीचा मान पटकावला !

" ध्येयाच्या एकाग्रतेइतकीच शिस्तहि महत्त्वाची आहे; आणि आपल्या राष्ट्रीय संघटनेंत, ऐक्याच्या मानसिक भावनेला, कडक शारीरिक शिस्तीची जोड, आपण आपल्या दैनंदिन हालचालींत अन् व्यवहारांत न दिली तर, आपली या स्वातंत्र्याचे लढ्यांत व्हावी तशी प्रगती मुळींच होणार नाहीं, असें नाहीं तुम्हांला वाटत ? "

प्रेमनें ताबडतोब उत्तर दिलें:—

" अलबत् ! साधीच नव्हे तर आपल्या व्यवहारांत अन् संघटनेंत कडक शिस्तीची आवश्यकता आहे. पुष्कळ वर्षें सैन्यांत नोकरी केल्यामुळें शिस्तीच्या महत्त्वाची तीव्र जाणीव मला कशी असणार नाहीं ? "

" कोणत्याहि सैन्यांत शिस्तीला विलक्षण महत्त्व आहेच. ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं शिस्तीची पांठ सोडणारे सैनिक घेऊन लढणें म्हणजे जंगली सैन्याचा घातकी खेळखंडोबाचा ठरेल ! चालू युद्धांत

जर्मनीवर रशियानें मात केली याचें रहस्य काय? रशियाच्या फौजा कडक शिस्तींत होत्या हेंच..."

मध्येंच लष्करी शिस्तीच्या या वर्णनाला ब्रेक लावून मिस् संध्या म्हणाली—

"पण जर्मन फौजांत देखील तितकीच कडक शिस्त नव्हती कां?"

प्रेम तिला दुजोरा देत पुढें बोलूं लागला—

"अगदीं खरं. पण जर्मन फौजांची ही शिस्त चढाईंतील विजय-परंपरांचे प्रसंगींच तेवढी उत्कटतेनें राही. पराभवाचा पहिला फटका बसल्याबरोबर, जर्मन फौजांच्या शिस्तीच्या नाड्या तावडतोब ढिल्या पडल्याचे दाखले आहेत! स्टॅलिन्ग्राडचा मार बसल्याबरोबर किती भ्याड वृत्तीनें जर्मन फौजांनी पळ काढला हें तुम्हांला माहीतच आहे! उलटपक्षीं या युद्धांत पराभवामागून पराभावांचे तडाखे रशियन फौजांनीं प्रथम खाल्ले; पोलीश सरहद्दीपासून थेट स्टॅलिनग्राडच्या कारखाने, टापूंपर्यंत एकसारखी माघार खावी लागली तरीहि, रशियन फौजांनीं तशी माघारहि अत्यंत शिस्तीनेंच घेतली. शिस्त त्यांनीं कोठेंहि, आणि कसल्याहि बऱ्या वाईट प्रसंगीं, सोडलीच नाहीं!"

"आतां प्रश्न असा पडतो कीं, जर्मन फौजांपैक्षां रशियन फौजांत इतकी कडक शिस्त कशानें बाणली? या प्रश्नाचें एकच आणि अद्वितीय उत्तर हेंच कीं, आपल्या देशाच्या स्वतंत्र्याचें रक्षण हें उच्च व पवित्र ध्येय रशियन फौजांपुढें होतें. अशा प्रकारच्या उच्च ध्येयामुळेंच रशियन फौजांच्या हृदयांत पराभवांनीं न डगमगणारी

आणि माघारीनीं न गोंधळणारी अशी अपूर्व व दुर्दम्य शिस्त निर्माण झाली ”!

“ स्वातंत्र्य, मान–धनता व शांतता, या पवित्र ध्येयासाठीं, रशियन फौजा लढत होत्या; तर लूटफांट, इतरांची गुलामगिरी व सत्तेचा हपाप, या हीन ध्येयासाठीं जर्मन फौजा धडपडत होत्या ! ”

“ आम्हां हिंदी लोकांच्या दृष्टीनें विचार केला म्हणजे, इतर कोणत्याहि देशांतील लोकांपेक्षां आम्हाला शिस्त-संघटनेची जास्तच आवश्यकता आहे. कारण इतर देशांपेक्षां आमची परिस्थितीच वेगळी आहे. आम्ही आमच्या लढयासाठीं ‘ अहिंसा ’ हें साधन म्हणून पत्करलें आहे. पण संघटित हिंसात्मक प्रतिस्पर्ध्यांशीं आम्हांला लढावयाचें आहे ! अर्थात् अहिंसात्मक लढयाचे दृष्टीनें आत्मिक शिस्तीला आत्यंतिक महत्व आहे. फार काय, अहिंसात्मक लढयांतील सैनिकांची आध्यात्मिक शिस्त हा प्राण अगर रक्त–धमनीच होय. ”

प्रेमच्या शेवटच्या तीन वाक्यांचें मला जरा आश्चर्यच वाटलें ! स्वतःशींच मी पुटपुटलों—

“ काय आश्चर्य पहा ! माझ्या समोर बसलेला हा शूर सैनिक जगभर शस्त्रास्त्रांनीं स्वतः लढत असूनहि अहिंसात्मक लढ्याचें तंत्र याला इतकें कसें अवगत असावें बरें ? ”

× × × ×

( ९ )

प्रेम सैगल बरोबर गप्पा करण्यात आम्ही इतकें दंग होतों कीं, वेळ किती भराभर गेला हें लक्षांत देखील आलें नाहीं. अखेर प्रेम

आपल्या मनगटावरील घड्याळाकडे पाहून बोलला " अरे, खूपच उशीर झाला मला ! "

अखेर भीतभीतच एक शेवटचा प्रश्न विचारून घेण्याचे हेतूनें मी प्रेमला विचारलें--

" लष्करी सेनानी, या दृष्टीनें नेताजी बोस यांचें महत्त्व गट्टी राष्ट्रांचें सेनानी कितपत मानीत याबद्दल थोडी माहिती सांगाल कां ? "

प्रेम ताबडतोब उत्तरला--

" एकदां जर्मन व जपानी लष्करी तज्ज्ञांची परिषद भरली असतां, परिषदेंतील प्रत्येक लष्करी तज्ज्ञ चित्रासारखा तटस्थ राहून सुभाष बोस यांचें भाषण ऐकत होता. मीहि या परिषदेला हजर होतों. या परिषदे पुढें त्या प्रसंगीच्या लष्करी हालचालीचे व प्रश्नाचें जें अधिकारपूर्ण व मार्मिक पृथक्करण नेताजी बोस यांनीं केलें, त्यामुळें, परिषदेंतील जर्मन तज्ज्ञ तर मंत्रमुग्धांप्रमाणें डोलूं लागलेले पाहून मलाहि कमालीचा आनंद झाला ! "

" या परिषदेनें महत्वाचे निर्णय घेतले आणि नेताजी बोस यांच्या शिफारशी हिटलरला खास कळविण्याची तजवीज करण्यात आली. नेताजींच्या ह्या शिफारशी जर हिटलरनें अंमलांत आणल्या असत्या तर, जगाच्या इतिहासाला खचित वेगळेंच वळण लागलेलें असतें ! "

" काय म्हणतां ? अशा त्या शिफारशी तरी कोणत्या ? " मी आश्चर्यातिरेकानें गर्जून विचारलें !

" या शिफारशींचा मी परिस्फोट करणें माझ्या लष्करी शिस्तीला व नीतीला सोडून होईल, हा आत्यंतिक गुप्त असा प्रश्न आहे; आणि तो सदैव मी मनांतच ठेविला पाहिजे. "

"नेताजींचा उपदेश जर हिटलरनं ऐकला असता तर, जगाच्या इतिहासाला वेगळंच वळण लागलं असतं" हे शब्द माझ्या कानांत एकसारखे घुमतच राहिले! बोललेला शब्द क्षणांतच विसरून जातो. अत्यंत सुरेल संगीत देखील फार तर आणखी कांहीं सेकंद कानांत घुमत राहाते, पण त्यापलीकडे त्याचा कानांत मागमूस राहात नाहीं!"

पण नेताजींच्या उपदेशाबाबतचे ते शब्द मात्र अमृतधारांप्रमाणें माझ्या कानांचा कायमचा ठाव घेऊन राहिलें! फार काय, त्या सबंध मजल्याच्या कोपऱ्यान् कोपऱ्यांतून तेच शब्द घुमत राहिल्याचा भास मला झाला!

इतर लोकांच्या गुपितांतून स्वतःचे नाक खुपसण्याचा वास्तविक माझा स्वभाव नव्हे, पण यावेळीं मात्र माझ्या स्वभावांत बदल झाल्याची मला जाणीव झाली. दुसरी कांहीं युक्ति योजली तर हे महत्वाचे गुपित हस्तगत होईल, अशी मला आशा सुटली! लहान पोराचा भोळेपणा चेहेऱ्यावर आणून मी प्रेमला फिरून सवाल टाकला:—

"पण हा अत्यंत महत्वाचा असा नेताजींचा सल्ला हिटलरनें कां बरं ऐकला नाहीं?"

"छे छे, मेहेरबान, हें गुपित फोडण्याचे कामीं आपण मला असं चकवूं शकणार नाहीं हं!" प्रेमनें उत्तर दिलें!

मीहि मग प्रेमच्या या चाणाक्ष व विनोदी प्रसंगावधानावर खूष होऊन त्याच्या हंसण्यांत मनापासून भागीदार झालों!

अखेर आम्हांला या भेटीचा मान देऊन खूष केल्याबद्दल आम्हीं सर्वांनीं प्रेमचे हार्दिक आभार मानले.

मिस संध्या प्रेम नजीक उभी राहिली आणि 'जय–हिंद' सलामीची कवाईत शिकविण्याची तिनें त्याला विनंती केली. मिस् उषा व प्रभा होत्याच तिच्या बरोबर. हात ताठ करून तळहाताचा कपाळाशीं ३० अंशांचा कोन करण्याची कवाईत तिला ठीक साधेना! प्रेमनें मग तिचा तळवा जरा खालीं करून 'जय–हिंद' ची सलामी ठाकठीक साधेलसें केलें; अन् जातां जातां तो म्हणाला, 'आहे कीं नाहीं सोपी सलामी!'

फुशारून जाऊन मोठ्या हर्षभरांत प्रभानें अखेरच्या सलामीचा विनोद केलाः—

"ऐकलंत कां हो प्रेम! मला किनई आमच्या कॉलेजांतील मुलं 'शहानवाझ' म्हणतात!"

मिस् उषा पुढं होऊन म्हणाली, 'अन् मला म्हणतात 'प्रेम'!

'अन् मला सर्वांनीं ठरविलंय 'धिलॉन्' असं म्हणून मिस् संध्यानं या संध्या–विनोदाची पूर्तता केली!

× × × ×

(१०)

प्रेमशीं हस्तांदोलन करून दुसऱ्याच दिवशींच्या मुलाखतीची वेळ मी विचारली तेव्हां, डायरींत पाहून प्रेम म्हणाला, "पहा हे दहा

तारखेचे समारंभ ! दिवसाच्या सर्व तासांच्या कार्यक्रमांनीं डायरीचं हे पान कसं चिताडून गेलंय ! फक्त सकाळीं ९ ते १० ची ही जागा रिकामी आहे. या वेळेला येऊं शकाल तुम्ही " ? " मला जरा लवकर उठायचा कंटाळाच ! पण तुमचाहि इलाज नसल्यामुळें मला ती वेळ साधलीच पाहिजे " मी कुरकुरत उत्तर दिलं !

प्रिय वाचस्पति, आतां आपणहि परस्परांचा तात्पुरता निरोप घेऊं. उद्यां मी बरोबर पावणे नऊ वाजतां तुमच्याकडे येईन् अन् प्रेमच्या दुसऱ्या भेटीकरितां तुम्हाला सांगातीं घेऊन जाईन !

काय म्हणतां ? ' प्रेमप्रमाणें शहानवाझ व धिलॉन यानांहि भेट-विण्याचं मी तुम्हांला वचन दिलंय ? ' हो खरी गोष्ट आहे; मी विसरलों नाहीं ते. दुसरे दोघे सध्यां आपापल्या गांवीं गेले आहेत. ते लाहोरला परत आल्याबरोबर त्यांचीहि भेट तुम्हांला घडवीन. मग तर झालं ?

दोस्त वाचस्पति, जरा दमादमानं घ्याल कीं नाहीं ? आपली ही मोहीम योजना–बद्ध नाहीं, हें प्रथमच तुम्हांला नाहीं कां सांगितलं ? या शूर वीरांना आपण कोठें अन् केव्हां भेटूं शकूं याचा कांहीं नेम कां आहे ? आपल्या मोहिमेच्या पहिल्याच दिवशीं प्रेमच्या भेटीची शिकार साधेल, अशी कधीं आपली अटकळ होती ? पण पहिल्याच दिवशीं हा मोका साधून तर गेला नां ? हो, पण त्या तीन हुशार मुलींचेच आपण त्याबद्दल आभार मानले पाहिजेत नाहीं ?

हो, हो, कां नाहीं ? दोस्त वाचस्पती, भेटल्या त्या मुली फिरून तर तुमच्याहि वतीनें त्यांचे आभार मानून टाकतों, मग तर झालं ?

पण मेहेरबान् तुम्हांलाच अगोदर भेटल्या ह्या चिमुरड्या मुली,
तर माझ्या वतीनं त्यांचे आभार मानायला विसरूं नका हं !
बरं तर 'शुभा रजनी'!

ठीक ठीक! उद्यां सकाळीं पावणे नऊचा संकेत विसरूं नका बरं! 'जय हिंद!'

---

# भाग ३ रा

## टोकियोहून आलेले दोन कुमार

श्रीराम लुथाकडे मी झोंपीं गेलों. मॉडेल टाऊनकडे झोंपाययास गेलों असतो तर दुसरें दिवशीं सकाळीं लाहोर शहरीं योग्य वेळीं परतच येऊं शकलों नसतों. कारण आईला शपथ घालून सांगितलें तरीहि ती मला मुद्दाम सकाळीं कधींहि जागा करीत नाहीं. तिला माहीत आहे कीं, आपला मुलगा दररोज पहांटे एक दोन पर्यंत जागतो. अर्थात्च मी माझ्या झोपेची कदर केली नाहीं तरी, माझी झोंपमोड करून मला आवश्यक अशी विश्रांति कमी करणें माझ्या आईकडून कालत्रयींहि होणें नाहीं !

श्रीराम अगदीं वक्तशीर माणूस, त्यानें मात्र मला बरोबर ८ वाजतांच हालवून जागें केलें. 'थोडसं पडूं देरे' ही माझी तक्रार बिलकूल चालूंच दिली नाहीं !

अखेर आंतल्याआंत तडफडत मी एकदांचा अंथरुणांतून बाहेर तर पडलों. एकदां उठून उभें राहिलें कीं, फिरून लोळण्यांत मौज कसली ?

लोकांना ग्रंथकाराचा ग्रंथ खरीदण्यास आवडलें तरी त्याचा आळस खरीदणं कां त्यांना आवडेल ? हिंदुस्थानाला अगोदरच आळसाचें भरपूर वरदान ! हिंदी लोक म्हणजे आळसाचे इरसाल पुतळेच ! माझ्या या आलस्य-वर्णनाची वाचकांनीं मला क्षमा करावी.

माझे वाचक-वाचस्पति मात्र आतां चांगलेच घसटीचे झाले असल्या-मुळें आणि वीर-दर्शनाचें व्रत आम्ही दोघांनींहि पत्करलें असल्यामुळें, आम्हांला आमच्या या मोहिमेंत खूप गप्पा टप्पा करतां येतात.

बाहेर पडल्याबरोबर उजव्या बाजूच्या रस्त्यानें गव्हर्नर्स हाऊसकडे न जातां तडक समोरच्या रस्त्यानेंच मी माझी ऑस्टिन धूम चालविली. वाचस्पतींनीं मला ताबडतोब सुचविलें कीं, आम्हाला उजव्या बाजूस वळलें पाहिजे. मींहि 'क्षमस्व' म्हणून गाडी मागें वळविली. मी जरासा स्वप्नाळू असल्यामुळें विचारतंद्रीच्या भरांत अशा चुका माझ्या हातून वारंवार घडतात !

मात्र वाहतुकीचे कायदे मी बऱ्याच वेळा माझ्या स्वप्नाळू स्वभावा-मुळें धाकावर बसवीत असलों तरी, गेल्या ९ वर्षांत मी अपघात

कसलाच केला नाहीं. नाहीं म्हणावयास तीन वाटसरूंच्या अंगावरून माझी गाडी एकदां गेली ! पण दहा वर्षांपूर्वींचा तो प्रकार ! त्याचे प्रायश्चित्त घेऊनहि मी त्यावेळीं मोकळा झालों असल्यामुळें, पोलीसनें त्या जुन्यापुराण्या अपराधाबद्दल मला छळूं नये, हें उघड आहे !

आपलेंच चऱ्हाट लावीत बसल्याबद्दल वाचस्पतीनें लगेच माझ्या मस्तकावर एक टिचकी मारून जागें केलें ! एकंदरींत वाचस्पतींची सोबत मला चांगलीच पथ्यावर पडते. सांगाती असावा तर असाच धाडसी, हुशार व प्रसंगावधानी !

देव आमच्या वाचस्पतींचें भलें करो !

× × × ×

( २ )

मी गाडी थांबवून खालीं उतरतों तोंच एका झाडूवाल्यानें हवेंत झाडू परजूनच मला 'जयहिंद' केलें ! वास्तविक हिंदुस्थानांतील आमचा झाडूवाला हीनगंडानें पछाडलेला असावयाचा. हिंदु समाजांतील अगदीं तळच्या वर्गाच्या या माणसांतून स्वाभिमान नाहींसाच झालेला असतो. अशा रीतीनें माणुसकीचा स्वाभिमान गमावलेला माणूस पाहिला कीं, त्याला निर्माण करणाऱ्या परमेश्वरावर दगडफेंक करण्याइतकें माझें माथें फिरून जातें !

परंतु ज्यांना ताठ चालणेंहि अनेक वर्षें ठाऊक नाहीं, अशा आमच्या देशांतील हरिजनांचा प्रश्नच वेगळा ! बिचाऱ्यांच्या

अरुंद हडकुळ्या खांद्यावर आपल्या समाजाच्या पूर्वग्रहदोषांचा इतका प्रचंड बोजा बसला आहे कीं, मान ताठ व छाती वर ठेवून चालणें त्यांना कठीणच जावें यांत नवल नाहीं! मणभर गव्हाचें पोतें पाठीवर घेऊन ताठ चालण्याचा प्रयत्न करून पहा, म्हणजे हरिजनाला त्या प्रचंड बोजाखालीं कसं वाटत असेल याची तुम्हांला कल्पना येईल!

पण दहा जानेवारीला सकाळींच मला भेटलेला हा झाडूवाला क्रांतीनें बदलेला होता! तो माझ्यापुढें ताठ उभा राहिला अन् त्यानें आपला झाडू 'जयहिंद' साठीं हवेंत परजला, त्यावेळीं राष्ट्रीय निशाणच त्यानें फडकाविल्याचा मला भास झाला! निर्लज्ज जनरूढी विरुद्ध त्यानें जणुं 'जयहिंद'ची युद्धगर्जनाच केली!

त्याच्या हालचालींतहि गुलामी मनोवृत्तीचा मागमूसहि नव्हता.

'जय हिंद'चं हें वारं आम्हांला राजकीय स्वातंत्र्य तर मिळवून देईलच, पण आमच्या हरिजनांचा सामाजिक उद्धारहि करील यांत शंका नाहीं!

हा हरिजन माझ्या नजीक येऊन बोलतां चालतांना त्यांच्या वागण्यात हांजीखोरपणांचा मागमूसहि मला दिसला नाहीं. समाजरूढी प्रमाणें माझा सामाजिक दर्जा मोठा असला तरी, तो माझ्याबरोबर स्वाभिमानी मर्दासारखा बोलत होता. 'जय हिंद' घोषणेनेंच ही क्रांति घडवून आणली होती. भीतीच्या आणि हीनतेच्या अनेक कींव करण्याजोग्या भावनांची या माणसाच्या हृदयांतील जागा, आतां 'जय हिंद' घोषणेच्या प्रभावामुळें, स्वाभिमान समता आणि आत्मविश्वास, या सद्गुणांनीं घेतलेली दिसली!

आज अस्पृश्यवर्गांतील लाखों लोक एकतान सुरेल आवाजांत 'जयहिंद'ची घोषणा करूं लागतील तर अस्पृश्यतेचा कलंक अल्पावधींतच इतिहासजमा झाल्यावांचून राहणार नाहीं

आशा करूं या कीं 'अस्पृश्य' वर्गांतील सर्व लोक या मर्द झाडूवाल्याचें अनुकरण करतील !

मला या झाडूवाल्याबद्दल विशेष समाधान वाटलें याचें कारण हें कीं, स्वतःच्या इभ्रतीची व स्वाभिमानाची, त्याचप्रमाणें स्वतःच्या श्रमजीवि पेशाच्या थोर मूल्यावरील श्रद्धेची जाणीव, त्याच्या ठिकाणीं नव्यानें जागृत झाली असली तरी, त्या जाणिवेबरोबर कांहींच्या ठिकाणीं येणारा उर्मटपणा मात्र त्याच्यांत बिलकूल नव्हता. त्याची वागण्याची पद्धत मूर्तिमंत विनयानें नटली होती ! खरा शक्तिमान् पुरुषच विनय-संपन्न असतो, हें सत्य त्याला पाहून कोण नाकबूल करील ?

उर्मटपणानें आपले हेतु साधूं पहाणारे लोक, भ्याड, हलकट व चुगलखोर असतात. पुष्कळदां पाठींत खंजीर खुपसणारे दगलबाज लोकच 'शूर' म्हणून जगांत मिरवीत असतात ! आणि आपल्या सडक्या मनोवृत्तीचें प्रदर्शन हे लोक कसे करीत असतात ? उद्धट-पणानें, चढेलखोरवृत्तीनें किंवा उपकारकर्त्याचें ढोंग आणून ! विश्वास-घात, निंदा व शिव्याशापांतच दुष्कृत्यांचें पर्यवसान !

असो. हे कोळसे उगाळून काळ्याकुट्ट रंगावांचून काय हातीं लागणार ? आपल्या या मर्द हरिजन बंधू मार्फत आपण आल्याची वर्दी तर प्रेमला देऊं या !

· प्रेम स्नान करीत असल्याचा निरोप सांगून या हरिजन मित्रानें बसायच्या जागीं आम्हांला नेलें.

*　　　*　　　*

( ३ )

आम्ही बैठकीच्या दिवाणखान्यांत शिरलों तों काय! 'लॉंग्ज' मधील चहापान समारंभाचे प्रसंगीं परिचय झालेले ते टोकियोहून आलेले दोन तरुण कुमार ताज्या वर्तमानपत्रांत डोकीं खुपसून बसलेले दिसले!

असली कसली महत्त्वाची बातमी त्या पत्रांत असावी बरं? 'सुभाष बोस जिवंत आहेत' हीच आजकालची कर्णोपकर्णीं खिळलेली बातमी त्या पत्रांत असेल कां? असल्या बातम्या पहिल्या पानाच्या मथळयानेंच प्रसिद्ध व्हावयाच्या!

नेताजी बोस यांच्यावर या दोन कुमारांची नितांत भक्ति व प्रेम असल्यामुळें, असल्या उलटसुलट सर्व प्रकारच्या बातम्यांतील शब्दा-शब्दाची छाननी करून दररोज सकाळीं नेताजींच्या जिवंतपणाच्या बातम्यांचा पृथक्करणपूर्वक शोध घेण्याचाच छंद अलीकडे त्यांना लागला होता!

प्रेम येईपर्यंत या कुमारांशींच गप्पागोष्टींचें सुख घेण्याचें मी ठरविलें. त्यांच्या संबंधींचीच हकीगत मी त्यांना विचारली.

आतार महंमद म्हणाला, " मला नुकतेंच १७ वें वर्ष लागलें. अमृतसर ही माझी जन्मभूमि. पीनांग मलायांत माझ्या वडिलांचा

कापडाचा व्यापार असल्यामुळें माझें प्राथमिक शिक्षण तिकडेच झालें. तीन वर्षांपूर्वी मी सीनियर केंब्रीज एक्झॅमिनेशनला बसलों होतों. पण त्या परीक्षेचा निकालच अद्याप लागलेला नाहीं!"

"नेताजी सुभाष बोस आझाद हिंद फौजेचे संघटक बनले त्यावेळीं पूर्व–आशियांत उत्साहाचा नुसता पूर लोटला! ह्यापूर्वी आम्हीं नुसते जगत होतों. पण नेताजी आमच्यांत आल्याबरोबर आमच्या नसानसांत गरम रक्ताचा उत्साह संचरला, काळजांतहि रक्त उसळूं लागले आणि शरीरांत शक्तीचा उठाव झाला!"

"हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं लढ्याचा उठाव करण्याची वेळ हीच, याची जाणीव माझ्यासारख्यांना झाली. मी नेताजींच्या फौजेंत दाखल झालों. माझ्या वयाच्या ४५ जणांची निवड लष्करी शिक्षणाकरितां झाली. सिंगापूरच्या कोडोगोकूर येथील लष्करी शाळेंत आम्ही लष्करी कवाइतींचे पहिले धडे घेतले. एका वर्षानंतर टोकीयोंतील इंपीरियल मिलिटरी ॲकेडमीकडे आम्हांला पुढील लष्करी शिक्षणासाठीं पाठविण्यांत आलें. तेथें आम्हाला अद्यावत् युद्धतंत्राचें शिक्षण देण्यांत आलें. आमच्या या शिक्षणक्रमांत नेताजी जातीनें लक्ष घालीत; आम्हांला मधून मधून ते सुंदर आणि बोधप्रद अशीं पत्रें पाठवींत.

× × × ×

( ४ )

आतां र वरील वर्णन करतां करतां मध्येंच एकाएकीं स्तब्ध झाला! मी त्याच्याकडे पाहिलें. तो पुढें बोलण्याचा प्रयत्न करीत होता, पण

भावनातिरेकानें त्याचा गळा दाटून आला होता. नेताजींचें स्मरण झाल्याबरोबर हा तरुण कुमार, करुण भावनेची मूर्ति बनला! पण कडक लष्करी शिस्त अंगीं बाणल्यामुळें, भावना आवरून पुढें बोलण्यास त्यानें सुरवात केली.

१९४५ च्या ऑगस्टमध्यें जपाननें शरणागति पत्करल्यावर आम्हांला सैन्यांतून सोडण्यांत आलें. एक महिन्यानंतर अमेरिकन सैन्याधिकाऱ्यांनीं आम्हांला ताब्यांत घेतलें. नंतर मॅनिला या ब्रिटिश प्रदेशांत आम्हांला विमानांतून नेण्यांत आलें. येथेंच ब्रिटिशांनीं आमचा ताबा घेतला आणि आम्हांला त्यांनीं अटकेंत ठेवलें. आम्हांला देण्यात आलेलें अन्न अतीशय खराब असल्यामुळें आम्हीं त्याबद्दल अमेरिकन अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. अमेरिकनांनीं सौजन्य दाखवून आमचे बरेंच हाल वांचविलें."

१९४५ च्या नोव्हेंबरमध्यें एका विमानवाहू बोटींत आम्हांला घालण्यांत आलें. एका सामानाच्या कोठडींतच आम्हां सर्वांना कोंबण्यांत आलें. खुनी माणसांना वागवावें, तसेंच ब्रिटिश सोजीर आम्हांला वागवीत! हात वर करावयास लावून आमची कडक झडती घेण्यांत आली. आणि आमच्या खिशांतील घड्याळें, फाउंटनपेनें इत्यादि मूल्यवान् चिजा काढून घेण्यांत आल्या!"

यावेळीं तो दुसरा कुमार सत्यप्रकाश मोठया मिस्किलपणानें बोलला "माझा पार्करपेनचा सेट या लुटारू सोजिरांच्या झडतींतून मी कसा वांचविला माहित आहे? मानेच्या मागें शर्टच्या पोकळींत मी अलगत हा सेट् सोडून दिला आणि पाठीच्या बाजूस तो कोठें तरी

अडकून राहिला! माझ्या सर्व अंगावर सोजिरानें चांचपून पाहिलें त्याच्या हाताला कांहीं लागलें नाहीं." असें म्हणून खिशांतील पेन काढून तो माझ्या पेनाशीं पडताळून पाहूं लागला!

"तुमचं हें पेन् तुम्ही केवढ्याला घेतलं?" सत्यप्रकाशनें मला विचारलं.

'एकशे पंचवीस रुपयाला' मी उत्तर दिलें.

"नक्कीच काळ्या बाजारांतील हा सौदा! मला देखील माझ्या पेन्‌करतां काळ्या बाजरांत १०० डॉलर्स द्यावें लागलें." सत्यप्रकाशनें आपल्या पेनची पूर्वकथा सांगितली!

नंतर आतार आपली हकीगत पुढें सांगूं लागला:—

"१३ नोव्हेंबर १९४५ रोजीं आम्ही हॉंगकॉंगला पोचलों. कडक लष्करी पाहऱ्यांतून आम्हांला तेथील तुरुंगांत पोचविण्यांत आलें. ब्रिटिश सोजीर आमच्याशीं या प्रसंगीं शुद्ध पशूसारखें वागलें!"

मध्येंच सुरसुरी येऊन सत्यप्रकाश बोलला:—

"आमच्यापैकीं कुमार नरेंद्राला एका सोजिरानें जबड्यावर ठोसा लगावला पहा!" मी आतारला पुढं विचारलं 'बरं, पुढं काय झालं?' तो पुढें सांगूं लागला:—

"१० डिसेंबर १९४५ रोजीं आम्हांला एच. एम्. एस्. ग्लेनीर्न बोटींवर चढविण्यांत आलें. बोटीच्या बॉयलर नजीकच्या खोलींत आम्हांला कोंबण्यांत आलें. त्या खोलींत आम्हांला वाफाराच देण्यांत

आला म्हणाना! आमच्यावर २४ तास सहा डच सैन्यांचा कडक पाहरा ठेवला होता! मात्र हे सहाजण मोठें भूतदयाशील असल्यामुळें त्यांनीं आम्हांला अन्नपाणी तरी ठीक पुरविलें."

अखेर २९ डिसेंबर रोजीं सिंगापूर मार्गानें आम्हीं मद्रासला पोंचलों. आम्हां ४५ जणांनाहि एका कँपांत ठेवून गुप्त पोलिसांनीं आम्हांला प्रश्न विचारून सतावलें. अखेर लाहोरला जाण्यासाठीं आम्हांला प्रत्येकीं पांच रु. देण्यांत आले; पण ते अपुरे असल्याची तक्रार आम्ही केल्यावर नंतर प्र. २० रु. देण्यांत आले. थंडी मी म्हणत होती अन् आमच्याजवळ तर पुरेसें कपडे नव्हते."

× × ×

( ५ )

इतक्यांत प्रेमची स्वारी दाखल झाली. आम्हीं सर्वांनीं उभे राहून 'जयहिंद' नें त्याचें स्वागत केलें. आमच्याशीं गप्पा सुरू करण्यापूर्वी प्रेमनें सकाळची न्याहरी उरकून घ्यावी, असें त्याच्या 'मा'नें–आईनें–सुचविलें. फिरून न्याहारीला फुरसत तरी मिळेल कीं नाहीं याचीच बिचारीला काळजी! 'मा'च्या इच्छेला मान देतांना प्रेम मला म्हणाला,

"माफ करा मला बरं का! येतोच मी लवकर; तोपर्यंत या मुलाबरोबर आणखी थोड्या गोष्टी करा"

"हो, आमच्या गोष्टी अगोदरच रंगांत आल्या आहेत. घाई नको. सावकाश न्याहारी करा" मी म्हटलें.

प्रेम भोजनगृहांत गेला त्यावेळीं घरांतील सर्व स्त्री–पुरुष आदरानें उभे राहिले आणि सर्वांनीं आझाद हिंद फौजेचें प्रार्थना–गीत म्हणण्यास सुरवात केली. या गीताचें संगीत इतकें कर्णमधुर आणि त्यांत व्यक्त होणाऱ्या भावना इतक्या हृदय भारून टाकणाऱ्या होत्या कीं, आतार, सत्यप्रकाश व मीहि एकदम लष्करी शिस्तींत उभे राहिलों आणि त्या गंभीर राष्ट्रगीताशीं समरस होऊन गेलों !

राष्ट्रगीत संपेपर्यंत त्या इमारतींत कसलाहि इतर आवाज झाला नाहीं. स्वयंपाकघरांतील आचाऱ्यानेंहि आपली हालचाल बंद ठेविल्यामुळें भांड्याचाहि खणखणाट नव्हता अन् झाडूवाल्याच्या झाडूचीहि 'खरखर' नव्हती; फार काय, बंगल्याबाहेर जंगी काळी मोटार झटकण्याचेंहि काम शोफरनें थांबविलें होतें !

आसपासच्या वातावरणांत पूर्ण स्तब्धता व शांतता नांदत होती; पण आमच्या हृदयांत मात्र देशाभिमानाच्या ऊर्मींची धाडधाड होत होती ! फार काय, माझ्या छातींत देखील या देशाभिमानी भावनेच्या भरतीचा अनुभव मी घेत होतो !

अखेर आझाद–हिंद गीत गांभीर्यानें आस्ते आस्ते हवेंत विरलें आणि आमच्या संभाषणाचा ओघ पुढें चालू झाला.

आतार बोलूं लागला, " माझ्या हकीगतीचा धागाच या आझाद–गीताच्या प्रवाहांत वाहून गेला ! टोकियो शहरीं देखील आम्हीं हेच गीत गात असूं. हें गीत-नाद कानांवर पडलें कीं, जगांतील इतर दृश्यें डोळ्यांपुढून पार नाहींशीं होऊन फक्त नेताजींची ती भव्य राजबिंडा मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते."

बोलतां बोलतां फिरून आतारचा कंठ भावनांच्या भरानें दाटून आला! शिस्तवान् शिपायाप्रमाणें तोल सांवरून आतार पुढें म्हणाला:—

" हां, कुठपर्यंत बरं आपण मजल मारली ?" भावनांशीं झगडून त्यांवर विजय मिळविण्याची ती त्याची धडपड पाहून मला कौतुक वाटलें आणि माझ्या नोटबुकांत टिपण करतां करतां मी त्याला सुचविलें—

" आमच्या जवळ कपडे नव्हते; थंडी तर मी म्हणत होती " इतकें सुचविल्यावर तोल पुरा सावरून आतार नेहमींच्या आवाजांत पुढें सांगू लागला—

" आम्हीं नंतर दिल्लीला पोंचलों आणि स्टेशनवरून तडक आझाद हिंद खटल्यांतील आरोपींचा बचाव करणारे वकील बॅ. असफ-अली यांच्या निवासांत दाखल झालों. त्यांनीं आम्हांला इतक्या आद-रानें वागविलें कीं, त्या अत्यादरानेंच आम्ही संकोचून गेलों! ६ जानेवारी १९४६ रोजीं आम्ही लाहोरला पोचलों आणि आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आमची हजीरि दिली "

मी मध्येंच विचारलें, " आझाद हिंद फौजेंत तुम्ही दाखल झाला त्यावेळीं तर तुमचें वय, अवघें १४ वर्षांचें होतें. शेतांत फुलपांखरांच्या मागें लागण्याचं किंवा रस्त्यांवर गोट्या खेळण्याच तुमचं तें वय! ते बालपणचें सोन्यासारखे जीवन सोडून, कडक व खडबडीत शिस्तीच्या, रात्रंदिवस हालअपेष्टांच्या आणि सदैव मरणाची भेवडा-वणारी करणाऱ्या या जीवनांत मुलांनों, तुम्ही कां उडी घेतलीत ? "

माझ्या या 'विचित्र' प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं आतार जणुं टपलाच होता! 'मरणाचा' मी केलेला उल्लेख संपतो न संपतो तोंच त्यानें आपल्या उत्तराची सरबत्ति सुरूं केली! "मला माझ्या देशाची सेवा अत्यंत प्रिय आहे. नेताजी आमच्या टापूंत आले आणि त्यांनीं आझाद-हिंद संघटनेचें नेतृत्व पत्करलें, त्याच क्षणीं आपल्या देशाची व देशबांधवांची सेवा करण्याची आपली फारा दिवसांची हौस पुरी होणार, याबद्दल माझी खात्री पटून, मी निश्चय केला कीं, याच आखाड्यांत आतां उडी घ्यावयाची. धाडसी कर्मवीर म्हणून नेताजींची ख्याती पूर्वींच मी ऐकली होती. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं जपानच्या मदतीची अरेरावी न पत्करतां, नेताजी 'आझद हिंद' फौजेची संघटना करणार हें पटल्याबरोबर, मी त्यांच्या सैन्यांत दाखल होण्यासाठीं पुढें सरसावलों. जपान आपलें साम्राज्यवादी जोखड आझाद-हिंदच्या मानेवर लादणार, असा थोडाहि संशय आला असता तर मी त्या संघटनेच्या वाऱ्यालाहि उभा राहिलों नसतो!"

"या बाबतींत नेताजींची प्रत्यक्ष ग्वाही पुढीलप्रमाणें होती:— 'जपान्यांची मदत घ्यावयाचीच म्हटलें तर ती मला मिळूंहि शकेल; परंतु केवळ हिंदी सैनिकांच्या संघटनेचे जोरावरच माझा हिंदुस्थान मला स्वतंत्र करावयाचा आहे.' नेताजींच्या या ग्वाहीमुळेंच मी आझाद-हिंद फौजेचा एक घटक बनलों."

"नेताजींना आम्ही देवाप्रमाणें मानीत असूं. अन् खरोखरच ते पुरुषोत्तम होते. निस्सीम स्वातंत्र्याच्या भावनेनें ते भारलेले होते. कोणतीहि परकीय सत्ता त्यांना दास बनवूं शकती ना. जपान्यांचे

घातकी हुकूम पाळण्याऐवजीं प्राणघातक गोळीला स्वतःचा बळी देण्याचें भयंकर दिव्यच त्यांनीं पत्करलें असतें!"

"आझाद–हिंद फौजेसाठीं सैनिक, लढाऊ रसद आणि द्रव्यबळ संपादन करण्याचे कामीं, अतिपूर्व टापूंत नेताजींना सहकार्याचा अनुभव कसा काय आला?" असा मी प्रश्न केला.

आतार उत्साहातिरेकानें सांगूं लागला—

"लष्करी शिक्षण देण्याची तयारी केली, त्यापेक्षांहि जास्त उमेदवार मी मी म्हणून भरतीसाठीं आले व ज्यांना नकार द्यावा लागला ते अतिशय नाखूष झाले! द्रव्य तर लाखोंच्या राशींनीं नेताजींच्या चरणीं वाहण्यांत आलें; तिकडील लोक नेताजींच्या चरणीं द्रव्याच्या राशी ओतूनच थांबले नाहींत तर, स्वतःच्या अंगावरील मूल्यवान् दागदागिनें देखील स्त्री–पुरुषांनीं त्यांच्या चरणीं वाहिले! प्रत्येक जाहीर सभेंत आपापलीं सोन्याचीं घड्याळें, बांगड्या, कर्णभूषणें व हस्तभूषणें यांचा नेताजी सुभाष यांच्या व्यासपीठावर पाऊसच पडे!"

सत्यप्रकाशचाहि उत्साह या प्रसंगीं अनावर होऊन तो मध्येंच सांगूं लागला "पीनांग येथें एका विराट सभेपुढें नेताजींचें भाषण चालू असतां एक गृहस्थ नेताजींच्या पुढें येऊन बोलला, नेताजी ह्या माझ्या सोन्याच्या कंठ्याचा स्वीकार करा. तो जिव्हाळ्याच्या भावनेनें मी आजपर्यंत जपून ठेविला होता! यावर नेताजी एकदम तापून बोलले "मला स्वतःला यांतील कांहींहि नको. स्वतःकरितां मी कांहींहि करीत नाहीं. आझाद–हिंद सैनिक हें महत्कार्य करण्यास तत्पर आहेत. माझ्याकडे येईल तें सर्व त्यांचें आहे!"

सत्यप्रकाशला प्रोत्साहन देण्यासाठीं मी विचारलें " नेताजींच्या आणखी कांहीं आठवणी सांगाल कां ? "

त्याबरोबर तो पुढें म्हणाला—

" एकदां टोकियोला नेताजी आले त्यावेळीं एका स्वागत-समारंभाला ते हजर होते. उत्कृष्ट पक्वान्नें, सुमधुर फळें व पुऱ्या देखील या मेजवानींत होत्या ! " तोंडाला सुटलेल्या पाण्याचा आवंडा गिळून सत्यार्थ पुढील वर्णन सांगू लागला:–" टेबलावर चकचकीत चमचे काटे व सुऱ्या होत्या. नेताजी उपहाराला सुरवात कशी करतात हे पहाण्यासाठीं मी उत्सुक होतों. मला सानंद आश्चर्य वाटलें कीं, चमचें काटे बाहेर सारून नेताजी हातांनीच जेवूं लागले ! एकदां देखील चमचा-कांटा त्यांनी वापरला नाहीं ! "

" नेताजी सदैव साध्या सैनिक अधिकाऱ्यांचाच पोषाख वापरीत. आझाद-हिंद सेनेचे प्रमुख व संघटक म्हणून मानाचीं पदकें वापरण्याचा नेताजींना अधिकार असला आणि तशीं पदकें त्यांनीं वापरणें इष्टहि असलें तरी तीं त्यांनीं कधींहि वापरलीं नाहींत. "

आतार महंमदनें नंतर आपलें कथासूत्र पुढें चालविलें—

" तात्पुरत्या आझाद-हिंद सरकारची स्थापना झाल्याच्या दुसऱ्याच दिवशीं सिंगापूर येथें नेताजींनीं एका विराट सभेपुढें भाषण केलें. जपाननें त्याला ' शोनॉन ' हें नांव दिलें होतें, हें आपण जाणतांच. या सभेच्या प्रसंगीं श्रोत्यां-वक्त्यांच्या डोक्यांवर मोठमोठ्या गारांचा वर्षाव होत होता ! परंतु आपल्याला आश्चर्य वाटेल कीं, सभेंतील

आपापली जागा स्त्री–पुरुषांनीच नव्हे, तर लहान मुलांनीसुद्धां, तसूभर देखील सोडली नाहीं ! भक्तिश्रद्धेनें दूरदूरचे प्रवास करून यात्रेकरू देवदर्शनासाठीं जागा धरुन बसतात, तसाच तो देखावा होता ! या प्रसंगीं नेताजींचें भाषण दोन तास अस्खलित झालें आणि लोकांनींहि मंत्रमुग्धांप्रमाणें तें ऐकलें–"

"मी त्या प्रसंगीं नेताजींचा दुभाष्या म्हणून काम करीत असल्यामुळें त्यांच्या सान्निध्यांतच होतों. नेताजीजवळ छत्री नव्हती. आम्ही कांहीं जणांनीं आपल्या छत्र्या त्यांचे डोक्यांवर धरण्याचे प्रयत्न केले; पण ते नाकारून नेताजी म्हणाले 'माझे हजारों लाखों बंधु–भगिनी छत्री-वांचून पावसांत ओले चिंब झाले असतां मी मात्र छत्रीचा आश्रय घ्यावा' हें भला कसें बरें शोभेल ?"

"जपानी नेताजींना कसे काय मानीत" असा प्रश्न मी मध्येंच विचारला.

उत्तरादाखल 'आतार' म्हणाला "हें भाषण एकेलेल्या कांहीं जपानी मित्रांनीं मला सांगितलें, आपल्या जीवनांत इतक्या उत्कृष्ट वक्त्याचें भाषण आपण कधींच एकलें नव्हतें. असामान्य स्वरूपाचे सद्गुण नेताजींच्या आंगीं असल्याची कबूली त्यांनीं दिली. 'पूर्व आशियाचा सच्चा खंदा पुढारी' असेहि नेताजींच्या गौरवपर उद्गार या जपानी मित्रांनीं काढले. दुसऱ्या एका जपानी मित्रानें मला ग्वाही दिली कीं, नेताजीवर आपला जितका विश्वास आहे' तितका दुसऱ्या कोणाही पुढाऱ्यावर नाहीं !"

"हिबिया पार्कमधील एका जाहीर सभेपुढें नेताजींचें एकदां भाषण

झालें. कांहीं हजार जपानी लोक हें भाषण ऐकावयास हजर होते. टाळ्यांचा इतका जोराचा कडकडाट वेळोवेळीं होत होता कीं, तो थांबेपर्यंत कित्येक मिनिटें नेताजींना स्तब्धच रहावें लागे ! नेताजींच्या उदात्त ध्येयवादानें असंख्य जपानी नुसते भारून गेले होते ! एखाद्या नव्या प्रकाशाचे दर्शन घडावें त्याप्रमाणें नेताजींचीं भाषणें ऐकणाऱ्या जपानी श्रोत्यांच्या डोळ्यांतून उत्साहाचें तेज नुसतें ओसंडतच असे ! ”

“ इंपीरियल युनिव्हर्सिटी ऑफ टोकियो या संस्थेच्या जपानी विद्यार्थ्यांपुढें एकदा नेताजींचे भाषण झालें. सभागृह सोडतांना मी एका जपानी विद्यार्थ्याला नेताजींच्या भाषणाविषयीं त्यांचे मत विचारलें. त्यानें ताबडतोब उत्तर दिलें कीं, नेताजी महापुरुष आहेत ! फार काय ज. टोजोपेक्षांहि ते मोठे आहेत ! उद्यां टोजो दिवंगत झाले तर जपानात शेंकडों टोजो त्यांची जागा भरून काढतील; पण नेताजींची जागा कोण भरून काढणार ? नेताजी जन्मसिद्ध पुढारी, प्रामाणिक पुरुष आणि त्यागी कार्यकर्ते आहेत ! असें म्हणून या जपानी तरुणानें हिंदी तरुणांना आदेश दिला कीं, तुम्ही सर्वांनीं नेताजींना पाठिंबा दिला पाहिजे, त्यांच्या जबाबदाऱ्यांचा बोजा तुमच्या हार्दिक सहकार्यानें हलका केला पाहिजे, आणि त्यांच्या दुःखाचे वाटे उचलून त्यांच्या उत्साहांत नवा जोम उत्पन्न केला पाहिजे. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्या-साठींच नेताजी झगडत असल्यामुळें त्यांच्या निशाणाचे अघाडीवर तुम्हीं हिंदी तरुणांनीं असलें पाहिजे. तें सांगतील तीं कामें तुम्हीं नितांत श्रद्धेनें उचलावी अन् त्यांनी कृतांत काळांचे जबड्यांत उडी घालण्यास सांगितल्यास तीहि घालावी ! स्वातंत्र्य हे रणांगणांवरच

गांठावयाचें ध्येय आहे. लांकडी व्यासपीठावरून किंवा बोलघेवड्या असेंब्ली–सभागृहांतून स्वातंत्र्य कधींच उदयाला येत नसते ! ”

“ ॲटम बॉंबमुळें बेचीराख झालेल्या हिरोशिमा शहरांत तुम्हीं कधीं गेला होता कां ? ” मी मध्येंच एक प्रश्न केला.

‘ आतार ’ सांगूं लागला:–“ हो पाहिलें ना तें शहर. शहरपणा काय उरला होता त्यांत ? जळून खाक झालेल्या मालमत्तेचे व इमारतीचे ते प्रचंड डोंगरच दिसले ! जीं कांहीं माणसें तिथं उरलीं होतीं तीं दुःख–जखमांनीं जर्जर झालेलीं, आणि प्राणांतीक वेदनांनीं विव्हळत असलेलींच बहुधा आढळलीं ! कांहीं लोक तर एकसारखे रक्तच ओकीत होते ! त्यांचीं अर्ध–नग्न शरीरें लाललाल जखमांनीं फुलून गेलीं होती अन् शरीरांवर एकहि केस कोठें उरला नव्हता ! ”

“ हॉस्पिटलमध्यें अति गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेले लोकहि मी पाहिले. माझ्या उभ्या हयातींत कांहीं इतका करुण–गंभीर प्रसंग मी कोठें पाहिला नव्हता ! रेडियो–ॲक्टिव्ह लहरींनी त्यांच्या हातांची त्वचा सोलून निघाली होती, अन् त्यांच्या कंबरेभोंवतीं ही त्वचा लोंबत राहून पहाणारांचें अंग शहारत असे ! आणि......

———

# भाग ४ था

## प्रेमची जुन्या दोस्तांशीं भेट

इतक्यांत आपली न्याहारी संपवून प्रेमची स्वारी आंत आली आणि आतारशीं चाललेलें आमचे संभाषण तेथेंच थांबलें.

सुरवातीला आमच्या थोड्या गप्पा झाल्या. कॉलेजमधील माझे स्नेही क. एशान कादीर यांचें कुशल मी प्रेमला विचारले. ज्याच्याविषयीं अभिमान वाटावा, असाच एशान हा मित्र होता. ही स्वारी सध्यां इंडियन मिलिटरी हॉस्पिटल्मध्यें असून त्याची तब्येत पुष्कळ सुधारली आहे, अशी त्याच्याविषयीं प्रेमनें खबर सांगितली.

इतक्यांत एका नोकरानें वर्दी आणली कीं, कांहीं आझाद–हिंद फौजेंतील सैनिक प्रेमला भेटण्यासाठीं आले आहेत. प्रेम त्याबरोबर मजकडे वळून म्हणाला !—

" माफ करा हं. या सैनिकांना अगोदर भेटलों तर चालेल ना ? तुम्हांला तिष्ठत ठेवावं लागतं याबद्दल मात्र वाईट वाटतं ! "

" छे, छे, मुळींच नाहीं, तुमच्या सहकारी सैनिकांची काळजीच तुम्ही प्रथम घेतली पाहिजे " मी म्हटलें.

प्रेम व्हरांड्याबाहेर पडला त्यावेळीं, सैनिकांच्या तालबद्ध पदक्षेपांचें आवाज ऐकूं आले व त्या मागोमाग ' जयहिंद ' ची उत्साही घोषणाहि माझ्या कानीं पडली !

अलीकडे ' जयहिंद ' ची घोषणा अनेक ठिकाणीं माझ्या कांनीं

अनुक्रम ७.७०.७०
विभाग ... ५१ : ८
क्रमांक
नों. दि.



पडते. रस्त्यावर गोट्या खेळणारीं मुलें 'जयहिंद' गर्जना करतात; पाय घसरून रस्त्यावर पडलेल्या घोड्याचे कानांत 'जय हिंद' गर्जना करूनच टांगेवाला त्याला उठवितो! लोकप्रिय पंजाबी नाटककार आय्--एस्–जोहार यांच्या निवासानजीक भिक्षा मागणारा छोकरा 'जयहिंद' म्हणून माझ्यापुढें भिक्षेचा हात पसरतो व केव्हां केव्हां त्याच्या हातावर मी कांहीं तरी नाणें टाकतों. एक दिवस एक पैसा असाच त्याच्या हातावर टाकला तर त्या पोरानें तो परत फेंकला! पोरगा म्हणतो "मालरोडचा मी भिकारी! मला कमींत कमी एक आण्याची भिक्षा पाहिजे!" मी त्याच्या हातावर मग एक पावली टाकली अन् म्हटले, "बेट्या, उद्यां गव्हर्नरच्या बंगल्याजवळ उभा राहून एक रुपया–भिक्षेचाहि हट्ट धरशील कीं!"

कांहीं वात्रट पोरें रस्त्यावरील वाहतुकींचें नियंत्रण करणाऱ्या 'गणेश टेबलाच्या' शिटीला दाद न देतां निसटून जात असतां मागें वळून त्याला वाकुल्या दाखवितात आणि 'जय हिंद' गर्जना करतात!

कारखान्यांत एखादी लोखंडी तुळई हालवितानां अवसान आणण्या-साठीं 'है जवान, जय हिंद' अशा गर्जना कष्टाळू कामगारहि करतात!

हॉटेलमधील हुषार पोऱ्या देखील जय हिंद, साहेब एक कप् कॉफी आणूं कां? म्हणून ऐटींत विचारतो!

× × ×

( २ )

पण वर उल्लेख केलेल्या अनेक 'जय हिंद' घोषणापेक्षां प्रेमला भेटण्यास आलेल्या अकरा आझाद–हिंद फौजी सैनिकांनीं दिलेली 'जय हिंद'ची खडी ताजीम मनावर कांहीं तरी वेगळीच परिणाम करणारी वाटली! त्यांच्या 'जय–हिंद घोषणेच्या दोन्हीहि शब्दांत प्रामाणिक तळमळ ओत–प्रोत भरली होती! त्या सैनिकांच्या सकंप आवाजांत ध्येयनिष्ठेचा मूर्तिमंत जिव्हाळा व्यक्त होत होता! नेताजी-पुढें ध्येयसिद्धीसाठीं त्यांनीं ज्या प्रतिज्ञा केल्या त्यांची ज्वलंत जाणीवच जणु त्यांच्या घोषणेंतून घोषित होत होती!

सैनिकांच्या त्या घोषणेचा माझ्या तरी मनावर इतका परिणाम झाला कीं, ती कानांवर आल्याबरोबर पटकन् उठून हे सैनिक आहेत तरी कसे, हें पाहण्यासाठीं मी बैठकीच्या खोलीबाहेर खेंचला गेलों!

संगिनी जमिनींत रोवाव्या, तशा दोन रांगांत, हे सैनिक प्रेमसमोर खडे होते. त्यांना पाहून औत्सुक्य व आदर यांच्या भरानें माझें काळीज थरारून गेलें!

प्रेमनें हलकेंच, हातानें खूण केली तेव्हां, ते सर्व सैनिक अर्ध-चंद्राकृतींत त्याच्या भोंवतीं जमा झाले. विजेची कळ दाबल्यावर जसे आकृतींत क्षणार्धांत व्यवस्थित फेरफार व्हावे, तशी या सैनिकांचीं शिस्तबद्ध, पण चलाख, हालचाल वाटली!

सर्वांचेच डोळे प्रेमकडे लागले. या सैनिकांवरील प्रेमामुळेंच आणि गतकालीन आठवणीमुळें प्रेम क्षणभर गोंधळून गेला! एकदां

जमीनीकडे नजर लावावी, एकदां झाड पांचोळ्यांकडे दृष्टिक्षेप करावा, तर, तिसऱ्या क्षणीं, त्या सैनिकांचे ते अर्धवर्तुळाकृतींतील चेहेरेच न्याहाळीत रहावे, अशी कांहीं वेळ त्याची स्थिति झाली.

या सैनिकांत कंबरेला पोक आलेला एक शीख होता; त्याचा चेहरा अक्रोडासारखा सुरकुतलेला आणि दाढी एकेरी निमुळती होती. एक मजबूत हाडापेराचा पट्टेबाज पठाण होता. त्याचे गाल गाजरासारखे लाल होते व डोळ्यांत विलक्षण चमक होती. एक खुजा पहाडी सैनिक होता. त्याचे वाटोळे गरगरीत गाल मजबूत जबड्यावर शोभत होते; एक हिशेबी हिंदु बनियाहि त्यांत होता. प्रेमच्या प्रत्येक शब्दागणिक तो अशी मान डोलवी कीं, जणु आपल्या दुकानांतील मापाचीच न्याहाळणी करतोय! ऐन जवानींतील एक मध्यम बांध्याचा शीखहि त्यांत होताच. आपल्या थोर घराण्याचा त्याला फार अभिमान दिसला!

अखेर सर्वांच्या मागून चवड्यावर उंच होऊन प्रेमकडे डोकावणाऱ्या एका हिंदु सैनिकावर माझी नजर गेली. त्यानें दाढी केली नव्हती अन् त्याचीं गालफडें खोल गेली होती. त्याचे डोळे मात्र तिरळे होते! या चकण्याचें तोंड प्रेमकडे असलें तरी सरळ नजरेनें त्याला प्रेमकडे पहातां येत नव्हतें! डोळ्यांतील बाहुल्या मध्यावर राखण्याची धडपड करी त्यावेळीं डोळ्याच्या कोपऱ्याकडे त्या पळत!

× × × ×

[ ३ ]

' किती प्रकारचीं माणसें ही ' मी माझ्या मनांत आश्चर्य व्यक्त केलें! 'राष्ट्रीय' या शब्दाचा व्यापक अर्थ या वेळीं मला समजला! ब्रिटिशांची ज्यांवर पकड नाहीं, जातीय मत्सराची ज्यांवर कृष्ण छाया नाहीं, त्या मानवी मूल्याला आजपर्यंत मी ' राष्ट्रीय ' समजत आलों. पण आज मला ' राष्ट्रीय ' या कल्पनेचें प्रत्यक्ष आणि मूर्तिमंत दर्शनच घडत होतें!

सर्व प्रकारच्या जातींतील, तरुण आणि वयस्क सैनिक देशांतील सर्व भागांतून आपल्या वरिष्ठाकडे आपल्या अस्तित्त्वाची वर्दी देण्यास आले होते.

' वरिष्ठाधिकाऱ्याकडे हजिरी देणें ' ही कल्पनाच या सैनिकांना गुदगुल्या करणारी व रम्य वाटत असावी, असें त्यांच्या उत्साहावरून दिसलें. या सैनिकाच्या उत्साहाच्या मला देखील इतकी मौज वाटली कीं, माझ्या बहिणींच्या पुढें बढाई मिरवतां यावी म्हणून तरी, आपण या सैन्यांत दाखल व्हावें, असें मला वाटलें!

" हं आटपा, बसा माझ्या गाडींत. तुम्हांला याच बाजूला जायचं-यना! मला १०–३० बाजतां वरिष्ठाधिकाऱ्याकडे हजिरी द्यायचीय " असं म्हणण्यात ' आझाद सैनिकांला ' किती आनंद होत असावा, याची कल्पना मला आली!

वरिष्ठाधिकारी म्हणून कांहीं चीज आहे, याची कल्पना, राष्ट्रीय दलांतील सुसंघटित नसलेल्या लोकांना असावी तशी नाहीं. आम्हां-पैकीं प्रत्येकाला असें वाटतें कीं, डॉ. गोपींचंद यांच्या तोडीचे आपणहि

आहों, चौधरी कृष्ण गोपाळदत्त आमच्या पेक्षां असे काय बुद्धिमान् आहेत ? अन् देवराज शेठी काय, आपल्याच पैकीं एक आहे !

उद्यां तुम्हां अम्हां पैकीं कोणीहि या पुढाऱ्या पेक्षांहि श्रेष्ठ होईल ! पण कांहीहि असले तरी, आज ते आपले वरिष्ठाधिकारीच आहेत, ही शिस्तीची जाणीव आपल्या ठिकाणीं क्वचितच असतें ! मग त्यांना आपण मधून मधून हजिरी दिली पाहिजे, याची कल्पना कोठून असणार ?

वरिष्ठांना हजिरी देण्यामागें आपण शिस्तीचे भोक्ते आहों, आज्ञा-पालन करण्याची आणि कर्तव्य पार पाडण्याची धमक आपल्या ठिकाणीं आहे, याची जाणीव आपल्या ठिकाणीं उत्पन्न होऊन कर्तृत्वाची विषेश जागृति आपल्या ठिकाणीं राहाते.

आज, वरिष्ठ पुढाऱ्याला भेटून येतांना व आल्यावर आपली वृत्ती कशी असते ? " गेलों, बऱ्याच गप्पा मारल्या. पुढील कामा संबंधीं सूचना विचारण्यास गेलों होतों, गांधीवादावर सिगारेटच्या धुरांत चर्चा केली ! म्हातारा अगदीं आहे तस्सा आहे ! अशीच वरिष्ठाधिकाऱ्यांना मदत करतां करतां आपणहि एक दिवस 'आघाडीचे वीर' बनून, दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगी राष्ट्रीय झेंडा फडकविणार " असं वरिष्ठ पुढाऱ्याला भेटून आल्यानंतरचे आपलं आळशी व बेजबाबदार 'मनोराज्य' असतं !

राष्ट्रीय चळवळींत वरील प्रकारची मनोवृत्ती असलेले माझ्यासारखे बरेच तरुण राष्ट्रकार्याच्या बागेंतून सुकुन् गळून पडणाऱ्या फुलांप्रमाणें सुकून गळून बाहेर फेंकले गेले आहेत ! राष्ट्रकार्यांत वसंतोत्सवाची

व राष्ट्रीय मनोवृत्तींत पूर्ण विकास पावलेल्या फुलोरी भावनांचीच ते सदैव अपेक्षा करतात! परंतु स्वातंत्र्य-लढ्याच्या चळवळींत सदैव वसंत व सदैव फुलते बगीचे कसे असणार? उन्हाळ्यामागून पावसाळा व नंतर हिवाळा अशी चळवळींतहि स्थित्यंतरें टाळतां येत नाहींत. अशा पावसाळ्या-हिवाळ्याच्या विविध आघातांत अस्थिर व दुबळ्या मनोवृत्तीचे तरुण राष्ट्रकार्यापासून च्युत होऊन सरकारी नोकऱ्यांच्या परतंत्र दुष्ट चक्रांत सांपडतात, कोणी रेडिओ खात्यांत अर्ज करतात, कोणी लष्करी खात्यांतील कारकुनीसाठीं खेटे घालतात, तर कुणी सरकारी माहिती-खात्याचे उंबरठे झिजवून 'मायबाप सरकारचे' गुलाम बनतात!

पसाभर तांदळासाठीं तडफडणाऱ्या बंगाली भूक-रोग्यांप्रमाणें सत्तेसाठीं धडपडणाऱ्या पंजाबी कॉंग्रेस पुढाऱ्यांना माझा 'जय हिंद' असो!

राष्ट्रीय संघटना शिस्तबद्ध करण्याचा कर्तव्याची हेळसांड करून पंजाबच्या कॉंग्रेस श्रेष्ठींनीं तरुण पिढींतील अनेक हिरे व मोती कचऱ्याच्या पिपांत फेंकलीं आहेत! डुकरांच्या उकिरड्यांवर मूल्यवान् मोतीं फेंकण्याचा चालू जमाना साऱ्या पंजाबचे कॉंग्रेस-श्रेष्ठीं असाच पुढें चालविणार, कीं राष्ट्रीय खजिन्यासाठीं त्यांची जपणूक करून आणि त्यांना पॉलिश देऊन व चकचकीत करून त्यांचीं मूल्यें वाढविणार?

ब्रॅडला हॉल मध्यें येशूख्रिस्त जर कांहीं दिवसांची पहाणी करील तर तो म्हणेल:—

" सुईच्या वेंजांतून उंट निघून जाणें सोपें आहे! पण ब्रिटिश साम्राज्यवाद्यांविरुद्ध एतद्देशीयांची 'अभेद्य अघाडी' उभारण्याचें कार्य कांहीं या पंजाबी कॉंग्रेसवाल्यांच्या हातून होणें नाहीं. म्हणून ब्रिटिश–सत्ताधाऱ्यांनीं इतक्यांतच कांहीं घाबरून जाण्याचे कारण नाहीं. ब्रिटिशांचे 'बाहेरून शत्रू पण आंतून मित्रच' असलेल्या या लोकांच्या हातीं ब्रिटिश साम्राज्य–सत्ता आगदीं सुरक्षित आहे "!

× × × × ×

( ४ )

विविध व विषम जातींच्या या आझाद–हिंद सैनिकांशीं प्रेमनें अंदाजें १५ मिनिटें गप्पागोष्टी केल्या. प्रत्येकाच्या घरची हाल–हवाल त्यानें विचारली आणि त्यांना कांहीं अडचणी असल्यास त्याहि विचारून घेतल्या. नंतर त्या सर्वांना त्यानें सांगितलें कीं, १५ जानेवारी रोजीं आपण दिल्लीस जात असून आझाद हिंद फौजेंतील सैनिकांच्या सुखसोयीं करतां 'आझाद–हिंद रिलीज कमिटी' नांवाची मध्यवर्ती संस्था स्थापन करणें, हा दिल्लीच्या प्रवासांतील आपला मुख्य हेतु आहे. आझाद–हिंद फौजेंतील प्रत्येक सैनिकाला सोयिस्कर आणि मानाचा काम–धंदा मिळावा, अशी तजवीज करण्यावर आपला कटाक्ष असल्याचेंहि त्यानें सांगितलें.

सर्वांना आपलें सदरील आश्वासन स्पष्ट ऐकूं जावें म्हणून प्रेमनें अर्धे पाऊल पुढें टाकलें होतें! अखेरचा निरोप या सैनिकांना देतांना प्रेम म्हणाला:—

" हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याकरितां शरीरांतील रक्ताचा अखेरचा थेंब सांडेपर्यंत आम्ही लढूं, असें वचन तुम्ही सर्वांनीं नेताजींना दिलं आहे, याची आठवण आहे ना तुम्हांला ? "

" होय होय " सर्व आझाद सैनिकांनीं एका आवाजांत होकार दिला !

प्रेम पुढें बोलला:—

" ठीक, आतां नेताजी आपल्यांत नाहींत. हिंदुस्थानाला स्वातंत्र्यहि अद्याप मिळालेलं नाहीं. आणि तुमच्या—माझ्या धमन्यांतून अद्याप रक्त सळसळत आहे. आतां आपल्यापुढं प्रश्न हा आहे कीं, ज्या पुढाऱ्यांपुढें आपण स्वातंत्र्य—ध्येयाकरितां लढण्याच्या प्रतिज्ञा केल्या, तो आपल्यांतून नाहींसा झाल्याबरोबर आपण आपला लढा सोडून द्यावयाचा कीं काय ? "

फिरून प्रत्येक आझाद—सैनिकानें मानेला जोराच्या नकाराचा हिसडा दिला आणि सर्वांनीं एक सुरांत गर्जना केली " नाहीं ! कधींच नाहीं ! ! "

प्रेम उत्तेजित होऊन पुढें म्हणाला:—

" पन्नास वर्षांवर कॉंग्रेसनें हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्या करितां एकसारखा झगडा चालविला आहे, हें तुम्ही जाणतां. म्हणून या पुढें आज पासून कॉंग्रेसच्या निशाणाखालींच हा लढा चालविणें हें आपलें कर्तव्य आहे. अतिपूर्व प्रदेशांत ही स्वातंत्र्याची लढाई आपण शस्त्रास्त्रांनीं लढलों; पण हिंदुस्थानांत कॉंग्रेसनें अहिंसावादाचें शस्त्र

पत्करलें असल्यामुळें, आपल्यालाहि यापुढें हेंच साधन व हेंच शस्त्र वापरावयाचें आहे ”

“ अतिपूर्व टापूंत हिंदी इभ्रतीचें प्रतीक नेताजी होते. हिंदुस्थानांतील त्याच प्रतीकाचें सौम्य सात्विक स्वरूप म्हणजे कॉंग्रेस होय. म्हणून कॉंग्रेसशीं एकनिष्ठ राहिलों तरच आपण आपली प्रतिज्ञा पाळली असें ठरणार आहे. होय नां ? ”

“ हो हो, आम्ही समजलों ” सर्व आझाद–सैनिकांनीं तावडतोब एक सुरांत उत्तर दिलें !

प्रेमनें आपला आदेश पुढें चालू केला:—

“ माझा तुम्हांला आतां असा सल्ला आहे कीं, देशांतील वेगवेगळया पक्षांनीं जें प्रचाराचें जाळें सर्वत्र पसरलें आहे, त्यांत तुम्ही सांपडूं नका. या पक्षप्रवर्तकांचीं ध्येयें तुमच्या कल्याणाचीं नाहींत. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीं साधन म्हणून तुमचा उपयोग करण्यावर त्यांचा कटाक्ष आहे. ”

“ या पुढें तुम्हांला कॉंग्रेसची निष्ठा पाळावयाची आहे; म्हणून तुम्हांवर कांहीं संकटें आलीं किंवा तुम्हांला कांहीं अडचणी आल्या तर, तुम्ही आपापलीं गाऱ्हाणीं कॉंग्रेस–कमिट्यां पुढेंच मांडावयाचीं आहेत. ”

“ बरं आतां मला दुसऱ्या एका समारंभाला हजर रहावयाचें असल्यामुळें मला तुमचा निरोप घ्यावयास पाहिजे. तुमचं आणखी कांहीं काम मजकडून होण्याजोगं आहे कां ? ”

शूर आझाद–सैनिकांनीं यावर एका आवाजांत उत्तर दिलें "आम्ही आमच्या वरिष्ठाधिकाऱ्याकडे आपली हजिरी द्यावयास व त्यांचे दर्शन घेण्यासच आलों होतों. आमचें काम असें दुसरें कांहीं नाहीं ?"

नंतर प्रेमनें प्रत्येकाशीं हस्तांदोलन केलें. आझाद हिंद फौजींनीं 'एक कतार' करून प्रेमला 'जय हिंद' ची भव्य सलामी दिली! प्रेम त्यांच्यासमोर एखाद्या राजासारखा शोभला!

आतां ज्या पवित्र्यांत प्रेम आत्यंतिक स्थैर्यानें व ताठ उभा होता अशा पवित्र्यांत मी त्याला कधींच पाहिलें नव्हतें! 'जय हिंद' म्हणून त्यानेंहि या वेळीं जी घोषणा आझाद–सैनिकांच्या सलामीचा स्वीकार म्हणून केली, तितकी भव्य घोषणा व तितका भव्य घनगंभीर आवाजहि, मी कधीं ऐकला नव्हता!

आपल्या प्रिय दोस्त–सैनिकांच्या नवदर्शनानें आपण आराकान जंगलच्या, रणक्षेत्रांतच फिरून उभे आहों असं प्रेमला या वेळी वाटत असावं कां? कां आपला कसलेल्या सैनिकांबरोबर आघाडीवरच आपण कूच करीत आहों असं त्याला वाटलं असावं?

× × × × ×

(५)

आझाद सैनिक निरोप घेऊन गेल्यावर प्रेम आमच्या बैठकीच्या खोलींत येऊन म्हणाला—

"माफ करा हं, आपल्याला मी इतका वेळ तिष्ठत बसवलं याचं मला वाईट वाटतं! साडे दहाहि झालें. यामुळें या पुढच्या संकेत-

समारंभासाठीं मला निघालेंच पाहिजे. पीपल्स अॅश्यु. कंपनीच्या कचेरींत चार वाजतां मला वृत्तपत्र-प्रतिनिधींना मुलाखत द्यावयाची आहे. तेव्हां तिथंच आपणहि या. आझाद-हिंद-फौजेच्या संघटनेची कल्पना उगम कशी पावली, मूर्तरूप कशी झाली, त्या संघटनेची पुढें वाढ कशी घडली आणि तिचे हेतू काय, या संबंधींचा खुलासाच मी या मुलाखतींत करणार आहे, तिचा आपल्यालाहि फार उपयोग होईल, अशी मला खात्री आहे."

मी प्रेमजवळ वृत्तपत्रप्रतिनिधींच्या मुलाखतीचे वेळीं हजर राहण्याचें ताबडतोब कबूल केलें.

नंतर माझें 'कुप्रसिद्ध' फाइल बैठकीच्या खोलींतून घेऊन मी बाहेर आलों आणि माझ्या छोट्या ऑस्टिनमध्यें बसतों तोंच एक टॅक्सी धडधडत प्रेमच्याच इमारतीपुढें उभी राहिली! आश्चर्याची गोष्ट ही कीं त्या टॅक्सींतून धिलॉन अन् त्यांची पत्नि हें आझाद-हिंद जोडपंच खालीं उतरलं! मी लगेच माझ्या गाडींतून टुणकन् बाहेर पडलों आणि माझा मीच या जोडप्याला परिचय करून दिला! "तुमची कांहीं मिनिटें मला मुलाखत हवी आहे." असंहि लगेच सांगून टाकलं! 'मी जरा स्नान करून येतोच बाहेर' असा धिलॉननेंहि रुकार दिला.

आमचीहि स्वारी वाचस्पतीसह फिरून बैठकीच्या दिवाणखान्यांत शिरली. अन् तिथंच हजर असलेल्या आतार व सत्यप्रकाश या दोन युवकांशीं आणखी गप्पा सुरू केल्या! हिंदुस्थानचें आजचें राजकीय वातावरण समजून घेण्यास हे दोघेहि युवक फार उत्सुक दिसले. मीहि सविस्तरपणें आजच्या हिंदी राजकारणाचा या तरुणांना परिचय करून

देऊन माझ्या वेळाचा सदुपयोग केला! दोघेही फार लक्ष देऊन माझें प्रवचन ऐकत होते.

या दोन युवकांशीं संभाषण करीत असतांना माझ्या ध्यानांत येऊन चुकलें कीं, ते केवळ सैनिक म्हणूनच विकसित होत नसून राजकीय क्षेत्रांतीलहि ते उगवते तारे आहेत! हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हेंच त्यांचें एकमेव ध्येय दिसलें. प्रत्येक प्रश्नाकडे या एकाच दृष्टि-कोनांतून पहावयाचें, हाच या तरुणांचा बाणा होता. कोणता पक्ष सत्तारूढ होणार किंवा कोणत्या व्यक्तींच्या हातीं जबाबदारीचीं सूत्रें जाणार, याची त्यांना मुळींच फिकीर दिसली नाहीं!

'स्वातंत्र्य अन् केवळच स्वातंत्र्यच' अशा एकाच ध्येय-निष्ठेनें प्रत्येक प्रश्नाचा विचार करणारीं अशीं किती एकनिष्ठेच्या ध्येयाचीं माणसें आज हिंदुस्थानांत आहेत बरें? स्वातंत्र्य-संपादन केल्यानंतर आपल्याला काय लाभ होणार, या विषयींहि बेफिकीर राहणारे निःस्वार्थी व शुद्ध ध्येयाचे लोक तरी आपल्या देशांत आज किती आहेत?

वरील प्रश्नाचें उत्तर आपण सर्वच जाणतां! मग मी तरी असल्या उत्तराचा पिच्छा कशाला पुरवूं?

× × × ×

# भाग ५ वा

## धिलॉनशीं परिचय

स्नान झाल्याबरोबर धिलॉन आला आणि माझ्या शेजारींच बसला. पुढें काय झालें त्या तपशिलांत शिरण्यापूर्वी धिलॉनचा विशेष परिचय करून देणें उचित होईल.

धिलॉन तरुण असून उंच जवान आहे. त्याच्या कातडीचा रंग खडबडीत पण कमावलेल्या कातड्यासारखा आहे. प्रेम इतके त्याचे गाल भरदार नाहींत. अंगावर मांस बेताचें पण अंगकाठी कसदार अन् भरीव आहे. प्रेम इतकी वाजवीपेक्षां जास्त चरबी मात्र त्याच्या अंगावर नाहीं.

धांवण्याच्या शर्यतींतील अव्वल दर्जाचा उमेदवार म्हणून धिलॉनचा कोणी परिचय करून दिला तर तो शोभून जाईल. दहा मैल धांवण्याच्या शर्यतींत त्यानें विक्रम केला आहे, असें कोणी सांगितल्यास त्याच्या खोल गेलेल्या गालांवरून, कोणालाहि तें खरें वाटेल. मध्य आघाडीच्या हॉकी खेळाडू इतकी त्याची शारीरिक तंदुरुस्ती व कसदारपणा निःसंशय आहे.

धिलॉनची नजर सदा फिरती आहे. त्याचे डोळे तसे चमकदार नाहींत. डोळ्याभोंवतीं काळसर कडा आहेत समोरासमोर बसलें कीं, त्याचे डोळे प्रथम समोरच्या व्यक्तीवर क्षणभर स्थिरावतात अन् मग फिरूं लागतात. मग समोरच्या व्यक्तीशीं बोलत असल्याची त्याला आठवण होते अन् मग निदान विनयशील कर्तव्य म्हणून तो तुमच्याकडे नजर राखतो. डोळ्यांना लगाम लावूनच जणु तो तुमच्या डोळ्यांशीं आपले डोळे भिडवितो !

पण हें कर्तव्य पार पडलेसें वाटल्यावर फिरून धिलॉनची नजर सभोंवार फिरूं लागते. आपल्या नजरेंतून जणुं तो पुढील शब्दच सभोंवतालच्या माणसांशी बोलत असतो !—

"मी तुमच्याशी बोलत असतां माझी नजर एकसारखी तुमच्या नजरांशीं भिडलीच पाहिजे, असें थेडेंच आहे ? माझे शब्द तुम्हांला समजलें म्हणजे झालं नां ? तुम्ही बोलतां तें सर्व माझ्या कानीं पडतें. तुमचं बोलणं मी लक्षपूर्वक ऐकतों; इतकंच नव्हे तर त्यांतील विशेष प्रश्न व शंकाकुशंका इत्यादींचा विचारहि करतों. फार काय, पूर्ण तोल संभाळून बोलणाऱ्या हुशार माणसाप्रमाणें तुमच्या प्रश्नांना सुसंबद्ध अशीं उत्तरेंहि देतों. तरीहि मी तुमच्याकडं एक सारखं पहावं, जणु तुमच्या माझ्या डोळ्यांचा एक सारखा संगम होत रहावा, असा कां तुमचा आग्रह ? कां इतका माझ्या डोळ्यांवर तुमचा जुलूम काय म्हणून ?"

"ईश्वराची शपथ, नेताजींची शपथ, बाबानों, माझ्या डोळ्यांना जरा मोकळं सोडा ! झुडपांत लहान मुलं फुलपांखरां मागं धावतात तसं धावण्याची माझ्या डोळ्यांना मुभा द्यांना ! शपथ आहे तुम्हांला माझ्या हुतात्मे आझाद–हिंद फौजेंची. प्रेम व शहानवाझची शपथ आहे, माझ्या डोळ्यांच्या वाटेस जाऊं नका !"

धिलॉनचा आवाज मर्दानी आहे. अगदीं मध्यपंजाबच्या शीख-जाठ वीराला शोभेसा आहे. अर्धवट मिटलेल्या ओठानं लाडं लाडं आंग्ला-ळलेलं बोलणं धिलॉनला आवडत नाहीं ! असलं बायकी थाटाचं बोलणं ब्रँडीचें घुटके घेत घेत कांहीं नाजूकसाजूक पंजाबी तरुण बोलत असतात ! आपल्या आवाजाचा प्रवाह नैसर्गिक व भरदार ठेवणंच धिलॉनला आवडतं.

खडबडीत, जंगली म्हणा वाटलं तर, पण मर्द माणूस म्हणवून घेणं

धिलॉनला पसंत दिसतं. या विशेषणांतील मर्दपणालाच त्याच्या व आमच्याहि दृष्टीनं खरं मूल्य आहे.

वास्तविक ' पुरुष ' हें नावच पुरेसं असावं; पण ' पुरुष म्हणजे स्त्री नव्हे तो ' इतकीच आपली पुरुषत्वाची कल्पना झाली असल्या-मुळेंच, ' मर्द ' या विशेषणाला अलीकडे महत्त्व आलंय !

पुरुष या शद्वाचा आस्तिक अर्थच आजकाल आपल्यांपैकीं फारच थोडयांना समजतो. कोणता तो पौरुष्याचा आस्तिक अर्थ ? पुरुष म्हटला कीं त्याचा आवाज भरदार व स्पष्ट असला पाहिजे. त्याचे सांधे मजबूत अन् छाती रुंद असली पाहिजे; अन् त्याचें दर्शन खडबडीत पण सौम्य असलें पाहिजे.

आजकालचे आपले तरुण आरशा समोर उभें राहून अर्धा तास दाढी करतात अन् नंतर पाऊण तास प्रेमाची चटोर गाणी गात बंद स्नान-गृहांत अंग धूत असतात ! यांना कोणीकडून ' पुरुष ' समजावं बरं ?

असल्यांना ' पुरुष ' बनविल्याबद्दल ईश्वरदेखील पश्चात्ताप करीत असेल ! धिलॉनसारख्या मर्द पुरुषांशीं देवानं या ' बायकी ' तरुणांची तुलना केली तर, त्यांची बायकीपणाची हौस फेडण्यासाठीं पुढील जन्मीं त्यांना तो बायकाच बनवील !

पण मला वाटतं, या बायकी तरुणांना देवानं बायका तरी कां बनवावं ? आज पुरुष असूनहि ते बायकांसारखे चोचले करतात, तर उद्यां प्रत्यक्ष बायकाच बनले तर आणखी काय करतील कोण जाणें ! पावडरीच्या हौदांत लोळून आपाद मस्तक बगळे बनतील, गालांना रंग चो-चोपडून

गालांची लाल लाल डाळिंबे बनवितील, अन् ओठांना लिपस्टिका घांस-घासून ओठांचे ज्वलंत निखारेच करून सोडतील ! !

निदान मला तरी पुढील जन्मीं देवानं पुरुषच बनवावं. मग मला पुढील जन्मीच्या या बायका डाव्या हातीं आरसा अन् उजव्या हातीं पावडर—फूल घेऊन कशा लचकतील ती मौज पहावयास सांपडेल !

पण कुणी लेकानं पाहयलाय पुढील जन्म ? त्या काव्यमय हवेच्या फवाऱ्यांत न शिरावं हेंच ठीक !

× × × × ×

(२)

धिलॉनचं व माझं संभाषण सुरू होण्यापूर्वींच एक पोस्टमन् आंत आला. त्यानं दिलेल्या टपालांत केवळ धिलॉनला आलेलींच कमींत कमी दोन डझन पत्रं होतीं !

त्यांतील कांहीं पत्रं उघडून त्यांवर धिलॉननं घाईघाईनं नजर फिरविली. पण एक पत्र मात्र तो विशेष लक्षपूर्वक वांचूं लागला. काय बरं असावं त्या पत्रांत ? लवकरच आझाद-हिंद फौजेच्या सर्वच सैनिकांना सोडण्यात येणार असा अंदाज देणारे हिंदुस्थान सरकारच्या होम डिपार्टमेंटचं तर तें पत्र नसेल ! कां सुटका झाल्याबद्दल धिलॉनचें अभिनंदन करून आझाद हिंद फौजांची समग्र माहिती ब्रेल्सफर्डनं या पत्रा मार्फत विचारली असावी ? आपल्या जवळ राहून सत्याग्रहाची दीक्षा घेण्याचे निमंत्रण गांधीजींनीं या पत्रानें धिलॉनला तर दिलें नसेल ?

एखाद्या अट्टल खुनी इसमाच्या आंगठ्याचा ठसा, ठसा–तज्ज्ञ बारकाईनं न्याहाळतो, तसं या पत्रांत धिलॉन डोकं खुपसून कां बरं बसला असावा ?

बाकी असल्या बाबतींत भराभर तर्क करण्याचं तरी काय कारण ? नुसत्या तर्कांचा काय उपयोग ?

एका स्थानिक कॉलेजच्या विद्यार्थ्यानं पाठविलेलें हें पत्रं होतं ! पत्र बरंच लांब होतं. पण त्यांतील कांहीं वाक्यांचा सारांश नमूद करण्यास हरकत नाहीं.

गुरुबक्षसिंग धिलॉन याच्याविषयीं या विद्यार्थ्याला एका काळीं फार अभिमान होता. त्याला " वीर पुढारी " म्हणून तो मानी ! पण धिलॉनचे प्रत्यक्ष दर्शन घडलें त्याच क्षणीं या विद्यार्थ्याचा हृदयांतील ' वीर पुढाऱ्याची ' मूर्ति भंग पावली ! शांतम् पापम् ! शांतम् पापम् ! ! शीख धर्माचें प्रतीक असे ते पवित्र डोक्याचे व दाढीचे ' केस ' किहो हा ' वीर पुढारी ' गमवून बसला ! केवढा हा अधःपात ? स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या धिलॉनला हा विद्यार्थी आजपर्यंत ' थोर पुढारी ' म्हणून मानीत असला तरी, या ' केश–संहारा ' मुळें ही त्याची सर्व श्रद्धा ढेकळाप्रमाणें पाण्यांत विरघळून गेली !

हें पत्र वाचींत असतां धिलॉनच्या चेहेऱ्यावर चिडीच्या व तिरस्काराच्या आंठ्या उमटत होत्या.

उजव्या हातीं तें पत्र घेऊन आणि आम्हां प्रेक्षकांपुढं फडकावून धिलॉन बोलला :—

" पाह्यलंत मला आतांच आलेलं हें पत्र ? आतांपर्यंत असली किती तरी पत्रं मला आलीत ? मी लाहोरांत असतांना असली आणखी किती पत्रं येतात कोण जाणें ! "

" या पत्र–लेखकाला माझ्या उत्तराची अपेक्षाच नाहीं ! मी उत्तर पाठविणारच नाहीं, याचीहि त्याला खात्री असावी ! ठीक आहे, बेट्याला मी एकदां जाहीरच उत्तर देऊन टाकतों ! "

गुरुनानकचा अस्सल शीख धर्माचा बाणा हृदयांतील रक्तांत सळसळत असलेल्या धिलॉनच्या काळजांत त्या पत्रांतील कोणत्या निष्ठुर शब्दांची सुरी खुपसली गेली असावी, याची खूण त्याच्या डोळ्यांतील ठिणग्यांतून व्यक्त होत होती !

कांहीं वेळ आपली नजर नेहमीं सर्वत्र फिरणारी नजर दिवाणखान्यांतील रुजाम्यावर खिळवून त्या रुजाम्यावरील तिकोनी व अष्टकोनी आकृतीकडेच जणु तो पुढील जाब विचारीत होता:—

" सांगा, माझ्या कांहीं धर्मबांधवांनींच माझ्यावर इतका विचित्र घुस्सा कां करावा ? परिस्थितीमुळें नुसती केसांना रजा दिल्याबरोबर माझ्या धर्मबंधूच्या दृष्टीनं मी इतका 'एकदम् पतित' ठरावाना ? माझ्या हनुवटीवर मी चार केस वाढूं न दिल्याबरोबर देशाच्या स्वातंत्र्यासाठीं मी केलेला अनेक प्रकारचा त्याग विस्मृतीच्या गर्तेत गाडला जावा अं ? अन् पूर्वी सारखे ' केश ' फिरून वाढविल्याबरोबर माझ्यावर शद्बांची आग पाखडणाऱ्या या टीकाकारांच्या आदराच्या सिंहासनावर मी फिरून एकदम उड्डाण करणार कां ? त्यांच्या या धमक्यांपुढें कां· मी मान वांकवावयाची ? केवळ या लोकांना खूष करण्याठीं ' तो नत

द्रष्ठ सेफ्टीरेझेर ' या पुर्डे मी हातीं धरणार नाहीं, अशी मी प्रतिज्ञा करावी ? बेट्यांनो, द्या या सवालाचा झटकन् जबाब ! "

रुज्ञम्यावरील त्या आकृतींनीं धिलॉनला पुढील आशयाचा जबाब दिला असावा कां ?—

" वीरा, अशी घिसाडघाई करूं नको ! हा महत्वाचा तात्विक प्रश्न आहे. त्याच्या दोन्हींहि बाजूंचा विचार कर. डोक्यांत राख घालून कांहीं तरी घाईनें करण्यासारखी ही बाब नव्हे " !

वृत्तपत्रव्यवसायी या नात्यानें या प्रश्नाला जिज्ञासेचें स्वरूप देऊन मी धिलॉनला हळूंच विचारलं.—

" खरंच केसांना आपण कां रजा दिली ? " बाकी हा प्रश्न फार व्यक्तिगत वाटत असल्यास उत्तराचा आग्रह नाहीं, असा विनयपूर्ण खुलासाहि करण्यास मी विसरलों नाही !

" छे छे, तशांतला कांहीं प्रकार नाहीं, हो, " अशी सुरवात करून मोठ्या मनाच्या धिलॉननें खुलासा केला :—

" बरेच दिवस मी अंथरुणाला खिळलों होतों. तेव्हां एकदां केस साफ करण्याचा सल्ला डॉक्टरनेंच मला दिला. १९४३ सालीं वैशाख महिन्याच्या द्वितीयेला मी असं क्षौर केलं. "

× × × × ×

( ३ )

इतकं बोलून ताजं टपाल ट्रंकेंत ठेवण्यासाठीं धिलॉन वरच्या मजल्यावर गेला. परत आल्यावर अर्धातास खास 'मुलाखत ' मला केव्हां मिळेल म्हणून मी विचारलं.

" ठीक आतांच बारा वाजलेत. या वेळीं एका खेड्यांतील जाहीर सभे पुढें माझं भाषण चालूं असावयाचं. तिथं मला सोडावं अशी टॅक्सीवाल्याला माझी सूचना होती; पण बेट्याचा अद्याप पत्ताच नाहीं ! म्युनिसिपल हद्दीच्या बाहेर मोटार नेण्याचा परवाना मिळविण्यासाठीं बाहेर गेला आहे. तो आला कीं मला त्या खेड्याकडे तडक गेलं पाहिजे. तेव्हां उत्तम उपाय म्हणजे माझ्याबरोबरच तुम्हीहि चलावं म्हणजे वाटेंत गप्पा मारतां येतील " !

" वा, मग तर मौजच होईल. " असं म्हणून मी धिलॉनचे त्या औदार्याबद्दल आभार मानले !

आम्ही अर्धा तास वाट पाहिली, पण टॅक्सी आलीच नाहीं ! शेवटीं मी सुचविलं कीं माझी गाडीं बाहेर आहे. तिला मान दिलात तर जाऊं आपण तिच्यांतून ! बहुतेक सर्व पुढाऱ्यांना मी माझ्या गाडींतून हिंडवलं आहे, मग या नव्या वीराला मिरविण्याची ही संधि कां साधूं नये, असा मी विचार केला !

नेताजी कॉंग्रेसचे अध्यक्ष असतांना मी माझ्या ऑस्टिनमधून त्यांना हिंडविलें होतें. कोणी म्हणतील काय बेटा, स्वतःची अन् स्वतःच्या गाडीची प्रौढी मिरवतोय पहा ! म्हणेनात बिचारे ! माझ्या-सारख्या वृत्तपत्र व्यवसायीला याबद्दल प्रौढी तरी कां वाटूं नये ? नेताजींना मी माझ्या छोट्या गाडींत मिरविलें ही प्रौढी मिरविण्या-जोगी गोष्ट नाहीं, असं आतां तरी कोण म्हणेल हो !

हजारों लोक नेताजींच्या दर्शनासाठीं ते लाहोरांत आले

त्यावेळीं तडफडले तरी त्यापैकीं किती जणांना त्यांचं ओझरतं तरी, दर्शन घडलं ?

पण नेताजी, माझ्या बाजूला फ्रंट सीटवर, अगदीं माझ्या शेजारीं, पंधरा मिनिटें बसले ! अन् माझ्याशीं बोलले देखील ! नाहीं कां ही प्रौढी मिरविण्यासारखी घटना ?

—××× —

आपल्या सारख्या सामान्य जनांच्या गबाळ जीवनांत चमकण्या-जोगे फारच थोडे प्रसंग येतात. आपली बहुतेक जीवनें म्हणजे रुक्ष नीरस प्रवासासारखीच ! तेव्हां अशा वैयक्तिक आठवणींचीं प्रकाश-किरणें केव्हां त्यांत चमकलीं तर त्यांच्या मार्गदर्शनाचं कोडकौतुक आपण कां बरं करूं नये ? जीवनांच्या रुक्ष खडकाळ प्रवासांत क्वचित लाभणारं, असलं मार्गदर्शन, जीवनाला प्रोत्साहन व आनंद पुरविणारं आणि अभिमानास्पदच नाहीं कां ?

( ४ )

धिलॉन माझ्याबरोबर बाहेर आला आणि माझ्या गाडीकडे व माझ्याकडे पाहून त्यानें स्मित केलें ! तो आतां खो खो हंसत सुटणार कीं काय, याचीच मला भीति वांटली ! परंतु सभ्यपणा त्याच्या हाडीं-माशीं खिळला असल्यामुळं "ठीक, आपला फार आभारी आहे. जाऊं या तुमच्या गाडींतून" असं म्हणून त्यानें माझ्या विनंतीला मान्यता दिली.

माझा पाहुणचार धिलॉननें पत्करला आणि माझ्या ऑस्टिन गाडीचा अपमान केला नाहीं, यामुळं मीहि जरा फुशारून गेलों.

धिलॉननं आपलं सामान माझ्या गाडींत ठेवण्याची सूचना नोकराला केली, पण सामानाचे डाग इतके होते कीं, ते सर्व माझ्या गाडींत मावणें शक्यच नव्हते. शिवाय धिलॉन माझ्या गाडींत जोड-प्यानं बसणार होता !

आपण सर्वजण अन् इतकं सामान माझ्या गाडीला झेंपणं शक्य नाहीं, हें अखेर मला सांगावंच लागलं ! कोण यातना झाल्या मला तसं सांगतांना !

'मग आतां करणार तरीं काय' धिलॉन जरा त्रासिक आवाजांतच बोलला !

' कांहीं फिकिर करूं नका, माझ्या कांहीं बड्या मित्राकडं जाऊन त्यांच्या बड्या गाड्यांपैकीं एखादी मिळते कां पहातो ? ' मी शांतपणें सांगितलं.

' फार नाहींना वेळ करणार ? ' धिलॉननं विचारलं.

' फार तर अर्ध्या तासांत येतो ' असं मी चटकन उत्तर दिलं.

मी माझ्या पांच सहा बड्या मित्रांकडे गेलों. पण माझ्या दुर्दैवानं एकहि ठिकाणावर मिळाला नाहीं, या ऐन संधीलाच बेटे कुठं भटकले इश्वर जाणें ! हजारांच्या नोटा काळ्या बाजारांत वटविण्यासाठीं तर गेले नसावे ? आपल्या या नफेबाजीमुळं माझी व धिलॉनची इतकी फजीति करण्याची वेळ या लक्ष्मीधरांनीं आणल्याबद्दल मी मनांतल्या मनांत त्यांना खूप शिव्या दिल्या !

पण कांहीं झालं तरी कोणाची तरी गाडी मिळवायचीच, अशा

निश्चयानं मी बाहेर पडलों होतों. राजरस्तानं फेऱ्या मारतां मारतां कोणी तरी दोस्त भेटेल या हेतूनें मी तशा चक्रा मारीत राहिलों !

असली चक्कर-भ्रमंति मला फार वेळां करावी लागली नाहीं. दुसऱ्याच फेरीला माझा मित्र मनमोहन आपली मोठी गाडी ऐटींत हांकीत माझ्या समोरच येत असलेला आढळला ! मी त्याच्या नांवानं मोठमोठ्या हांका मारल्या ! जणु काय, त्याच्यावर एखादा दरोडेखोर हल्ला चढवीत असतांना मी त्याला सावध करीत होतो ! समोरून आडवा येऊन त्याची गाडी मी एकाएकीं थांबेल असें केलें ! एकदम् ब्रेक दाबल्यामुळं त्याच्या गाडीच्या टायर्सचं काय झालं असेल हरी जाणें !

मी सर्व प्रकार सांगितल्यावर मनमोहन म्हणतो, " बेट्या, सरळ माझ्याकडंच कां नाहीं आलास ? वाटेल त्याप्रसंगीं माझी मदत तुला आहे हें ठाऊक नाहीं तुला ? "

मी त्याच्या प्रेमाची जाणीव व्यक्त करून अदबीनें माझें शीर वाकविलं !

अखेर या प्रशस्त गाडींत धिलॉनचं सामान भरलं. पुढल्या सीटवर मिसेस् धिलॉन व मागील बाजूस आम्ही तिघं बसून गाडी चालू केली.

बिचारा धिलॉन प्रकाशक व लेखकांच्यामध्यें चेंपला गेला ! आतां आपल्या पोटांतील सर्व खळमळ हे लोक बाहेर काढणार, असं तर बिचाऱ्याला वाटलं नसेल ?

पण आम्ही लोक इतके कां निर्दय आहों ? त्यानं आपलं अंतःकरण

खोलून बोलावं, इतकीच आमची इच्छा! नेताजींच्या खास आठवणी त्यानं मन मोकळेपणानं सांगाव्या इतकीच विनंति आम्ही त्याला केली.

× × × ×

( ५ )

लवकरंच आम्हां तीघांचं संभाषण सुरू झालं. चिमण्या चिंवचिंव करतात तसे अम्ही गाडीच्या मागील आसनांत कुजबुजत होतों!

'या तीन आझाद वीरांची सुटका करविण्यांत हिंदुस्थानांतील कोणत्या प्रांतानं जास्त श्रेय घेतलं?' असा हुषार व्यवसायीला साजेसा सवाल मनमोहननें टाकला.

धिलॉननें ताबडतोब उत्तर दिलं:—

"यांत बुद्धिमान् लोकांचा भाग किती अन् बहुजनसमाजाचा वांटा किती, हें ठरवणं कठीण आहे. एक गोष्ट मात्र मला स्पष्ट केलीच पाहिजे कीं, बुद्धिमान् राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या सहकार्यावांचून केवळ बहुजन समाजाच्या हुल्लडीमुळं आमची सुटका शक्य झाली नसती."

"आमच्या वरील खटला चालू असतां, सर तेजबहादुर सप्रु, भुलाभाई देसाई व रा. ब. बद्रीदास यांच्यासारख्या वयोवृद्धांनीं जें असामान्य धैर्य आमच्या बचावाकरितां दाखविलें त्याचें आम्हांला वेळोवेळीं आश्चर्य वाटे. त्यांना त्याप्रसंगीं विश्रांति म्हणून कसली ती ठाऊक नव्हती! चार महिने आमच्या बचावाकरितां हे व इतर पुढारी सतत झटत होते. त्यांच्या त्या वेळेच्या जीवनांतून 'विश्रांति' हा व्यवहारच नाहींसा झाला होता! अन् असल्या धडपडीची

फलश्रुति तरी किती कल्पनेच्या बाहेर होती ? एच. जी. वेल्सच्या ' शेप ऑफ थिंग्ज टु कम् ' ( आगामी सृष्टीची रूपरेषा ) सारखाच नव्हता कां तो प्रकार ?

" बचाव-मंडळाच्या उर्फ डिफेन्स कौन्सिलच्या या पुढाऱ्यांचे डोळ्यांपुढें ' आमच्या सुटकेचें ' जे स्वप्न होतें तें त्यावेळीं तरी स्वप्नच होतें; पण त्याचा त्यांना एकसारखा ध्यास लागला होता, असं जे मी म्हणतो, ती मुळींच अतिशयोक्ति नाहीं. सरकारी वकिला-विरुद्ध समोरासमोर बचावाच्या बाजूनें आमचे जे पुढारी वकील बसले होते त्यांच्या कामाची निष्ठा व तळमळ केवळ अवर्णनीय आणि असामान्य होती ! "

" या बचाव-समितीच्या पुढाऱ्यांचे व तिच्याशीं सहकार्य करणाऱ्या देशभक्तांचे आभार तरी आम्ही कोणत्या शब्दांत मानावे, तें मला सुचत नाहीं. शब्दकोशांतील शब्द हुडकण्यास आम्ही वर्षभर बसलों तरीहि हें काम अपुरेंच राहीलसें मला वाटतें. "

" शिवाय या बचावाच्या बाबतींत पं. नेहरूंनीं जी अपूर्व अशी कामगिरी बजावली ती कोण विसरूं शकेल ? प्रवाही सोन्यानं जरी आभाराचं पत्रं मी पं. नेहरूंना लिहिलं तरी त्यांनीं या बाबतींत केलेल्या त्यागाच्या मानानें तें कःपदार्थच ठरेल ! "

× × × ×

( ६ )

आमचा संवाद वरीलप्रमाणें रंगांत आला असतां आमची गाडी बऱ्याच वेगानं चालली होती. मॉडेल टानऊची हद्द गाडीनं ओलांड-

त्यावर वेग जरा कमी करण्यास मी आमच्या सारथ्याला खुणावलं. कारण प्रवास जलदीनं न संपतां गप्पाना आणखी वेळ मिळावा हा माझ्या मनांतील डाव ! हा डाव ओळखूनच चाणाक्ष धिलॉन मनांतल्या मनांत हंसलासे दिसलें !

पण वेड्या सारथ्यानें त्याची गति अगदींच मंद केली ! जणु काय लग्नांतल्या मिरवणुकींतूनच आम्ही चाललों होतों ! मला त्याचा आनंदच झाला म्हणा !

" ए भल्या गृहस्था, इतकं रेंगाळत नको हं. " धिलॉननें मला टोला दिला !

मग एखाद्या सौदा पटविणाऱ्या व्यापाऱ्याच्या थाटानें मनमोहन म्हणतो " हरकत नाहीं; आपण यांत तडजोड करूं. आणखी थोडा वेग दे रे बाबा ! "

मग आपल्या भाषणाचे सूत्र पुढें चालू करून 'धिलॉन' म्हणाला:—

" मात्र बहुजनसमाजानं आमच्या सुटकेकरितां जी सार्वत्रिक चळवळ केली तिच्या विषयींहि आम्ही केव्हांहि कृतज्ञच राहिलं पाहिजे. आम्ही लाल किल्ल्यांत असतांना तर 'या आझाद वीरांची सुटका करा' अशी घोषणा जणु हिंदुस्थानांतील ४० कोट जनता एक मुखानं सरकारच्या कानीं करीत असल्याची प्रचीति आम्हांला होत असे !"

" आमचे शेतकरी हातीं नांगर धरूनच जणु नोकरशाहीला म्हणत " या आझाद हिंद वीरांनीं तुमचं काय केलं ? आमच्या स्वातंत्र्या-करतांच ना ते लढले ? त्यांना काय म्हणून तुम्ही शिक्षा करतां ? "

कारखान्यांतील कामगारहि हातांतील हत्यारें व हातोडे परजून नोकरशाहीला सवाल टाकीत :—

" स्वातंत्र्याच्या स्थंडिलावर आपापल्या मूल्यवान् तारुण्यांचा होम करणाऱ्या या आझाद हिंदवीरांना आम्ही ' देशद्रोही ' म्हणून कधींच ठरवूं देणार नाहीं, याची याद राखा ! "

आपापलीं अभ्यासाचीं पुस्तकें कपाटांत फेंकून, अखिल हिंदुस्थानांतील विद्यार्थि-तरुणांनीं ठिकठिकाणीं आमच्या सुटकेसाठीं मिरवणुकी काढल्या आणि त्या अमर्याद व प्रचंड मिरवणुकींतील आरोळ्यांनीं ब्रिटिश सदसद्विवेक बुद्धीला खडखडावून जागें केलें !

ब्रिटिश नोकरींतील सैनिकांसह हिंदुस्थानांतील सर्व जातींतलि व पक्षांतील बहुजनसमाज म्हणूं लागला :—

"ब्रिटनच्या हितासाठीं व स्वातंत्र्यासाठीं ज्या आमच्या हिंदी सैनिकांनीं रक्त सांडलें, त्यांना तुम्हीं शूर, धीर वीर म्हणून त्यांचा गौरव करतां ! मग हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं रक्त सांडून जीवनाचे होम करणाऱ्या या आझाद वीरांना तुरुंगांत कोंडून तोफेच्या तोंडीं देण्याचे प्रसंग त्यांच्यावर कां लादतां ? हे वीर आमच्यांत परत आलेच पाहिजेत. ते आम्हांला वंदनीय आहेत. त्यांच्या शौर्यधैर्याचा कित्ता आमच्या-पुढें अनुकरणासाठीं अवश्य पाहिजे." अशी बहुजनसमाजानें एकजात मागणी केली.

प्रत्येक सुशिक्षित लेखकानें आपल्या लेखांत ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना उद्देशून पुढील आशयाचीं विधानें आमच्या बाबतींत केली:—

" हिंदी आझाद फौज जपान्यांची हस्तक नव्हती. स्वतंत्र हिंदुस्थानच्या तात्पुरत्या आझाद-सरकारची ती फौज होती. ही फौज आपल्या आझाद सरकारखेरीज कोणत्याहि इतर आझाद सरकारची हुकमत मानीत नसे ! "

" अनेक स्वतंत्र राष्ट्रांच्या सरकारांनीं आझाद हिंद सरकारला मान्यता दिलेली होती. प्रत्येक परतंत्र राष्ट्राला, स्वतःच्या स्वातंत्र्यासाठीं, ज्या सरकारच्या सत्तेखालीं तें असेल, त्या सरकारविरुद्ध, लढण्याचा हक्क असल्याचा ऐतिहासिक कायदेशीर आधारहि आहे. या ऐतिहासिक वहिवाटीला सत्ताधाऱ्यांनीं मान दिलाच पाहिजे. म्हणून आमच्या या आझाद-वीरांच्या एका केसालाहि आम्ही धक्का लागूं देणार नाहीं !"

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना अखेर हें सत्य पटलें कीं, अखिल हिंदुस्थानांतील जनता एका आवाजानें, आणि आत्यंतिक सखोल व तळमळीच्या आवाजानें, सांगत आहे कीं, आझाद वीरांना सोडलेंच पाहिजे. तेव्हां बहुजनसमाजाच्या अशा दुर्दम्य आवाजापुढें नमतें घेऊन आम्हांला मुक्त करणें त्यांना भागच पडलें, असा या घटनेचा मतितार्थ आहे.

× × × × ×

( ७ )

या भाषणाचे शेवटी पुढील सीटवर बसलेल्या आपल्या पत्नीच्या डोक्यावर एक चापट मारून धिलॉन मोठ्या लडिवाळपणानें समोरच्या एका झाडाकडे बोट करून म्हणालाः--

" याच झाडावर आपली गाडी घालून, मी तुला शिकवीत असतां, आपल्या गाडीचा चक्काचूर करणार होतीस, आठवतं कां ? "

" हं, मला आठवतो तो प्रसंग! पण आहे कुठें तें झाड ? " गोड आवाजांत तितक्याच लडिवाळपणानं मिसेस धिलॉन उद्गारल्या.

" तें पहा, पहा तें ' असं स्मित हास्यपूर्वक धिलॉननें त्या झाडाकडे बोट नाचवीत म्हटलें.

पण रस्त्यावर दुतर्फा झाडेंच झाडें असल्यामुळं आणि हीं प्रश्नोत्तरें होईतो मोटार अर्धा मैल पुढें गेल्यामुळं मिसेस धिलॉन तें विशिष्ट झाड पाहूं शकल्या नाहींत, याचं आम्हां तिघांनाहि थोडं वाईट वाटलं !

× × × ×

( ८ )

मग नेताजींच्या कांहीं आठवणी सांगण्याची विनंति मी फिरून धिलॉनला केली.

जरा डोकं खाजवून विचारपूर्वक धिलॉन बोलला :—

आठवणी पुष्कळच आहेत हो. पण त्यांतल्या कोणत्या सांगण्या-जोग्या आहेत हेंच मला नीट सुचत नाहीं.

" ठीक आहे, मी मदत करतों. नेताजी, सुभाषची व आपली पहिली भेट केव्हां झाली हें तर आठवतं ? " मी विचारलं.

" रंगूनमध्यें त्यांची माझी पहिल्यानं भेट झाली. ज. अझीझ अहंमद यांनीं निरोप सांगितला कीं, कांहीं प्रश्नांची प्रत्यक्ष माझ्याशींच चर्चा करावयाची असल्यामुळं, नेताजी सुभाष मला भेटूं इच्छितात. " धिलॉननें पुढील वृत्तांत चालू केला:—

या निरोपाप्रमाणं मी गेलों त्यावेळीं माझ्या छातींत धाड धाड होत होतं! अन् तें त्यावेळीं स्वाभाविकच नव्हतं कां? कारण आझाद हिंद फौजेच्या सर सेनापतींना मी प्रथमच भेटणार होतों! शिवाय आधुनिक भारताच्या अव्वल दर्जाच्या पुढाऱ्याशींहि माझी ती पहिलीच भेट होती!

या दिवशीं नेताजी फारच गर्दींत होते. वृत्तपत्र प्रतिनिधींना एक मुलाखत देऊन ते नुकतेच ठाण्यावर परतले होते.

नेताजींच्या ए. डी. सी. नें मला त्यांच्या बैठकीच्या जागेंत सोडलें, मला तेथें अगदीं साधा मामला दिसला. मी समोर पाहिलें तों खुद्द नेताजीच एका कोपऱ्यांत उभे होते!

माझ्याशीं हस्तांदोलन करून नेताजींनीं मला खालीं बसण्याची सूचना केली. उगाच वेळ न घालवितां ताबडतोब मुख्य मुद्यालाच त्यांनीं हात घातला! एकदम माझ्यावर त्यांनीं प्रश्नांचा भडिमारच केला. त्यांत शिळोप्याचे राजकारण नसून सर्व प्रश्न शुद्ध लष्करी कामकाजाचे होते!

मला पंधरा मिनिटें नेताजींच्या विविध प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं लागलीं. त्यांत लष्करी हालचालींबाबत अगदीं बारीक सारीक तपशिलाचे प्रश्न होते. मी उत्तरें देतच राहिलों; अन् पूर्ण समाधान होईपर्यंत नेताजींचे प्रश्नहि थांबले नाहींत!

अनेक बाबींत नेताजींचे प्रश्न इतके मर्मभेदक होते कीं, त्यांचीं समाधानकारक उत्तरें देण्यासाठीं मला माझ्या टिपण बुकाचाच उपयोग करावा लागला!

नेताजींनीं इतक्या अल्पावधींत लष्करी हालचालींवर इतकें असामान्य प्रमुत्व कोठून अन् कसं मिळवलं याचा मला अचंबा वाटला ! आपले कार्यक्षेत्र आमूलाग्र जाणणाऱ्या व्यक्तीपुढें मी उभा असल्याची मला खात्रीच पटली. प्रत्येक बाबीची खडान् खडा माहिती त्यांना हवी होती ! त्यांच्या बुध्दीला गैरमहत्त्वाचा असा विषयच नव्हता !

नेताजीसारख्या अव्वल दर्जाच्या सर सेनापतींचें मी समाधान करूं शकलों याबद्दल माझा मलाच अभिमान वाटला.

अखेर चहाचे दोन पेले आले व त्यांपैकीं एक नेताजींनीं मला दिला. मग आम्ही उभयतांनीं पानसुपारीहि घेतली.

आम्ही आमच्या चर्चेंत अगदीं गर्क असतां, त्या घराबाहेर एक प्रचंड आवाज झाला ! नेताजी लगेच उठून एका खिडकीशीं उभे राहिले. नेताजींचं लक्ष इतक्या अल्पावधींत खेंचून घेणारा तो आवाज कसला असावा, याचं मी आश्चर्य करूं लागलों.

नेताजींनीं मला खुणेनं बोलावलं तेव्हां मी त्यांच्या जवळ गेलों. माझ्या खांद्यावर हात ठेवून आणि बोटानें समोर दाखवून ते म्हणाले, " पाहिलात् तो वानर ? बिचारा चिडून गेला आहे ! खालचे लोक त्याला भारीच सतावतात. कधींहि तो हें विसरणार नाहीं ! "

एकाद्या विषयांतून पटकन् मन काढून दुसऱ्या विषयाशीं समरस होण्याच्या नेताजींच्या या असामान्य शक्तीचें मला नवल वाटलें ! महत्वाच्या लष्करी चर्चेंत मन गुंतलं असतां या वानरचेष्टांचा इतका सखोल अभ्यास यांनीं केव्हां व कसा केला ?

लष्करी विषयांवर नेताजींचें असामान्य प्रभुत्व असलें तरी, विविध रंगी निसर्गाशीं तादात्म्यपूर्ण अभ्यास करण्याचीहि त्यांना विलक्षण आवड दिसली ! त्यांचें अंतःकरण अत्यंत संवेदनाक्षम व भूतदयाशील दिसलें !

× × × ×

( ९ )

' नेताजी ' हें नांव उच्चारतांना धिलॉनच्या घनगंभीर मर्दानी आवाजांतहि भावनेचा कंप होई ! तें नांव वारंवार उच्चारल्यामुळं तर अखेर त्याचा आवाज भावनोत्कटतेनें गुदमरल्यासारखा होऊन तो पुढं बोलूं लागलाः—

त्यानंतर नेताजींनीं आणखी तब्बल दोन तासपर्यंत माझ्याशीं लष्करी प्रश्नांवर चर्चा केली. अखेर त्यांच्या त्या फेरतपासणीच्या अग्निदिव्यांतून मी सहीसलामत बाहेर पडलों, याचा मला केवढा तरी आनंद झाला !

"सध्याच्या कामांत तुम्हांला समाधान वाटतं कां," असा नेताजींनीं मला प्रश्न केल्यावर मी नकारार्थी उत्तर दिलं व मला कोणतं काम आवडेल तेंहि सांगून टाकलं !

अखेर मी निरोप घ्यावयास उठलों तेव्हां "कसे आलांत ?" असा प्रश्न नेताजींनीं केला. ' मोटारीनं ' असं मी उत्तर दिल्यावर परत जाण्यास पुरेसं पेट्रोल आहे कां याची त्यांनीं चौकशी केली ! आपल्या सहकाऱ्यांच्या सुखसोयींची किती कसोशीनें आणि स्वयंभू आदरानें

ते काळजी घेत असत याची कल्पना या सामान्य प्रसंगावरून कोणालाहि येईल.

× × × ×

(१०)

आपल्या जागीं थोडंसं मागं टेकून स्मितहास्य करीत धिलॉन पुढें म्हणतात, " झालं का हो, तुमचं समाधान ? "

माझ्यासारख्या अधाशी वृत्तव्यवसायाचं ' समाधान ' असं कधींच होणं शक्य नाहीं ! तेवढ्या प्रश्नापुरतं माझं समाधान झालं असलं तरी जास्त समजून घेण्याची हाव कधीं सुटली आहे ? तेव्हां " अशी माझी फसवणूक करूं नका. आणखी एखादी आठवण सांगा ना ! अशी सांगा कीं, जी अव्वल दर्जाची बातमी ठरावी." असं मी म्हटलं.

हें ऐकून धिलॉन जरा फिरून सावरून बसला अन् थोडसं रागानं, थोडसं लडिवाळपणानं बोलला, " ठीक ठीक. ऐका तर ! "

एकंदरींत आम्ही वृत्तव्यवसायी मोठे क्रूर अन् भूतदयाशून्य प्राणी खरे, यांत शंका नाहीं !

धिलॉन बोलूं लागला:—

मी आतांच वर्णन केलेल्या मुलाखतीचें प्रसंगीं मला दिसलं कीं नेताजींचे डोळे नुसते लालच झालेले नव्हते तर सुजलेलेहि होते ! मला अगदींच राहवेना म्हणून मी मध्येंच त्यांना विचारलं. " आपल्या डोळ्यांना काय झालंय ? " ' छे, कांहीं विशेष नाहीं ' असं म्हणून ते फिरून मुद्याकडे वळले !

स्वतःच्या तब्येतीकडे नेताजींनीं इतकें दुर्लक्ष्य करणें मला बरं वाटलं नाहीं. म्हणून कांहीं तरी इलाज करण्याचा मी सल्ला देणार, याचा अंदाज आगाऊंच बांधून, मला पुढं बोलूं न देतां हातरुमालानं एकदां डोळे पुसलेसे करून पुढील महत्वाच्या लष्करी प्रश्नांवरच नेताजींनीं संभाषणाची गाडी खेचीत नेली!

अखेर नेताजींचा निरोप घेऊन बाहेर आल्यावर त्यांच्या ए. डी. सी. ला• मी तोच प्रश्न केला. "काय हो' नेताजींच्या डोळ्यांना काय झालंय?"

त्या ए. डी. सी. नं उत्तर दिलं:—

कित्येक दिवस २४ तासांतील एका तासापेक्षां जास्त झोंप नेताजींनीं घेतलेली नाहीं.

एकाद्या सामान्य माणसानें दोन दिवस झोंप न घेतां काम केलें तर त्याचाच त्यानें केवढा तरी गाजावाजा केला असता! पण नेताजींचं सर्वच असामान्य! अनेक दिवस सतत जागूनहि आपण जाग्रण करून कामें करतों ही वस्तुस्थिति लपवून ठेवण्यासाठींच कोण त्यांची धडपड!

नेताजींची काम करण्याची ही अचाट तऱ्हा आणि तें लपविण्याचा स्वभाव पाहून, या माणसाचें मांस-रक्त तरी कोणत्या विशिष्ट मालमसाल्याचं आहे, याचा मी अचंबा करीत राहिलों!

त्यानंतर सात दिवसांनीं मला फिरून भेटीस बोलावलें. त्या वेळीं त्यांच्या खास खाजगी खोलींत त्यांची माझी भेट झाली. याच

छोट्या खोलींत ते झोंपत व अभ्यासहि करीत असें पाहून आणि त्या खोलीची अगदीं साधी मांडणी पाहूनहि मी थक्क झालों !

नेहरू–ब्रिगेडचें नेतृत्व नेताजींनीं माझ्यावर सोंपविल्याचें त्यांनीं मला सांगितल्यावर मला फार आनंद झाला. माझ्यावर त्यांनीं टाकलेल्या विश्वासाला पात्र होण्याची मी पराकाष्ठा करीन आणि कधींही त्यांच्या विश्वासाला अंतर देणार नाहीं, अशी मी नेताजींना ग्वाही दिली !

नेताजी स्मितपूर्वक म्हणाले, " माझा तुमच्या शद्बांवर पूर्ण विश्वास आहे ! "

—××× —

# भाग ६ वा

## धिलॉनची खेड्याला भेट

आमचं संभाषण इतकं रंगलं होतं कीं, आमची मोटार धिलॉनच्या खेड्याचे आवारांत केव्हां शिरली याचीहि आम्हांला दाद नव्हती ! मोटारीभोंवतीं एकदम् लोकांची खूपच गर्दी जमली; जणु या लोकांना बक्षीस देण्यासाठीं उंची कनोजी अत्तरांच्या कुप्याच आम्हीं या मोटारींतून आणल्या होत्या !

मोठ्या मुष्किलीनं धिलॉनला मोटारींतून बाहेर पडतां आलं ! ' धिलॉन झिंदाबाद ' च्या गगनभेदी घोषणांत फुलांचे हारामागून हार त्याच्या गळ्यांत पडले !

त्या खेड्याच्या या ' अनभिषिक्त राजाला ' अखेर नजीकच भरलेल्या

सभेच्या व्यासपीठावर नेण्यांत आलें, मी व मनमोहनहि बाहेर पडलों. आमच्याहि अंगावर कांहीं हार फेंकण्यांत आले !

एका कोपऱ्यांत राहून त्या विराट जमावाची हालचाल मी बारकाईनं पहात होतों. एखाद्या कांच-कटोऱ्यांतील पाण्याप्रमाणें खेडुतांचा जमाव अगदीं अस्थिर होता. हातीं तकतकीत लाठ्या घेतलेले लष्करी पेशाचे जाट लोक त्यांत होते; तान्हुलीं मुलें हातीं घेतलेल्या आयाही त्यांत होत्या. त्या तान्हुल्यांची व धिलॉनची नुसती दृष्टादृष्ट झाली तरीहि पुढें ती मुलं धिलॉनसारखी 'शूरवीर' निपजतील अशी त्या मातांची श्रद्धा असावी ! अगदीं खाटेला खिळलेले दोन जख्ख म्हातारे शीखहि खाटांसकट धिलॉनच्या दर्शनासाठीं आणलेले दिसले ! बिछान्याच्या उशांवर टेकलेल्या त्यांच्या मानाहि उतारवयामुळं लट-लट कांपत होत्या !

या दोन वृद्धांनीं धिलॉनला लहानपणीं अंगाखांद्यावर खेळविलं असावं; आतां इतकी अफाट कीर्ति संपादन केलेल्या त्या पोराचा 'वीर' बनलेल्या धिलॉनला एकदां तरी डोळे भरून पहावं, असं या म्हाताऱ्यांना वाटलं असेल कां !

एकंदरींत धिलॉनच्या सभोंवार प्रेम, आदर व वात्सल्य या स्निग्ध भावनांनीं भरलेलं वातावरण होतं; हवा कुंद आणि धुळीनं भरली असली तरी, या स्निग्ध भावनांमुळें ही धूळ म्हणजे उत्सवाचा गुलालच होता म्हणांना !

गलक्याचा मला वास्तविक तिटकारा; पण यावेळीं तो वात्सल्ययुक्त प्रेमाचा गलका मला विलक्षण सुखद वाटला ! त्याचं स्वरूप

स्वयंस्फूर्त आणि अकृत्रिम कळकळीचं होत, हेंही त्याचं कारण असूं शकेल! कोठेंही विसंवादी वा विरोधी सूर नसल्यामुळं निरुपद्रवी मधुकरांच्या गुंजारवासारखा तो मळका सुमधुर होता.

आपल्या गांवचा धिलॉन लाखों लोकांना प्यार व पूज्य झाला, याचाच त्या खेडुतांना परमावधीचा अभिमान वाटत असावासं दिसलं. याचमुळें खेडुतांचा तो आनंद व उत्साह आणि त्याचा सार्वत्रिक स्वयंस्फूर्त आविष्कार यांना कोणालाहि प्रतिबंध करावासा वाटला नसल्यास त्यांत काय नवल?

× × × ×

(२)

व्यासपीठावर बसलेल्या धिलॉनच्याहि मनावर गांवकऱ्यांच्या या अकृत्रिम प्रेमाचा विलक्षण परिणाम झालेला दिसत होता! कांहींहि हालचाल न करतां तो मंत्रमुग्ध पुतळ्यासारखा स्थिर झाला होता. खेडूत बांधवांच्या विराट रूपांशीं जणुं तो एकरूप झाला असावा. धिलॉन वरची नजर बाजूला काढूंच नये, असं जणुं लोकांना वाटत असावं! त्या प्रेमसमाधीचा भंगच होऊं नये असं धिलॉनलाहि वाटत होत कां?

परस्पर प्रेम-समाधीच्या या मुग्धावस्थेचा, अखेर एका मध्यम वयाच्या खडबडीत कॉंग्रेसवाल्यानं भंग केला! चार शब्द लोकांना सांगण्याची त्यानं धिलॉनला सूचना केली.

अखेर धिलॉन बसल्या जाग्यावर सावकाश उठून उभा राहिला.

अकृत्रिम प्रेमानं थबथबलेल्या कृतज्ञतापूर्ण घोगऱ्या आवाजांत त्यानं बोलावयास सुरुवात केली.

विलक्षण आश्चर्याची गोष्ट ही कीं, कोणीहि सांगावं न लागतां धिलॉनचं भाषण सुरू झाल्याबरोबर खेडुतांचा तो प्रचंड जमाव एकदम स्तब्ध झाला! जणुं कांहीं जादूनं सर्वांची तोंडं एकाएकीं बंद झालीं होतीं!

धिलॉन म्हणाला:—

"लाल किल्ल्यांतुन सुटल्यापासून आतांपर्यंत मी अनेक जाहीर सभांतून बोललों. पण आजच्या सभेंतील आपुलकीचा ओलावा कांहीं न्याराच वाटतो. इतक्या अलोट प्रेमाला मी खरोखर पात्र आहे कां? ज्यांनीं देशाच्या स्वातंत्र्याकरितां आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या असे असंख्य शूरवीर व त्यांना या त्यागाची प्रेरणा देणारे नेताजी, अशा प्रेम–श्रद्धा–भक्तीला निःसंशय पात्र आहेत"

"आझाद हिंद फौजेच्या निर्भय शूरधीर वीरांकरितां तुमच्या या अलोट मुग्ध प्रेमाच्या देणगीचा मी स्वीकार करतों आणि त्यांचा एक प्रतिनिधि या नात्यानं त्यांनाच ही प्रेमादराची अमूर्त पण अलोट देणगी अर्पण करतों."

"आतांच एका वक्त्यानं माझं माझ्या सुटकेबद्दल अभिनंदन केलं. वास्तविक माझं तुम्ही अभिनंदन कसलं करतां? तुमचंच अभिनंदन मी करावं, असा हा प्रसंग आहे. तुम्ही लोकांनीं माझ्या सुटकेची परिणामकारक मागणी केली अन् त्या प्रभावी मागणीला ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना मान् द्यावा लागला! अर्थात् हा तुमचाच नव्हे कां जय?"

" आम्ही आझाद हिंद फौजेंत नांवं दाखल केलीं त्यावेळींच आम्ही आमच्या प्राणांवर पाणी सोडलं आहे. आतां गोळ्या घालून ठार केलं किंवा मोकळं सोडून हार घातले, तरी दोन्हीचीहि किंमत एकच ! "

" हिंदुस्थानाबाहेर आम्ही देशाकरतां कष्ट सोसले; पण खुद्द हिंदुस्थानांत आमच्या हातून अद्याप सेवेची तपश्चर्या घडलेली नाहीं. "

" आम्ही बंदिखान्यांत असतां आझाद हिंद फौजेनें देशाकरतां बजावलेली कामगिरी तुमच्या कानीं पडेल कीं नाहीं याची आम्हांला शंका होती; ब्रिटिश प्रचारतंत्रानं व यंत्रानं आझाद हिंद फौजेविषयीची खरी माहिती दडपून टाकण्याचा क्रूर निर्धार केला होता ! पण पं. नेहरूंनीं निषेधाची गर्जना केल्याबरोबर, ब्रिटिश प्रचार तंत्र-यंत्रांची कपाडें खिळखिळीं झाली, अन् आझाद-हिंद घटनेच्या बातम्या हळूहळू बाहेर निसटल्या ! "

" एक स्वतंत्र लष्करी संघटना या स्वरूपांत आझाद हिंद फौज देशाच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ लढत होती, हे लाल किल्यांतील खटल्यानं आतां सिद्ध होऊन चुकलं आहे. हाच आमचा अत्यंत अभिमानास्पद असा विजय होय. "

" मी ब्रह्मदेशांत असतांना एक इंग्रज मला टोंचून बोलला कीं, तुझेच देशबांधव तुझ्या तोंडावर थुंकतील ! त्याला मी साफ उत्तर दिलं होतं कीं, तुझ्या या वल्गना फोल आहेत ! स्वातंत्र्यासाठीं लढणारे शूर त्यागी शिपाई म्हणून आमचे देशबांधव आमचा गौरवच करतील, असं मी या इंग्रजाला बजावलं होतं ! तेंच माझं भविष्य आज खरं ठरलं, म्हणून गर्जून सांगण्यास मला अभिमान वाटत आहे. "

" अतिपूर्व प्रदेशांतील आमचं जीवन सुख–सोयींचं होतं, असा गैरसमज कोणी करून घेऊं नये. तो एक अमर्याद असा झगडाच होता! जीव जगण्या इतकंच 'रेशन' उर्फ पोटगी आम्हांला मिळे. कित्येक वेळां उपाशी देखील झोपावं लागे! पण येवढं मात्र तुम्हांला सांगितलंच पाहिजे कीं, अन्नाचे फांके पडत असले तरी, तेथील स्वातंत्र्यध्येयानें भारलेलें वातावरण, अन्नाचं अजीर्ण करणाऱ्या पण स्वातंत्र्याच्या ध्येयाला ढगाळ बनावणाऱ्या, इकडील कोंदट वातावरणापेक्षां किती तरी आल्हादकारक वाटे, यांत शंकाच नाहीं! "

बोलण्याच्या आवेशांत चवथ्यावर उभा राहून आणि आपले पिळदार बाहू प्रेक्षकांपुढें उंच धरून धिलॉननें गर्जना केली :—

**" बंधु भगिनींनों, गुलामगिरींतील उत्कृष्ट मेवामिठाईपेक्षां स्वातंत्र्याची नुसती हवा खाऊनहि राहणं मी जास्त पसंत करीन!"**

धिलॉननं वरील आवेशाची गर्जना पुरी केली असेल नसेल तोंच, त्या विराट सभेंतील जनसंमर्दानें 'धिलॉन् झिंदाबाद' अशी एकमुखी गगनभेदी गर्जना केली! या गर्जनेचे नादनिनाद इतका वेळ चालू राहिले कीं, पुढं बोलण्याची इच्छा असूनहि धिलॉनला कांहीं वेळ स्तब्ध उभंच रहावं लागलं! पांच मिनिटेंपर्यंत वरील घोषणेचे साद–पडसाद त्या विराट सभेंत आणि आसपासच्या वातावरणांत उत्साहातिरेकानं दुमदुमून राहिले होते!

घोषणांचे साद पडसाद हवेंत विरून परत सामसूम होईपर्यंत,

धिलॉननें डोळे मिटून व खालीं मान घालून जणुं या लोकगंगेच्या उत्साहाच्या पुरापुढें नमन केलें! नंतर हळूंच मान वर करून व डोळे उघडून तो पुढें बोलूं लागला:—

" पुष्कळ प्रेमळ मित्रांनीं माझ्या पुढील कार्याविषयीं मला प्रश्न केले आहेत. मला त्या सर्वांना इतकंच सांगावयाचे आहे कीं, सध्यां तरी रात्रंदिवस आजाद–हिंद–फौजींच्या सुखसोयीची व्यवस्था लावण्याच्या तजविजांवांचून मला दुसरं कांहींहि सुचत नाहीं. विशेषत:, आझाद हिंद फौजेंतील जे शूरवीर लढाईंत ठार झाले, त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक तितकी मदत पोचविण्याची व्यवस्था लागेपर्यंत, मला स्वत:च्या कुटुंबाचा देखील विचार करण्यास उसंत मिळणें शक्य नाहीं! "

" आझाद हिंद फौजेंतील जे लोक आज बेकार आहेत त्यांना उपजीविकेसाठीं मानाचीं कामें मिळवून देणें आणि जे ठार झाले त्यांच्या कुटुंबीयांना कांहीं योग्य मदत पोचविण्याच्या तजविजा करणें, हीं कर्तव्यें पार पाडल्यावांचून आम्हांला स्वत:च्या कुटुंबीयांचा विचार सुचेल तरी कसा? "

" आतां माझं भाषण संपण्यापूर्वी, तुम्ही विचारला नसला तरी सर्वांच्या मनांत घुटमळणारा अन् सर्वांच्या चेहेऱ्यावर स्पष्ट उमटलेला, एक प्रश्न, विचारांत घेऊन त्याचं उत्तर माझ्या माहितीप्रमाणं देणं माझं कर्तव्य आहे. हा सर्वांच्या मनांतील प्रश्न म्हणजे नेताजीच्या मृत्यूविषयींचा होय! "

त्या विराट सभेंतील प्रत्येकानं याबद्दल होकार दिला अन् या पुढं धिलॉनच्या तोंडून कोणती माहिती बाहेर पडते, ती ऐकण्यास तो प्रचंड जमाव एकतानतेनं अतिशय उत्सुक झालेला दिसला!

"आतांपर्यंत समजलेल्या विश्वसनीय माहितीप्रमाणं बोलायचं म्हणजे, व्यक्त करण्यास मला शब्दच सुचत नाहींत, अशा दुःखावेगानं म्हणणं भाग आहे कीं, नेताजी इह लोक सोडून गेले!"

वरील शब्द, प्रत्येक शब्दागणिक ठेंचकाळतच, धिलॉनच्या तोंडून बाहेर पडले! नंतर अत्यंत सद्गदित शब्दांनीं सावकाश तो बोलला:-

"नेताजींचा मृत्यू ही हिंदुस्थानांत प्रत्येकाला अप्रिय अशी घटना असल्यामुळेंच कोणाचाहि त्या वार्तेवर विश्वास बसत नाहीं. लोकांची नेताजींच्या मृत्यू विषयींची भावना इतकी प्रबळ आहे कीं, तिच्यापुढें कोणाचाही अन् कसल्याहि प्रकारचा तर्कवाद हातच टेकतो! लाखों लोकांच्या अंतःकरणांत नेताजीविषयींचें प्रेम इतके स्वयंस्फूर्त आणि बळकट घर धरून राहिलें आहे कीं, त्यांच्या मृत्यूच्या नुसत्या बातमीचाही सर्व लोक तिरस्कार करतात.!"

"माझी परमेश्वराला फक्त आठच शब्दांत प्रार्थना आहे. अन् ती ही कीं 'नेताजी अद्याप सजीव असोत व ते चिरायू होवोत!"

वरील प्रार्थनेचे शब्द बोलत असतांना धिलॉननें आकाशाकडे श्रद्धायुक्त नजर लाविली व त्याचा आवाज सकंप झाला. मूर्तिमंत विश्वव्यापी तेजाचीच जणु तो उपासना करीत होता!

ही प्रार्थना झाल्यावर धिलॉननें आपलें भाषण संपविलें. नेताजींच्या निधनाच्या उल्लेखामुळेंच जणु त्याला खूप थकवा आलासें दिसलें!

× × × ×

( ४ )

ज्या खुल्या जागेंत ही सभा झाली, तिच्या नजीकच एक खाद्य-पेयांचें दुकान होतें. आम्हां सर्वांना त्या दुकानांत नेऊन अल्पोपहार देण्यांत आला. खेडयांतील पद्धतीनं तयार झालेला तो 'चहाचा काढा' धातूच्या पेल्यांतून आमच्या पुढें ठेवण्यांत आला!

पितळेच्या चकचकीत ताटल्यांतून मला आवडणारीं पीकफ्रीन खारीं बिस्किटेंही ठेविलेलीं दिसलीं. मला इतकी कडकडून भूक लागली होती कीं, त्या बिस्किटांवर झडप घालून दोन बिस्किटं माझ्या तोंडांत कोंबतांना स्त्रीदाक्षिण्याला अनुसरून मिसेस् धिलॉन यांनाहि मी प्रथम ती देऊं करण्याचं विसरून गेलों!

एक दिवस आपल्या त्या गांवाचा पाहुणचार घेण्यास राहण्याचा मला धिलॉननें आग्रह केला; पण माझा नाइलाज झाला! त्याच दिवशीं ४ वाजतां प्रेम सैगल वृत्तपत्रवार्ताहरांना खास मुलाखत देणार होता, अन् मी त्यावेळीं हजर राहण्याचं सकाळींच कबूल केलं होतं.

तीन वाजले असल्यामुळं धिलॉन–पतिपत्नींचा निरोप घेऊन मी व मनमोहन घाईघाईनं मोहनच्या मोटारींतून लाहोरला तीरासारखें परतलों.

× × × ×

# भाग ७ वा

## आझाद हिंद फौजेचा उगम आणि विकास

वार्ताहरांशीं प्रेम सैगलची मुलाखत झाली त्यापूर्वी, उलट सुलट प्रश्न विचारून बेजार करण्याऱ्या या 'वार्ताहर–गिधाडांपुढें' प्रेम सैगल गोंधळून जाईल, अशी मला भीति वाटत होती ! राजकारणांतील मुरब्बी लोक देखील पुष्कळदां वार्ताहरांच्या या नेमबाजीमुळें बेजार होतात, असा अनुभव आहे ! प्रत्येक विषयांत सखोल बुडी मारण्याच्या, वार्ताहरांच्या वहिवाटीमुळं कांहीं तरी ' पोकळ गप्पा ' मारून वार्ताहरांना वाटेला लावणें अशक्य–प्राय आहे !

पण मला साश्चर्य समाधान वाटलं कीं, प्रेमनं वार्ताहरांच समाधान तर केलंच; पण त्यांच्या निर्भेळ आदराचाहि तो विषय बनला !

तब्बल एक तासपर्यंत प्रेमनं 'आझाद–हिंद फौजेच्या उगम–विकासा' बद्दलची माहिती इतकी सुसंबद्ध व ' बुद्धिवादि दृष्टिकोनांतून ' सांगितली कीं, बिचाऱ्या वार्ताहरांना त्या तासांत एकदांहि डोकं वर काढण्या इतपत देखील उसंत मिळाला नाहीं ! एकसारखीं टिपणंच करीत होते ते ! प्रेम सांगत असलेला आझाद–हिंद–फौजेबाबतचा वृत्तांत इतका आकर्षक व मनोवेधक होता कीं, वृत्तपत्रांना त्यांतील कसलाच तपशील वगळतां येण्यासारखा नव्हता, असं त्या वार्ताहरांना वाटलं असणं अगदीं स्वाभाविक होतें.

" सभ्य गृहस्थहो, मी प्रथम पुढील दोन प्रश्नांची उत्तरें देण्याचा

अनुक्रम ... विभाग ... क्रमांक ... नोंद

प्रयत्न करतों." अशी प्रस्तावना करून ते दोन प्रश्न स्वतः प्रेमनें पुढील शब्दांनीं मांडले :—

[ अ ] अतिपूर्व प्रदेशांत आम्ही आझाद-हिंद-फौजेची संघटना कां केली ?

[ ब ] त्या संघटनेबाबत आम्ही जपानची मदत घेतली कां ? व घेतली असल्यास कां ?

या दोन प्रश्नांना क्रमवार उत्तरें देतांना प्रेम पुढं म्हणाला :—

"गुलामगिरीच्या गर्तेत सांपडलेल्या सर्व मानवप्राण्यांना पहिली गरज स्वातंत्र्य-संघटनेचीच वाटते, हें पहिल्या प्रश्नाचं साधं उत्तर. ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं लढा दिलाच पाहिजे, अशी तळमळ या वेळीं अतिपूर्व प्रदेशांतील हिंदी लोकांना वाटूं लागली. तें आपलें आद्य कर्तव्य आहे, अशी त्यांची श्रद्धा बनली."

दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर पहिल्या प्रश्नाच्या उत्तरांतून आपोआपच प्रगट होतें. आमच्या स्वातंत्र्य-संघटनेसाठीं कोणाची तरी मदत घेणें अपरिहार्यच होतं. आमच्या या प्रकारच्या संघटनेला मदत देण्याच्या परिस्थितींत रशिया, चीन अगर अमेरिका, हे देश नव्हते व त्यांची तशी इच्छाहि नव्हती. तेव्हां निवडानिवड करायला आम्हांला सवडच नव्हती ! आम्हांला मदत करील असा एक जपान देशच होता आणि तो मदत करायला खुषीनं तयारहि झाला."

"शिवाय आम्हीं प्रथमपासून हेंहि जाणून होतों कीं, कोणताहि बाहेरचा देश हिंदुस्थानला स्वातंत्र्यदान करूंच शकणार नाहीं.

विषापासून अमृत निघेल असं कोणी अन् कां म्हणून समजावं ? अन् एखाद्या तिऱ्हाइत देशानं आम्हांला स्वातंत्र्य दिलं, असं घटकाभर धरून चाललं तरी, ते टिकणं कसं शक्य आहे ? आज आलं नि उद्यां गमावलं, अशांतला तो प्रकार ठरणार, हें निश्चित ! "

" मात्र आमचं स्वातंत्र्य स्वतःचं रक्त सांडून आम्हीं संपादन करूं तरच तें टिकाऊ ठरेल, याची पूर्ण जाणीव आम्हांला होती. स्वातंत्र्य देवीच्या चरणीं इतकें उच्च व पवित्र बलिदान दिल्यावर त्या यज्ञाच्या बळानं तें स्वातंत्र्य टिकवून धरण्याचं सामर्थ्य आमच्या ठिकाणीं कां नाहीं येणार ? अशा रीतीनं संपादन केलेलं स्वावलंबी स्वातंत्र्य परत हिरावून घेण्याची कोणत्याहि परकीय सत्तेची तापच लागणार नाहीं ! मग ती सत्ता कितीहि बलवान् किंवा कितीहि लोभी असो. "

" आझाद–हिंद–फौजेची संघटना सुरूं करतांना आमची ठाम श्रद्धा होती कीं, जपाननें आपली मदत थांबवली किंवा जपानचं व आमचं बिनसलं तरीहि, स्वतंत्र रीतीनं आम्हांला आमचं स्वातंत्र्य–संपादनाचें ध्येय गांठतां येईल; इतकंच नव्हे तर जपानला चार विरोधी तडाके लगावण्याचेंहि सामर्थ्य आमच्यांत येईल ! "

" जपानची मदत घेऊन आम्ही हिंदुस्थान गहाण टाकण्याचं कुकर्म केलं, अशा आशयाची टीका आम्हांवर करतात; पण ही टीका अन्यायाची आहे. हिंदुस्थानाचं भावी स्वातंत्र्य गहाण टाकणं तर दूरच, पण एकाहि प्रचलित व्यवहारांत आम्ही जपानच्या ओंजळीनं पाणी प्यालों नाहीं, अशी ग्वाही मी देऊं शकतों. "

" जर्मनीनं रशिया विरुद्ध युद्ध पुकारलं त्यावेळीं स्टॉलिनला सर्व बाजूंनीं मदत देण्याचं आश्वासन चर्चिलनं दिलं होतं. पण बोल-शेविक रशियाविरुद्ध द्वेषानें बोललेला एकहि शब्द चर्चिलनें परत घेतला नाहीं. तात्पर्य जर्मनीचा पराभव करण्यापुरती 'दुष्मन-रशियाची' मदत घेण्यांत चर्चिल जर गैरवाजवी वागला नसला तर मग ब्रिटिशांना हाकून लावण्यासाठीं जपानची मदत आम्हीं घेतली तर त्यांत तरी वावगं कोणाला आणि कां वाटावं ? "

" शिवाय आपण हीहि वस्तुस्थिति ध्यानांत घेतली पाहिजे कीं, दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापासूनच हिंदुस्थानची स्वातंत्र्याची चळ-वळ सुरू झालेली आहे. राशबिहारी बोसनीं पूर्व-आशियांत ती नांवारुपाला आणली होती. १९४२ च्या जून मध्यें बँगकॉक शहरीं पूर्व आशियांतील सर्व हिंदी प्रतिनिधींची एक स्वतंत्र परिषद भरली आणि याच परिषदेंत आझाद-हिंद-सैन्याची संघटना करण्याचा रीतसर ठराव पास झाला. "

" सदरील ठरावाला अनुसरून १ सप्टेंबर १९४२ रोजीं आझाद-हिंद-फौज संघटित करण्यांत आली. सुरवातीला या फौजेंत १५ हजार सैनिक होते; आणि पुढील थोड्याच महिन्यांत आणखी १५ हजार सैन्य संघटित करण्याचाहि निर्णय याच वेळीं ठरविण्यात आला."

" आझाद हिंद फौज संघटित झाल्यानंतर जपानी सैन्याधिका-ऱ्यांशीं मतभेदाचे प्रसंग आले; सुरवातीला थोडीशी आमची अडवणूकहि झाली. पण परकीय मदतीची पर्वा न करतां

आमचें काम आणि संघटना पुढें रेटण्याचा वाढता निर्धार आम्ही केला. कांहींहि झालें तरी परकीयांच्या तत्रांत जावयाचें नाहीं, हा आमचा कृतनिश्चय होता. आम्हांला मदत देण्याच्या सबबीवर आमच्यावर दादागिरी गाजविण्याची संधि जपानला केव्हांहि द्यावयाची नाहीं, हा आमचा बाणा अखेरपर्यंत कायम होता."

"मतभेद आले त्या वेळीं जपानी अधिकाऱ्यांना आम्ही स्पष्टच बजाविलें कीं, आमच्या मागण्या मान्य नसतील तर आम्ही आझाद हिंद संघटनाच जपानी तंत्रातून काढून घेऊं. जपानला दिलेल्या या अंतिमोत्तराला अनुसरून आम्ही त्या तंत्राची संघटना नाहींशी केल्याचेंहि एकदां जाहीर केलें होतें."

"जपानी अधिकाऱ्यांनीं आम्हांला वळविण्यासाठीं खूप खटपटी केल्या, पण व्यर्थ! नेताजी अतीपूर्व टापूंत आल्याबरोबर जपान्यांना आमच्या सर्व मागण्या जशाच्या तशा मान्य कराव्या लागल्या. नेताजींच्या नेतृत्वासाठीं आम्हीं आझाद-हिंद-संघटनेची फिरून जय्यत तयारी केली. नेताजींच्या अचूक मार्गदर्शनाविषयीं आमची नितांत श्रद्धा होती."

"२ जुलई १९४३ रोजीं सुभाषचंद्र बोस सिंगापुरांत दाखल झाले. ते आल्याबरोबर राशबिहारी बोस यांनीं 'इंडियन इंडिपेन्डन्स लीग'च्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व त्या जागीं नेताजी सुभाष बोस यांची योजना झाली. २५ ऑगष्ट १९४३ रोजीं नेताजींनीं आझाद हिंद फौजेचे सर सेनापति या नात्यानें नेतृत्व पत्करलें."

× × ×

( २ )

इतक्यांत माझ्या पाठींत कांहींतरी चावल्याचा मला भास झाला. कांहीं मुंग्या शर्टांत शिरून माझ्या खांद्यानजीकच्या भागांत चावे घेत असाव्यासं मला वाटलं ! मागें वळून मी पहातों तों तशांतला कांहीं प्रकार नसून यु. प्रे. चे मॅनेजर श्री. दत्त माझ्या पाठीवर आपलं नोट बुक ठेवून टिपणी करीत होते ! स्वतःच्या गुडघ्याच्या टेबलाला कंटाळून माझी प्रशस्त पाठ त्यांना टेबल म्हणून वापरायला बरी वाटली असावी !

मी मागं वळून पाहिल्यावर दिलगिरी व्यक्त करणं बाजूलाच राह्यलं ! हा गृहस्थ मला म्हणाला " अरे अजून तगडा जवान आहेस, जरा आणखी वाक ना ! म्हणजे तुझ्या पाठीचं टेबल मला ठीक जमेल ! "

मी दत्तसाहेबांचा हा हुकूम निमूट पाळला ! काय करणार ? यु. प्रे. कचेरींत गेलों कीं, प्रत्येकवेळीं ते मला रसगुल्ल्याचा खुराक चारीत होते नां !

*　　*　　*

३

प्रेम सांगत होता—

" आणखी एका गोष्टीचा खुलासा करणं आवश्यक आहे. आझाद हिंद सरकार व आझाद हिंद फौज या दोहोंचेहि नेतृत्व एकट्या सुभाष बाबूकडेच कसं ? याचीं कारणं दोन आहेत. "

" अतिपूर्व टापूंत सुभाष बोस यांच्या तोडीचा एकहि हिंदी पुढारी नव्हता, हें एक कारण. हिंदुस्थानांत पुष्कळ मोठमोठे पुढारी आहेत तशी स्थिति तेथें नसल्यामुळें लष्करी व मुलकी अधिकार एकाच पुढाऱ्याच्या हातीं देण्यांवाचून गत्यंतरच नव्हतं. "

" अतिपूर्वेकडील आमच्या संघटनेचें मुख्य ध्येय स्वातंत्र्य–संपादन आणि त्यासाठीं लढणं, हेंच होतं. अर्थात् आमच्या संघटणेचं मुख्य स्वरूप युद्ध–यंत्राचंच होतं हें असल्या संघटनेचं दुसरं कारण. कृति आणि संघटनेचं कार्यतंत्र यांत सुरेलपणा राखण्यासाठींच असल्या एकसुत्री एकतंत्राचीच आवश्यकता होती. "

" नेताजी आझाद हिंद फौजेचे नेते झाले. त्यावेळीं ह्या फौजेची फक्त एकच 'डिव्हिजन' होती; एक डिव्हिजन म्हणजे तोफखान्यावरील सैनिक, इंजिनियर मिळून दहा हजार सैनिकांचा एक गट. पण ती वाढविण्याचा निर्णय ताबडतोब घेण्यांत आला. लवकरच एका ऐवजी तीन ' डिव्हिजन्स ' वाढविण्यांत आल्या. प्रत्यक्ष लढाईला तोंड लागलं त्यावेळीं चवथी ' डिव्हिजन ' संघटीत होत होती. "

" या नंतरची दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे पूर्व आशियांतील स्वतंत्र हिंदुस्थानाचें तात्पुरतें सरकार होय. या सरकारची आधुनिक दृष्टिकोनांतून अगदीं रीतसर आणि वाजवी संघटना झाली होती. जगांतील अनेक राष्ट्रांनीं त्याला मान्यता दिली होती. त्या सरकारची जमाबंदीचीं स्वतंत्र साधनें होतीं आणि अंदाजे २५ लाख लोकांनीं या सरकारची सत्ता मान्यहि केली होती. "

" तात्पर्य हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं ब्रिटनविरुद्ध युद्ध पुकारण्या-इतकं महत्त्व आणि मजबुती पूर्व आशियांतील या तात्पुरत्या आझाद हिंद सरकारला निःसंशय प्राप्त झालेली होती. "

" पुढं लवकरच अंदमान अन् निकोबार ही बेटं त्याच सरकारकडे सुपूर्त करण्यांत आली. ह्या करितां रीतसर कागदोपत्रीं करारनामे देखील झाले. हिंदुस्थानाचें स्वातंत्र्ययुद्ध नेटानें पुढें चालविण्यासाठीं ही बेटें आझाद–हिंद–सरकारकडेच असणं कां आवश्यक आहे, हें नेताजींनीं जपानी अधिकाऱ्यांना पटवून दिलें. हळूं हळूं जपानी लष्करी अधिकाऱ्यांचे हातून या बेटांच्या कारभाराचा ताबा आझाद हिंद सरकारकडे देण्यांत यावा, असें झालेल्या कराराचें स्वरूप होतें."

" या बेटांचा सर्वच्या सर्व कारभार आझाद हिंद सरकारनंच आपल्या ताब्यांत कां घेतला नाहीं, अशी कुत्सित टीका कांहीं लोक करीत असतात, ह्या बाबतींतहि एकदां खुलासा करतों."

" युद्धकालांत एखाद्या जिल्ह्याचा कारभारदेखील एका सत्तेकडून दुसरीवर सोपवणं किती अवघड असते याची विचारी तज्ज्ञ लोकानांच खरी कल्पना येईल. आणि इथं तर दोन सबंध बेटांच्या कारभारांची खांदेपालट व्हावयाची होती! अत्यंत सावधगिरीनें अन् पायरी पायरीनं आस्ते कदमच हे व्यवहार पुरे करणं आवश्यक कसं व कां असतं, याची कल्पना फक्त तज्ज्ञच देऊं शकतील."

" दुसरी आणखी एक वस्तुस्थिति बेजबाबदार व बाष्कळ टीकाकारांनीं ध्यानीं घेणें आवश्यक आहे कीं, शत्रूच्या हल्ल्यांपासून

रक्षण करण्याला आवश्यक असं आरमारी व हवाई युद्ध–यंत्र आझाद हिंद सरकारच्या हुकमतींत अद्याप आलं नव्हतं. अर्थात् जपानी आरमारी व हवाई युद्ध–यंत्रावरच या बेटाच्या संरक्षणासाठीं अवलंबून राहणं भाग होतं."

"आतां तुम्हां सर्वांना पटलंच असेल कीं, या बेटांची सर्वांगीण सत्ता हातीं घ्यावी अशी परिस्थिति त्या वेळीं निर्माणच झालेली नव्हती."

प्रेम सैगलच्या या बिनतोड युक्तिवादाला सर्व वार्ताहर माना डोलवून संमति देतांना मला दिसले.

× × ×

## ( ४ )

प्रेम सैगल पुढें बोलला:—

"सभ्य गृहस्थ हो, आझाद हिंद फौजेनें प्रत्यक्ष लढाईत किती भाग घेतला या बद्दलची त्रोटक माहिती आतां सांगतों."

"आझाद हिंद फौजेची पहिली 'डिव्हिजन' अगर पलटण प्रथम तामू व इंफाळ आघाडीवर लढावयास पुढें सरसावली. आझाद हिंद फौजेच्या इतर घटकांपैकीं बातमी–गटाची पलटण, बहादुर पलटण आणि रोजिमेंट बॅटॅलियन नं. १, आराकानच्या आघाडीवर लढत होते. आझाद हिंद फौजेचे आराकान आघाडीवरील सर्व घटक हिंदुस्थानच्या सरहद्दीतून घुसले होते; पालेल, बिरानपूर व कोहिमाच्या प्रदेशांत तर आझाद हिंद फौजेचा मुख्य भागच होता."

"एप्रिल १९४४ च्या मध्यावर 'झांशी राणी रेजिमेंट' च्या मुख्य पलटणी ब्रम्हदेशांत दाखल झाल्या. हिंदुस्थानांतील आघाडीवर आगेकूच करण्याच्या हुकुमाची वाटच या शूर सैनिक स्त्रिया पहात होत्या."

"याच सुमाराला 'आझाद—हिंद—दल' नांवाची नवी संस्था संघटित करण्यांत आली. लष्करी नमुन्याचीच, पण ही नागरी संघटणा, होती.स्वतंत्र झालेल्या टापूंतील कारभार नव्या शिस्तीनें चालविणें ही या संस्थेची मुख्य कामगिरी. या संघटनेचं नेतृत्व कर्नल हशान कादीर यांचेकडे देण्यांत आलं. आणि स्वतंत्र झालेल्या टापूचे 'गव्हर्नर डेसिग्नेट' म्हणून मेजर जे. ए. सी. चतर्जी यांची नेमणूक झाली."

"आझाद हिंद फौजेच्या मागोमाग आझाद हिंद दलाचे घटक पुढं पुढं सरकत आझाद हिंद फौजेच्या आघाडीचे घटक हिंदुस्थानाच्या सरहद्दींत घुसले; त्यांच्या मागोमाग आझाद हिंद दलाचेहि घटक या टापूंत शिरलेले होते. एकदां तर मणिपूर संस्थानांतील १५०० चौरस मैल टापूंतील कारभार, आझाद—हिंद फौज व आझाद—हिंद—दल यांच्याच तंत्रानं चालत होता!"

"सभ्य दोस्तहो, तुम्हाला ही माहिती सांगितल्यास आनंदाची वाटेल कीं, आझाद--हिंद फौजेची पहिली डिव्हिजन हिंदुस्थानच्या सरहद्दींत चार महिने होती. तोंपर्यंत एकदांहि ब्रिटिश फौजेकडून आझाद हिंद फौजेचा पराभव झाला नाहीं. या टापूंत आझाद हिंद फौजेंतील सैनिकांनीं असामान्य शौर्य—धैर्य प्रगट केलें! पुढें हिंदु—

स्थानाच्या राष्ट्रीय लढ्याचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळीं, या शूर-वीरांची नांवं त्यांत सुवर्णाक्षरांनीं नोंदण्याच्या लायकीची निःसंशय ठरतील ! ”

‘ करेंगे या मरेंगे ’ यावाचून या वीरांना दुसरा ब्रीद-मंत्रच नव्हता !”

× × ×

[ ५ ]

हलक्या पण सुदीर्घ आवाजांत प्रेम सैगलच्या तोंडून वरील शब्द बाहेर पडले त्यावेळीं मी त्याच्याकडं निरखून पाह्मलं. यावेळीं भावनाभरानं त्याचं शरीर थोडसं नमलं होतं. मुत्सद्दीपणा अन् व्यवहार क्षणभर तो विसरलासं दिसलं; अगदीं प्रेमवेड्या तरुणाप्रमाणें आणि आझादच्या चिंतनमननानं त्याचीं समाधी लागल्याप्रमाणंच झालं होतं !

अर्धोन्मीलित नजरेनंच प्रेम माझ्याकडं पाहूं लागला. आपल्या आझाद हिंद फौजी वीरांना जणूं तो मानसिक प्रणाम करीत असावासं दिसलं ! भावनांचा अवसर ओसरूं देऊन व तोल सांवरून, सैगल पुढं बोलूं लागला—

“ १९४४ च्या जुलईचे मध्यावर खूप पाऊस पडल्यामुळं ज्या रस्त्यामागं आमच्या फौजेची आघाडी होती तो अक्षरशः चिखलाचा सागरचा बनला ! आघाडीवरील आमच्या फौजींना दारूगोळा, रसद व

औषधादि सामुग्रीचा पुरवठा करणं जवळजवळ अशक्य झालं! आमच्या सर्व वाहतूक–साधनांचा क्रूर पावसानें धुव्वा उडविला! म्हणून अखेर आझाद–हिंद फौजांची आघाडी मणिपूरहून चिंद्विन टापूंत मागं हटवावी लागली. त्या ठाण्यावर आमच्या फौजेची नवी संघटना करून हवामान अनुकूल झाल्यावर फिरून शत्रूवर चाल करावी, असा आमचा विचार होता."

"पण मेजर ज. एम्. झेड्. कयानी यांच्या नेतृत्वाखालील आझाद हिंद तुकडी माघार घेत असतां, तींतील फौजींचे अनन्वित प्रकारांनीं हाल झाले. अन्नाचा पुरवठा आजिबात संपला आणि औषध–साधनेंहि सपुष्टांत आली! त्या पलटणींतील शेंकडों सैनिक, अन्नावाचून तर शेंकडों औषधें वगैरेंच्या मदतीच्या अभावी ठार झाले, ही वस्तुस्थिति मोठ्या जड व दुःखी अंतःकरणानं नमूद करावी लागत आहे!"

अशा हालअपेष्टांतुनहि जे लोक कसेबसे वाचले, त्यांचे, ठिकाणा-वर येईपर्यंत, नुसते अस्थिपंजर उरले व त्यानंतर कित्येक आठवडे त्यांना इस्पितळांतच ठेवावं लागलं."

नंतर मुठी वळून मोठ्या दुःखावेगानं टेबलावर मुठी आदळतच प्रेम पुढें म्हणालाः—

"या पलटणींतील एकाहि आझाद फौजीची इच्छा फौज सोडून जाण्याची नव्हती. चांगल्या अन्नवस्त्रादींचं आमिष ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं त्यांच्यापुढं धरलं होतं. पण नेताजींवरील निष्ठेमुळें सर्व आझाद फौजींनी असल्या आमिषांचा धिक्कारच केला. ब्रिटिशांच्या ऐषआरामी

गुलामी गावांत लोळण घेण्याऐवजी उपाशी राहून नेताजींच्या पायांशीं प्राणहि अर्पण करण्याचा निर्धार या फौजींनीं केला !"

"अशा निर्धारी शूरवीर सुपुत्रांना जन्म देणाऱ्या त्या अज्ञात वीर मातांना माझा प्रणाम असो! अन् अशा तेजस्वी माता निर्माण करणाऱ्या माझ्या हिंदमातेलाहि माझा फिरून एकवार नम्र प्रणाम!"

"आतां थोडक्यांत आमच्या माघारीची कथा संपवितों. पहिल्या डिविजननें मंडालेकडे माघार घेतली. १९४५ च्या उन्हाळयाअखेर आम्हीं समजून चुकलों कीं, ब्रह्मदेश लवकरच जपान्यांचे हातून जाणार ! आम्हांलाहि यामुळं आमचं भवितव्य ढगाळच दिसूं लागलं!"

"जपान चालू युद्धांत हरणार हें आमच्या लक्षांत निश्चितच येऊन चुकलं."

"पण आमचा स्वातंत्र्य—लढा कांहीं जपान्यांच्या यशापयशावर अवलंबून कधींच नव्हता! अखेर आमचा जय होणार ही आमची श्रद्धा कायमच होती व आहे. आमचा लढा स्वतंत्रच असल्यामुळें तो पुढं चालू ठेवणं आमचं कर्तव्य होतं."

"आम्हांला अनेक प्रसंगीं नामुष्कीच्या माघारी खाव्या लागल्या तरी, अखेर आमच्या स्वातंत्र्याचा लढा यशस्वीच होणार या निर्धारी श्रद्धेनं आमच्या सर्व हालचाली चालू होत्या. हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्थानबाहेरील हिंदी लोकांना स्वातंत्र्याची तळमळ तर आहेच; पण त्यासाठीं वाटेल तें दिव्य पत्करण्यांसहि ते तयार आहेत, हें आतां प्रत्यक्ष पुराव्यानं स्पष्ट झालं आहे. अशा निर्धारी व त्यागी लोकांना यापुढं जगांतील कोणती सत्ता गुलामीच्या गर्तेत दडपून टाकूं शकेल?"

" अखेर ब्रह्मदेशांत आम्ही कैद झालों त्यावेळीं आझाद हिंद फौजेंत ५० हजार सैनिक होते आणि राखीव फौजेंत आणखी ९० हजार होते. शस्त्रास्त्र-पुरवठ्याचे अभावीं त्यांना आम्ही सुसज्ज राखूं शकलों नव्हतो. तरीहि लष्करी शिक्षण त्यांनांहि पूर्ण देण्यांत आलें होतें. त्यामुळें ५० हजारांत निकामीं झालेल्या जागा आम्हांला झपाझप् भरून काढतां येत. "

" शिवाय ब्रह्मदेशांत व मलायांत बऱ्याच नागरिकांना लष्करी शिक्षण देऊन आम्ही तयार केलं होतं. प्रत्येक शहरीं आझाद हिंद फौजेच्या तुकड्या नागरिकांना लष्करी शिक्षण देवून तयार ठेवण्याची कामगिरी आमचे लोक बजावीत असत. या सर्वांचाहि ऐन वेळीं सैनिकांच्या रिकाम्या जागा भरून काढण्यास उपयोग होतो. "

" १९४२ मध्ये ब्रिटिशांनीं ब्रह्मदेश सोडला त्यावेळीं हिंदी लोकांचे भयंकर हाल झाले. त्यांची सर्व मालमत्ता लुटली गेली. म्हणून यावेळीं ब्रह्मदेश सोडतांना नेताजींनीं आझाद-हिंद फौजेची एक तुकडी मुद्दाम मागं ठेविली. हिंदी लोकांचीं जीवितें मालमत्ता व इभ्रत यांचं रक्षण या फौजींनीं करावं, हा त्यांतील हेतु. ब्रिटिशांनीं हा टापू व्यापी पर्यंत, आझाद हिंद फौजींनीं, या दृष्टीनें कडक पहारा राखून आपलं कर्तव्य बजावलं. "

" ब्रह्मदेश ताब्यांत घेणारी ब्रिटिश फौज ठाण्यावर आल्यानंतरच आझाद-हिंद-फौज काढून घेण्यात आली. कांहीं दिवसांनंतर रंगूनच्या उपनगरांत दोन हिंदूंचे खून झाले. तेव्हा ब्रिटिश अधिकाऱ्यानीं

आझाद हिंद फौजींना फिरून आपला पहारा सुरूं करण्याची विनंति केली. त्याप्रमाणें तो पाहरा सुरूं झाल्यानंतर मात्र कोणाचे खून झाले नाहींत कीं दरोडे पडले नाहींत ! ”

“ १४ मे १९४५ रोजीं आझाद हिंद फौज रंगूनमधील ब्रिटिश अधिकाऱ्याच्या स्वाधीन झाली. त्यापूर्वीं, म्हणजे २४ एप्रिल रोजींच, नेताजी व त्यांची मुख्य कचेरी रंगूनहून हलविण्यात आली होती. थायलँड व मलायांतून स्वातंत्र्याचा लढा पुढें चालूं ठेवण्याची त्यांची इच्छा होती. ”

“ थायलँड मध्ये आपल्या कचेरीचें मुख्य केन्द्र नेताजींनीं ठेविलेंहि होतें; पण दरम्यान ॲटम् बाँबचा प्रहार आला आणि शरण जाण्या वांचून जपानला दुसरा उपायच उरला नाहीं ! ”

“ नेताजी एका विमानानं सिंगापूराहून जपानकडे जाण्यास निघाले होते. तात्पुरत्या हिंदुस्थान–सरकारकारच्या शरणागतीची स्वतंत्र व्यवस्था करावी, असा त्यांच्या मनांतील हेतु होता. पण तें दुर्दैवी विमान फोर्मोसा मध्ये मोडलें. नेताजी बरोबर यावेळीं फक्त कॅ. हबीब उल रहमान हे एकटेच हिंदी गृहस्थ होते. दोघांनाहि गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या. पण आपल्या भयंकर दुर्दैवामुळं नेताजी त्यांतून वांचले नाहींत. ”

“ आपल्याला ही दुःखद घटना कितीहि कटु व अप्रिय असली तरी नेताजींच्या मृत्यूची ही बातमी पुराव्यानं सिद्ध झाली आहे खरी ! ”

\+ \+ \+ \+

[ ६ ]

वरील शब्द उच्चारतांना प्रेमचा आवाज घोगरा आणि कांतर झाला होता. एक दुःखाचा मोठा सुस्कारा त्यानं सोडला ! त्याच्या तोंडून आतां शब्दच बाहेर फुटणार नाहीं, अशीहि भीति मला क्षणभर वाटली. खिशांतील रुमाल काढून डोळ्यांतून खालीं ठिबकूं घातलेले अश्रु त्यानं पट्‌कन् टिपले. थोडासा खुर्चीत ठाकठिक बसून त्यानं आपला दुःखावेग सांवरला आणि तो हळुहळु फिरून बोलूं लागला:—

" वार्ताहर मित्रहो, मला बऱ्याच वेळां विचारण्यात आलेल्या आणखी एका प्रश्नाचं उत्तर आतां मी देतों. वेगळ्या धर्माच्या वेगळ्या वर्णाच्या व वेगळ्या मतप्रणालीच्या लोकांची एकजूट करण्याचे कामीं नेताजींनीं कसं यश मिळविलं हाच तो प्रश्न होय. "

" नेताजींचा व्यक्तिशः त्यागी बाणा हें या यशांतील पहिलें वर्म होय. जातपात, धर्म, यांतील भेदांचाहि विचार न करतां आझाद-हिंद फौजेंतील प्रत्येकाची, जशी कुटुंबांतील माणसांची वहावी, इतक्या जिव्हाळ्यानें, काळजी वहात. यामुळं सर्वांना ते आपलेसे वाटत. सर सेनापति असूनहि ह्यांचि राहाणि अगदीं वैराग्या सारखी साधी असे. सामान्य आझाद-हिंद सैनिका इतकंच रासन ते घेत ! अर्थात् सामान्य सैनिक, इतक्या साध्या सर सेनापतीचा, मत्सर कसा करील !"

" नेताजींच्या या ऐक्यसंघटणेंतील यशाचें दुसरें वर्म हें कीं, लढाईच्या ऐन निकर-क्षेत्रांत नेताजी नेमके असायचेच. धोक्याच्या अघाडीपासून दूर राहण्याविषयीं नेताजींना कितीदां तरीं विनविलं

असेल ! अघाडीच्या संघर्षांतील सैनिकाइतक्याच तत्परतेनं, छातीवर गोळ्या झेलण्याची नेताजींची सदैव तयारी असे. ”

“ नेताजींच्या या बाबतच्या यशाचं तिसरं वर्म हें कीं, स्वातंत्र्य-संग्रामांत भाग घेणारांपुढं त्यांनीं भलभलतीं आमिषं कधींच धरलीं नाहींत. आपण मातृभूमीचे सामान्य सेवक आहों. अर्थात् आपल्या बरोबर खांद्याशीं खांदा भिडवून स्वातंत्र्यासाठीं लढणारे माझे सर्व सहकारीहि देशाचे विश्वासू सेवकच आहेत; ही वस्तुस्थिति नेताजी वारंवार स्पष्ट करीत.”

‘ हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य हीच नेताजींच्या जीवनांतील एकमेव महत्त्वाकांक्षा. देशाला परकीयांच्या जोखडांतून मुक्त झालेल्या हिंदी जनतेने आपले प्रातिनिधिक सरकार बनवावें आणि सत्तेची सूत्रें हातीं बागविणारांचीहि निवड लोकांनींच करावी, असें नेताजी वारंवार बोलत.’

‘ आम्हांला नेताजी वारंवार बजावीत कीं, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं विलक्षण कमालीच्या यातना सोसण्याची आणि जरुर तर प्राणार्पण करण्याचीहि ज्यांच्या मनाची तयारी असेल, अशांनींच फक्त, आझाद हिंद फौजेंत नांवं नोंदवावींत. देश स्वतंत्र करणें हेंच आपलं एकमेव ध्येय. याच अंतिम सुखाच्या ध्येया पलीकडं काय होईल याचा त्यांनीं विचारहि करूं नये सर्वांत महत्त्वाचे वर्म हें कीं, स्वतंत्र हिंदुस्थानाच्या अत्यंत दैदीप्यमान् अशा तेजस्वी ध्येयानं एकजात सर्व सैनिक भारले गेले होते ! हाल-अपेष्टा सोसण्याची, महान् त्यागाला सज्ज राहण्याची, फार काय प्राणार्पणहि करण्याची आझाद-हिंद सैनिकांची मानसिक तयारी

याच ज्वलंत ध्येयामुळें झाली आणि ह्या जळजळींत भट्टीच्या आंचीत सर्व भेद जळून एकजीव मजबूत आणि दुर्दम्य अशा एकींत विलीन झाले ! आमच्या नेत्यानं प्राणाहुतीचा तेजस्वी मानदंड आमच्यापुढं ठेवल्यावर त्या मानदंडाच्या भडक भट्टींत, दुही, मत्सर वगैरे सर्व रोगकारी कृमि जळून भस्म झाले आणि त्याग आणि देशभक्तीच्या इंधनानीं भडकत असलेल्या या भट्टींत असल्या जंतूंना यत्किंचित् देखील वावच उरला नाहीं " !

* * *

[ ७ ]

'माझ्या काहीं प्रश्नांच उत्तर द्याल कां ?' असा मी प्रेमला नंतर प्रश्न टाकला तेव्हां त्यानं लगेच होकार दिला.

मी विचारलं " कॉंग्रेसच्या ऑगस्ट १९४२ च्या ठरावाचा आझाद-हिंद फौजेच्या घटनेवर कांहीं परिणाम झाला कां ? "

प्रेमनं उत्तर दिलं " 'चलेजाव' चा ठराव कॉंग्रेसने करण्यापूर्वी खरोखरंच आमच्या धोरणाची ठाम दिशा आम्हीं ठरविली नव्हती; त्या आमच्या मार्गावर या ठरावानें प्रकाश पाडला, यांत शंकाच नाहीं. हिंदुस्थानाबाहेर अशा प्रकारची चळवळ आम्ही करणं योग्य होतं कीं नाहीं, या बद्दल, आम्हीं तों पर्यंत तरी साशंकच होतों. ब्रिटिश सरकारानं अत्यंत 'शौर्यानें' हिंदुस्थानांत दडपशाही सुरूं केल्यावर तिला बाहेरून दहशत बसविणें हें आम्हांला नंतर आमचं कर्तव्य वाटूं लागलें "

" समजा कॉंग्रेसनं हा ठराव केलाच नसता तर मग तुमचं धोरण काय ठरलं असतं ? " असा पुरवणी–प्रश्न मी मागोमाग केला !

प्रेमहि कांहीं कमी नव्हता ! तो म्हणाला:—

" जगाचा इतिहास जर–तर नीं भरून गेला असून हा 'जर'हि त्यांतलाच एक ना ? वास्तविक त्यानंतर इतके उत्पात घडून गेले आहेत कीं, तो ठरावच झाला नसता तर आम्ही काय केलं असतं हा तर्क देखील बांधणं कठीण होऊन बसलंय ! तेव्हां असल्या ' जरतारी' प्रश्नाचं उत्तर मी तरी काय देऊं ? "

मीहि कमी चिकट नसल्यामुळं प्रेमला मी फिरून सवाल केला " तुम्हीच प्रथम म्हणाला कीं, पूर्व–आशयांतील स्वातंत्र्याची चळवळ स्वयंस्फूर्त होती हिंदुस्थानाकरितां कांहीं तरी केलेंच पाहिजे ही तुमची तळमळ दुर्दम्यच होती ना ? तर मग आझाद हिंद-फौजेच्या संघटनेला हिंदुस्थानावर कोणत्याही प्रकारें अवलंबून राहण्याचं कारण कां असावं ? "

प्रेमनं सरळ उत्तर दिलं:—

" स्वतंत्र होण्याची, देशाला स्वतंत्र करण्याची, आमची तळमळ हेंच आझाद–हिंद–फौजेच्या संघटनेचं आद्य कारण ही गोष्ट तर खरीच; पण मी वर म्हटल्याप्रमाणं आमच्या हालचालीचं धोरण मात्र निश्चित ठरलेलं नव्हतं. आम्ही अंधारांत चांचपडतच होतो, अन् आम्हांला प्रकाश हवा होता. हा प्रकाश आम्हांला अंशतः ' चलेजाव ' च्या कॉंग्रेस–ठरावानं तर अंशतः हिंदुस्थानांतील दडपशाहीच्या परिस्थितीनं, पुरवला ! "

" आमच्या आझाद हिंद संघटनेचं हिंदी जनतेचे पुढारी स्वागत करतील कीं एकदम ही संघटना टाकाऊ ठरवितील, याची आम्हांला

कल्पना होईना! हा ठराव करण्यापूर्वी कॉंग्रेसला कांहीं चळवळ करावयाची आहे कीं नाहीं याच बद्दल आम्ही साशंक होतो. तो ठराव पास झाल्याबरोबर मात्र आमच्या बुद्धीचा निश्चयच झाला कीं, स्वातंत्र्य-वादी संघटनेची अघाडी आतां हिंदुस्थानाबाहेरहि उघडलीच पाहिजे. अनौचित्याचा दोष आमच्या संघटनेवर येणार नाहीं, या बद्दल या ठरावामुळं आमची खात्री पटली "

"मग कॉंग्रेसनं ऑगस्ट १९४२ चा ठराव केला नसता तर आझाद हिंद संघटना व फौज अस्तित्वातच आली नसती असाच या उत्तराचा निष्कर्ष मी समजूं काय?" असा माझा अखेरचा सवाल होताच!

"मित्रा या प्रश्नाला इतकं ठाम उत्तर देणं कठीण आहे"! असं म्हणून प्रेम माझ्या या कोंडीतून अखेरच्या कसाबसा निसटला!

× × ×

# भाग ८ वा

## प्रेमनं सांगितलेल्या नेताजीच्या आठवणी.

जानेवारी महिन्याच्या १२ तारखेला तीन प्रहरी प्रेमला मी त्याच्या बंगल्यावर फिरून भेटलो. तो प्रसंग मोठा भव्य व भाग्य–सूचक दिसत होता! स्वच्छ निळया आकाशांत प्रातःकाळचें सौम्य रुपेरी सूर्यबिंब सर्वत्र आल्हादकारी सोनेरी किरण फेंकीत होतें. नुकत्याच धुकाळ हवेंतून हा स्वच्छ सूर्यप्रकाश प्रकट झाल्यामुळें तर, तो फारच उल्हास-मय वाटत होता. शरीरावर पडणारी प्रत्येक सोनेरी किरण–शलाका जणु नवचैतन्यच शरीरांत ओतीत होती!

कांहीं मिनिटें प्रेमची वाट पहात मी त्याच्या बैठकीच्या खोलींत बसलों, नंतर प्रेम बाहेर आल्यानंतर बंगल्या भोवतालच्या बागेंतील सुरम्य लतामंडपांत आम्हीं दोघं जाऊन बसलों. आल्हाददायी गरम झऱ्यांत स्नान करीत असल्या इतकी ती बैठक सुखदायी होती. त्यांतच बागेंतील सुगंधी फुलांचा सौम्य सुवास सर्वत्र दरवळून या उल्हासांत भर टाकीत होता.

मला या मुलाखतीसाठीं, अर्ध्याच तासाची सवड दिली असल्या-मुळं, मी माझ्या प्रश्नांना ताबडतोब हात घालीन अशी प्रेमची अपेक्षा असावी. पण या निसर्गरम्य आल्हाददायी सुवासनाच्या मोहांत गुरफ-टून मी भानच विसरून गेलों! या अमृतमय अनुभवांतून बाहेर पडूंनयेसंच मला वाटूं लागलं!

पण प्रेमनंच माझ्या या सुखसमाधीचा भंग करून प्रश्न विचार-ण्याची सूचना मला डिवचून केली! त्याची आज्ञा मानणं मला भागच पडलं!

× × ×

" नेताजी तुम्हांला केव्हां प्रथम भेटले आणि त्यांच्या जीवनांतील कोणत्या विशेष गुणांचा तुमच्यावर परिणाम झाला?" हा माझा पहिला प्रश्न होता.

प्रेम उत्तरला:—" २ जुलई १९४३ रोजीं सिंगापूरला नेताजी प्रथम आले त्यावेळीं त्यांची माझी पहिली भेट झाली. त्या शुभदिनीं विमानतळावर नेताजींचं स्वागत करून मी त्यांना त्यांच्या बंगल्यावर पोचवलं. तीन दिवसांनंतर आझाद-हिंद फौजेचा लष्करी चिटणीस या अधिकृत नात्यानं मी नेताजींना फिरून भेटलों.

आझाद-हिंद-फौजेच्या राष्ट्रीय अन् व्यापक संघटने संबंधीं नेताजींशीं माझा दोन तास तपशीलवार विचार विनिमय झाला. मूळच्या नागरी पेशांतील या गृहस्थाला लष्करी जीवनाचा इतका दैनंदिन व खडानूखडा तपशील अवगत असेल, याची मला खरोखर कल्पनाच नसल्यामुळं, मी नेताजींच्या या अमर्याद लष्करी तज्ज्ञतेनं थक्कच झालों!

" अगदीं बारीक सारीक तपशिलांत सखोल बुडी मारून नेताजी मुरब्बी लष्करी तज्ज्ञासारखा अचूक सल्ला देत! प्रत्येक बाबी विषयीं पुरें समाधान होईपर्यंत तिचा तपशीलन् तपशील पिंजून काढण्याची नेताजींची ती पद्धत खरोखरच मला असामान्य वाटली! "

" आमची वरील प्रकारची चर्चा चालली असतां नागरी-जीवना संबंधी कांहीं प्रश्न विचारण्यासाठीं नेताजीकडे एक गृहस्थ आले."

" विजेच्या वेगानें नेताजी त्याहि प्रश्नाकडे अचूक वळले! त्याहि विषयांतील सखोल आणि व्यापक असा नेताजींचा माहितगारपणा पाहून मला अचंबाच वाटला "!

" प्रत्येक आल्या गेल्या व्यक्तींशीं अत्यंत विनयपूर्वक वागण्याचं नेताजींचं तें असामान्य सौजन्यहि माझ्या डोळ्यांत भरल्यावांचून राहिलं नाहीं " माझा स्वतःचाच अनुभव घ्या ना! वास्तविक नेताजींची व माझी अधिकृतरीत्या व सावकाशीने झालेली ही पहिलीच भेट; पण त्यांच्या सौजन्यपूर्ण प्रेमळ वागण्यामुळं मला लगेच त्यांच्याशीं बोलण्याचालण्यात आपलेपणा वाटूं लागला! थोड्याच वेळांत त्यांचा व माझा जणु पुष्कळ वर्षांचा स्नेह असावा, अशा खेळीमेळीनं मीं तिथं वागूं लागलों. आल्या गेलेल्याशीं वागतांना संकोच व औपचारिकपणा

अशा आकुंचितपणाच्या व्यवहारांचा मागमूसहि नेताजींच्या वागण्यात दिसत नसे ! ”

“ विशेष परिचया नंतर मला असाहि अनुभव आला कीं, केवळ माझ्या पुरतीच नेताजींची ही वागणूक होती असं नसून, सर्वांना सारख्याच आपुलकीनं वागविण्याचा, त्यांचा बाणा, माझ्या सर्रास अनुभवास आला ! ”

“ हिंदुस्थानचा स्वातंत्र्य-संग्राम अखेर नक्कीच विजयी होणार, या प्रमेया वरील नेताजींची नितांत श्रद्धा, हा त्यांच्या स्वभावांतील तिसरा ठळक विशेष माझ्या लक्षांत येऊन चुकला. ते वारंवार बोलत कीं, चालू महायुद्धांत अखेर विजयी कोण झालं, याला माझ्या दृष्टीने महत्त्व नाहीं. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न महायुद्धाच्या यशापयशाच्या गुंताळ्यांत अडकून बसणारा नाहीं. सांप्रतचा काळ कोणत्याहि परिस्थितींत हिंदुस्थानाला अनुकूल असाच आलेला असल्यामुळं, परकीय सत्तेच्या जोखडा पासुन हिंदुस्थानाला मुक्त करण्याच्या या संधीचा पुरेपूर फायदा आम्हीं न घेणं हेंच आत्यंतिक मूर्खपणाचं ठरेल ! ”

“ देशाच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचं नेताजींना वेडच होतं म्हणाना ! देशाच्या स्वातंत्र्याची भाषा निघाली कीं, नेताजींच्या भावना उन्मळून येत. एकाद्या प्रेमी नायकाची त्याच्या प्रियतमेपासून निष्कारण कोणी ताटातूट केली असता त्याची जशी स्थिती होते, तशीच हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याचे वेडापायीं नेताजींची स्थिती झाली होती ! ”

“ हिंदुस्थानाची गुलामगिरींतून मुक्तता करण्यासाठीं झगडण्याच्या ध्येयापासून नेताजींनी परावृत्त करण्यकरितां कितीहि संपत्ति, कितीहि

सत्ता, किंवा कितीहि अमर्याद मानमरातब यांचीं आमिषें केव्हांहि समर्थ ठरलींच नसतीं ! "

"नेताजींची भूमिका सामान्य राजकीय पुढाऱ्याच्या किती तरी पलीकडची व उच्च दर्जाची होती. सत्तेच्या मागं लागणाऱ्या राजकारणाचा त्यांना मनस्वी तिटकाराच होता ! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यावांचून त्यांच्या मेंदूत इतर कल्पनांना थाराच नव्हता. कोणता पक्ष अधिकारारूढ होईल आणि कोणत्या पक्षाच्या हातीं सत्तेचीं सूत्रें जातील, असल्या कल्पनाच नेताजींच्या मनाला कधीं शिवल्या नाहींत. आपल्याला कोणत्या स्वरूपाचं सरकार हवं हें जनतेनंच ठरवावं, या तत्त्वावरच त्यांची नितांत श्रद्धा होती. "

" स्वतंत्र हिंदुस्थानच्या तात्पुरत्या सरकारचे नेते म्हणून नेताजींचा शपथविधी झाला, त्याचं वर्णन कराल कां ?" असा प्रश्न मी प्रेमला टाकला; त्याला उत्तर देतांना प्रेम म्हणाला:—

" तो प्रसंग तर माझ्या स्मरण-तंतूवर इतका ठाम व स्पष्ट उमटला आहे कीं, मला त्याचं विस्मरण कधींहि होणं शक्य नाहीं. २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं सिंगापूर येथील कॅथेइमारतींत नेताजींनीं तात्पुरत्या स्वतंत्र हिंदी सरकारचा जाहीरनामा वाचला. त्या थोर गंभीर प्रसंगीं, हजर असलेल्या सर्वांचीं हृदयें भावनांनीं नुसतीं ओथंबलीं होतीं ! आझादहिंद सरकाराशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतांना नेताजी एकदम् मुग्ध व निश्चल होते ! त्यांच्या तोंडून इच्छा असूनहि शब्दच बाहेर पडेनात. तोंडांतून शब्द बाहेर पडण्याऐवजीं नेताजींच्या

डोळ्यांतून सद्‍गदित भावनांचे अश्रू बाहेर लोटले ! दहा मिनिटें या पवित्र अश्रूंनी नेताजींना हृदय-स्नानच घातेंल म्हणाना ! "

" निदान माझ्या उभ्या आयुष्यांत तरी असला हृदयस्पर्शी प्रसंग माझ्या अनुभवांत नाहीं ! "

अखेर अंतःकरणांतील भावनांचे वादळ ओसरून समतोलपणावर कसाबसा ताबा मिळविल्यावर, नेताजी मंद आवाजानं हळुं हळूं बोलूं लागले:—

" मी सदैव हिंदभूमीचा सेवकच राहीन; आणि माझ्या ३८ कोट बंधु-भगिनींना स्वतंत्र करण्याची सतत चिंता वाहीन. हेंच माझें सर्वोत्तम असं कर्तव्य राहील "

" स्वातंत्र्य-संपादनाचं ध्येय सिद्ध झाल्यावर देखील तें स्वातंत्र्य सुरक्षित राखण्यासाठीं माझ्या शरीरांतील थेंबन् थेंब खर्ची टाकण्यास मी सदैव तत्पर असेन "

" नेताजी वरील आशयाच्या शपथेचं वाचन करीत असतां , मी त्यांच्याकडं लक्ष एकवटून पहात होतो. पूर्वआशियांतील हिंदी प्रतिनिधीकडं जरी बाह्यतः नेताजी पहात होतें तरी, त्यांच मन हिंदुस्थानांतील कोट्यावधि बहुजनसमाजावर खिळलं होतं. हें मला स्पष्ट समजत होतं. देशांतील या बहुजनसमाजाकरितांच नेताजींनीं आपलें लढाऊ शस्त्र उपसलं नव्हतं काय ? "

" अशाच प्रकारच्या दुसऱ्या एका गंभीर प्रसंगाचं वर्णन या ठिकाणीं सांगण्यासारखं आहे. ६ जुलई १९४४ रोजीं रंगून रेडिओ स्टेशनवरून महात्माजींकरतां एक संदेश नेताजींनीं वांचला. स्टूडि-

योच्या त्या केंद्रांत आझाद हिंद प्रचार-मंत्रि श्री. आयर नेताजींचे अडज्यूटंट ले. कर्नल बी. एस. रावत आणि मी स्वतः, असे तिघे हजर होतो. हा संदेश इतक्या आदरपूर्ण लडिवाळ आवाजानं नेताजींनीं वाचला कीं, जणुं मुलगा आपल्या वडिलांशीं हितगुज करतोय! नेताजींचा त्या वेळचा शब्दन् शब्द प्रेमानं व विनीत भावानं ओथंबला होता!"

"वरील संदेशाच्या समारोपाचं वाक्य पुढीलप्रमाणें होतें—आमच्या राष्ट्राचे पिताजी, हिंदुस्थानाला स्वतंत्र करण्यासाठीं आम्ही सुरू केलेल्या या पवित्र युद्धांत आपला आशीर्वाद व शुभेच्छा यांची मी आपल्या-जवळ भीक मागत आहे! या वेळीं नेताजींचा आत्मा गरुडाच्या भरारीनं हिंदुस्थानांत उडाला होता आणि महात्माजींच्या चरणावर हात ठेवूनच ही भिक्षा मागत होता, असं मला भासलं!"

"स्त्रियांना व मुलांना वागवितांना नेताजी ब्रह्मचारी होते या वस्तुस्थितीचा कांहीं परिणाम तुम्हांला जाणवला कां?" असा धिटाईचा प्रश्न प्रेमला करण्यासहि मी कचरलों नाहीं.!

उत्तर देतांना प्रेम पुढं बोलला—

"इतक्या दयाळू बाण्यानं स्त्रियांना वागविणारा पुरुष माझ्या आयुष्यांत मी पाहिलाच नाहीं, असं मी म्हटलं तर तुम्हांला आश्चर्यच वाटेल! कितीहि कामांत नेताजी गढले असतां एखादी स्त्री भेटावयास आली तर सर्व कामें बाजूला ठेवून आधीं तिची चौकशी ते करीत. अशा स्त्रीचं गाऱ्हाणं अत्यंत लक्षपूर्वक ऐकून घेत व तिला यत्किंचितूहि त्रास पोंचणार नाहीं, याची खबरदारी घेत. अशा बाईला परत घरीं

जातांना वाहनाची सोय नसल्यास नेताजी स्वतःची मोटार देत. मग स्वतःवर पायीं बाहेर जाण्याचा प्रसंग आला तरी, त्याची त्यांना पर्वा नसे ! ”

“ मुलांचे लाड पुरविणारा नेताजींसारखा मनुष्यहि मला अद्याप आढळला नाहीं. एकदां रस्त्यानं आमची गाडी चालली असतां बाजूच्या शेतांत तीन मुलं खेळत होतीं. गाडी थांबवून नेताजी रस्त्यांतच त्या मुलांशीं एखाद्या बापाच्या मायेनें बोलत राहिले ! ”

“ रंगूनमध्यें नेताजींची गाडी एकदां एकदम नादुरुस्त झाली. काम तातडीचं व निकडीचंहि असल्यामुळं, नेताजी खूपच संतापले होते ! ड्रायव्हर बिचारा सर्व शक्ति एकवटून गाडी लवकर दुरुस्त करण्यासाठीं धडपडत होता. इतक्यांत कांहीं मुलं व मुलीं नेताजीभोंवतीं गोळा झालीं ! नेताजींचा संताप कोठच्या कोठें ओसरला अन् त्या मुलांशीं खेळण्यांतच नेताजी गर्क झाले ! ”

“ दरम्यान ‘ गाडी नीट झाली ’ म्हणून ड्रायव्हरनं पुढं चलण्याचा इषारा दिला तरी, त्या मुलांशीं नेताजींचं लडिवाळपणाचं बोलणं संपेचना ! ”

“ अखेर एकदां गाडींत बसले अन् मग घड्याळाकडे लक्ष गेल्यावर म्हणतात अरे, किती तरी उशीर झाला हा आपल्याला ! ”

“ पण त्या मुलांशीं पोरकट चाळे करण्यांत आपण दंग होतात ना ? ” मी म्हटलं.

“ जाऊं द्या हो, त्या आनंदाची ही किंमत म्हणजे कांहींच नव्हे ” नेताजी हंसत हंसत उत्तरले !

× × × ×

[ ३ ]

" आझाद हिंद सैनिकांनीं गाजविलेल्या कांहीं शौर्यकथांची हकीगत सांगाल काय ? " असं मी विचारलं.

प्रेम म्हणाला, " प्रत्येक आघाडीवरच आझाद हिंद सैनिक इतक्या शौर्य—धैर्यानं लढले कीं, या पुढील अनेक हिंदी पिढ्यांना ते लढे स्फूर्तिदायक ठरतील ! अशा लढ्यांच्या शेंकडों कथा आहेत; त्यांतून निवड तरी कशी करणार ? "

" तुमच्या तुकडींतील आझाद वीरांच्या शौर्य-धैर्य-कथाच तेवढ्या सांगितल्यात तर तें सोइस्कर नाहीं का ठरणार ? " मी लोचटपणानं विचारलं.

मग प्रेम सांगूं लागलाः——

" ३ एप्रिल १९४५ रोजीं लेगीयो टापूंत दुसऱ्या ब्रिटिश डिविजननें माझ्या तुकडींतील आझाद फौजींना सर्व बाजूंनीं गराडलं. संध्याकाळीं मला एक संदेश मिळाला कीं, एका ब्रिटिश बॅटलियननें माझ्या तुकडीच्या पिछाडीस जाऊन बी एकलॉन ठाणं काबीज केलें. त्यावेळीं आझाद फौजींच्या फक्त दोनच तुकड्या मला एकत्र करतां आल्या. त्यांना एकत्र करून मी बोललों " पाहलंत एका ब्रि. बॅटिलियननं अगदीं माऱ्याची जागा काबीज केली असून तुमच्या-वरच, आम्हां सर्वांचं अस्तित्व अवलंबून आहे. आतां जास्त सैनिक मदतीला येणं अशक्य असल्यामुळं, या कोंडींतून सर्वांचा बचाव फक्त तुम्हींच करूं शकाल ! "

त्यांपैकीं एक फौजी वळून झटकन् बोलला " आमच्यावर अजूनहि नाहीं तुमचा विश्वास ? ' शत्रूच्या १२० सैनिकांशीं आमचा एक ' असं प्रमाण असलं तरीहि, आम्ही शत्रूचा पराभव करूं, असा आतांपर्यंतचा अनुभव नाहीं कां ? आमच्यावर कां नसावा आपला विश्वास ?" त्याच्या या आत्मविश्वासाच्या ग्वाहीला इतर आझाद फौजींनीहि मान तुकावून संमति दिली !

अखेर फक्त दोनच तुकड्यांतील आझाद फौजींनीं आल्या ब्रिटिश बॅटलियनवर एकदम हल्ला चढविला अन् केवळ इच्छाशक्ति व धैर्य यांच्या जोरावर, शत्रूला उखडून काढलें ! ब्रिटिश सैनिकांजवळ अव्वल दर्जाची अद्यावत् शस्त्रसामुग्री असूनहि, आमच्या आझाद-हिंद फौजीपुढें कांहींहि न चालतां त्यांना हारच खावी लागली ! "

" दिल्ली चलो, नेताजी की जय-" अशी गर्जना करीत आझाद हिंद फौजीं ब्रिटिश बॅटलीयनवर तुटून पडले त्यावेळीं त्या ब्रिटिश सैन्याची एकदम त्रेधा—तिरपीट उडाली ! कारण एवढेसे तुटपुंजे सैनिक प्रचंड बॅटॅलियनवर इतक्या आवेशानं तुटून पडतील हें बिचाऱ्यांच्या ध्यानींमनींहि नव्हतं ! ब्रिटिश बॅटॅलियननें नंतर गोळ्यांचा नुसता पाऊस पाडला तरी, आझाद हिंद फौजी तसूंभर देखील मागं हटले नाहींत ! त्यांचा तो कृतांतकालासारखा निर्धार पाहून, अखेर ब्रिटिश बॅटॅलियनला काढता पाय घ्यावा लागला ! "

' इतकी आत्मस्तुति बस् झाली नाहीं ? ' असं म्हणून प्रेमनं मुलाखत संपविण्याचा इषारा दिला !

आणखी एखाद्याच प्रसंगाचं वर्णन करा, मग मी आपल्याला आणखी त्रास देणार नाहीं " असं म्हणून मी प्रेमला आणखी सतावलंच !

प्रेम सांगूं लागला.

" आम्हां आझाद फौजीजवळ अँटी टँक हत्यारं जवळ जवळ मुळींच नव्हतीं. यामुळं ' सुइसाइड स्कॉडस् ' अगर आत्महत्त्या-सज्ज स्वयंसेवकांची भरती करण्याची आमच्यावर वारंवार पाळी येई ! आमच्या फौजींत असलं ' भयंकर दिव्य ' करणाऱ्या आझाद-फौजींची सदैव गर्दी असे. शत्रूच्या टँक्सवर गहजब करण्यासाठीं कंबरेभोंवतीं स्फोटकें बांधून कहर करणाऱ्या ' ह्यूमन टॉर्पेडोज ' उर्फ मानवी टॉर्पेडोची आमच्या आझाद फौजेंत वाण नव्हती ! "

प्रत्येक वेळीं असल्या हुतात्मा-फौजींची मागणी केली कीं, आम्हांला हवें असल्यापेक्षां जास्त स्वयंसेवक नेहमीं या दलांत भरती होत, असं म्हटल्यास तुम्ही आश्चर्यचकित व्हाल ! पोपाहिल टापूंत असे चारच स्वयंसेवक आम्हांला हवे होते, तर ५० जण त्याकरितां पुढं आले ! [illegible]

नंतरच्या सैनिकांना [illegible]

इसम सर्वांत वयस्क असा निवडला ! बाकीचे ४६ जण अत्यंत दुःखी झाले आणि निवडलेल्या चौघांना स्वर्गसुखाचा हर्ष झालासा दिसला ! "

× × × ×

[ ४ ]

वाचकहो, मरण आणि मत्सर हें शब्द कधीं एकत्र येऊं शकतात ? मरणासाठीं कां कोणी चढाओढ करतं ? सामान्य माणसांना हें

चमत्कारिक वाटतं ! पण मर्द व शूर यांच्या ठिकाणींच हा असामान्य मत्सर असूं शकतो ?

" देशाच्या स्वातंत्र्यासाठीं तळहातावर शिरें घेतलेल्या त्या शूर मर्दांचे चेहेरे अजूनहि माझ्या डोळ्यांसमोर दिसतात " प्रेम पुढं सांगत होता.—

" मरण हेंच जीवनापेक्षां प्रखरं असं सत्य आहे, हें त्या शूर मर्दांना पटलं होतं. हिंदमातेच्या इभ्रतीप्रीत्यर्थ आपल्या मृत्यूचा क्षण ठरविण्याचं परमेश्वरी इच्छेलाच या शूर मर्दांनीं जणु आव्हान दिलं होतं ! "

अशा शूरमर्द आझाद हिंद वीराचं चित्रं माझ्या डोळ्यांपुढं उभं करण्याची मी पंधरा मिनिटांवर पराकाष्ठा केली; पण मला त्यांत यश आलं नाहीं !

नैतिक दृष्टीन अधःपात झालेल्या सुखवस्तु श्रीमंत व मध्यम वर्गाचा प्रतिनिधी बनण्याचं पाप माझ्या वाट्याला आलेलं ! शत्रूची त्रेधा-तिरपीट उडविण्यासाठी, स्वतःच्या कंबरेला टॉर्पेडो बांधून त्या टॅंकवर टॉर्पेडोसह स्वतःच्या शरीराच्या ठिकऱ्या उधळणाऱ्या हुतात्में शूर मर्दांचं मानसिक दर्शन घडण्याइतकी तरी पुण्याई माझ्या वांट्याला कोठून असणार ?

स्वतःच्या हीनपणाचं हें हिडिस्स आदर्शन घडल्यामुळं, मला भोंवळ आल्या प्रमाणं क्षणभर झालं ! तिरस्काराच्या उंचच उंच कड्यावर मी उभा असून ती घटना बेछूटपणानें नैराश्य व वैफल्यानें

खोलखोल आळसाच्या जांभया देणाऱ्या माझ्याकडं पाहून विकट हास्य करीत असल्याचाच, भास, मला क्षणभर, होत होता !

वरील भावनेच्या भरांत माझं शरीर थरथर कांपू लागलं, हातपाय लटपटूं लागले, मी हातांतील झरणी टेबलावर फेंकून दिली आणि अंथरुणांत स्वत:ला घुसडून घेऊन जाड पांघरुणाखालीं तोंडासह सर्व शरीर लपविलं ! पण पुढं काय केलं ? गुलामवृत्तीची माणसं जें करतात तेंच ! झोंप, झोंप, झोंप !!

म्हणच आहे कीं

'झोंपणाराचं नशीबही झोंपूनच राहतं' !

---

## भाग ९ वा

### शहानवाझ—अभिजात 'राजा'

कॅ. बऱ्हाणुद्दिन यांच्यावरील खटल्याच्या एका उपहाराचे सुटींत शहानवाझची मुलाखत मला मिळाली. माझे मित्र श्री. इंद्रदेव दुआ यांच्याबरोबर श्री. आर. सी. सोवनी यांच्या बंगल्यावर मी गेलों. तिथंच त्या दिवशीं कॅ. शहानवाझ यांना खाना होता. तिथं विनंति केल्याबरोबर पांचच मिनिटं अनेक कार्यक्रम-संकेतांनीं भरलेली आपली रोजनिशी धुंडाळुन सायंकाळीं अर्ध्या तासाचा वेळ खास मुलाखतीसाठीं शहानवाझनीं मला दिला.

शहानवाझ यांच्यांत पहिली मला दिसलेली असामान्य गोष्ट म्हणजे त्यांचा राजशाही थाटानं पावलं टाकण्याचा सहज-सुंदर रुबाब !

त्यांची पावलं थोड्या अंतरानं अन् स्थिर पडतात आणि त्यांची सरळ अन् ऐटदार गति, पाहणाऱ्याच्या मनांवर, आदराची छाप टाकते. त्यांच्या हालचालींत उगाच धावपळ व अवयवांच्या हालचालींत अकारण अस्थिरपणाची येवढीशीहि झांक दिसत नाहीं.

शहानवाझ म्हणजे खानदानीची आदर्श मूर्तिच! पहाणाराला याच मूर्तिकडं एक सारखं पहात रहावंसं वाटतं! 'खानदान' असं नुसतं नांव समारंभांत मिरविणाऱ्या बुद्रुकांपेक्षां मात्र शहानवाझ एकदम वेगळा अन् उमदा! नाहीं तर समारंभांत गोऱ्या साहेबाची खुशामत करीत गोंडा घोळणारे, अन् आम्ही 'खानदान' म्हणून जाहिरात करणारे विदूषक लक्ष्मीधर, लाहोरांत पैशाचे पासरी मिळतातच!

कुठं ते शहानवाझच्या अंगचं राजहंसासारखं स्वच्छ निर्मळ पावित्र्य अन् कुठं ती 'खानदान' पदवी लावणारीं लक्ष्मीधर मांकडं? अहाहा! काय पण त्यांचीं ध्यानं! भपकेदार इंग्रजी पोषाखाची भ्रष्ट नक्कल केली, अन् हातीं 'छोटा पेग' घेऊन गोऱ्या साहेबा पुढं गोंडा घोळला, म्हणजे का कुणी 'खानदान' होत असतात? शहानवाझ सारख्या अभिजात 'खानदान राजा' पुढं ओंवाळून टाका असलीं शेकडों विदूषकीं मर्कटं!

अत्यंत कसलेला खरा खानदान आवाज हा शहानवाझच्या अंगचा दुसरा विशेष गुण मला दिसला! त्याचं बोलणं इतकं सुस्पष्ट व खणखणीत असतं कीं 'बेग युवर पार्डन' किंवा 'कां काय म्हटलंत?' असं विचारण्याची पाळी ऐकणारांवर कधींच येत नाहीं!

समारंभांत नाचऱ्या श्रीमंत रमणीं पुढं शब्द चोरून बोलणाऱ्या लक्ष्मीधरांचं ढोंग तर शहानवाझच्या वागण्या बोलण्यांत केव्हांच दिसत नाहीं ! ' ऑक्सफर्ड इंग्रजीची ' नक्कल करीत बोलणारे लक्ष्मीधर, रस्त्यावर भिक्षेचा खेळ खेळणाऱ्या ' फुक मारतो मट्टी लगातो ' करणाऱ्या डोंबाऱ्या सारखे मात्र वाटतात !

शहानवाझची बोलण्याची ढब मध्य पंजाब आणि सरहद्द यांचं सुंदर मिश्रण आहे. या दोन वेगवेगळ्या आणि अस्सल संस्कृतींचा सुरेल संगमच ! शहानवाझच्या वाणींतच जणुं जातीय ऐक्याचं संगीत सांठविलेलं आहे. शहानवझची मातृभूमि पंजाब व सरहद्द या दोन अभिजात खानदान प्रांतांच्या सरहद्दीवर असल्यामुळं शहानवाझची व्यक्ति हीच मुळीं दोन संस्कृति-संगमाच्या आदर्श प्रतीकाची मूर्ति ऐक्यप्रवृत्तीचा हा सुरेल सुंदर मूल्यवान ठेवा वंशपरंपरेनंच जणु शहानवाझ यांच्या ठिकाणीं परिणति पावला असावा !

घर बांधुन मनुष्य संसाराला प्रारंभ करतो. पण माणसाला पुनर्जन्म देऊन घर आपला संसार संपविते !

जिला ' वंशपरपरा ' म्हणनात आणि जी घडण्याचे कामीं अनेक विविध घटना कारणीभूत होतात, त्यांना निश्चित वळण देणें, एकजीव करणें किंवा आकार देणें, इत्यादि क्रियांचा तरुण पिढींवर प्रभावी परिणाम करणारी भरीव रसायनरूपी भट्टी कोणती असेल तर, ज्या जन्मभूमींत मुलं जन्म घेतात ती जन्मभूमीच !

आध्यात्मिक दृष्टीनं मानव हा ईश्वराचा पुत्र असेल; पण व्यवहारी संसारी दृष्टीनं, जन्मभूमीनं पोसलेलं तें एक लेंकरूंच ! ' आम्ही

आमच्या मातृभूची लेकरं' असं आपण उगीचंच कां अभिमानानं बोलतों!

जन्मभूमि ऐक्य-भावनेचं हें जें सूत्र निर्माण करते, त्या ऐक्य संघटनेला संमिश्र रुपांनीं एकत्र एकजीव होणाऱ्या अनेक सुप्तशक्ति मदत करून मजबुती आणीत असतात. संमिश्र वर्णवंश परंपरेच्या या ठेव्याला, स्थल वाचक राष्ट्रीय भावनेच्या सुईनं, ऐक्य–संघटनेच्या सूत्रांत गोंवणंच शक्तीच्या मजबुतीला पोषक ठरतं. दुबळेपणाला तर हें कधींच कारणीभूत होत नाहीं.

तात्पर्य पंजाब व सरहद्दप्रांत या दोन भूमींतील उत्तमोत्तम गुणांचें आदर्श मिश्रण शहानवाझच्या विभूतिमत्वांत आढळून येतें.

× × × ×

( २ )

सायंकाळीं ६ वाजतां प्रेम सैगलच्या निवासांतच मी शहानवाझला भेटलों. बैठकींच्या खोलींत खूपच गर्दी झालीं होती. एकट्या शहान· वाझशींच बोलावयास मिळावं अशी माझी इच्छा असल्यामुळं, गर्दी करणाऱ्या लोकांचा मला मत्सर वाटला, हें प्रांजलपणें कबूल केलेंच पाहिजे!

त्या बैठकीच्या खोलींत बसलेल्या स्त्री–पुरुष मुलांवर शहानवाझच्या विभूतिमत्वाची इतकी छाप पडली होती कीं, त्यांच्यांतून एकदम शहानवाझलाच ओढून बाजूला नेणं खरोखर अप्रशस्तच ठरलं असतं! त्यांच्या भाषणाचा त्या सर्वांवर इतका परिणाम झालेला दिसत होता कीं, प्रत्येक शद्बागणिक जणु सर्व प्रेक्षक देशभक्तीचा गडच पायरी

पायरीनं वर चढत होते! देशभक्तीचा तो उच्चप्रदेश कीं, जिथं निर्भय हृदयाच्या माणसांनाच प्रवेश मिळतो, जिथं स्वतःच्या जीवितांपेक्षां देशाच्या इभ्रतीला जास्त मानणाऱ्या लोकांनाच डोळसपणा येतो आणि ज्या ठिकाणीं वैभवशाली मरणाला, जीवनाला आणि स्वातंत्र्याला अमरत्व लाभतें, अशा त्या अमर देशभक्तीच्या प्रदेशांत तो प्रेक्षक–गण वावरतांना दिसत होता! जिथं देशभक्त जीवनाची मेणबत्ति देशहितांकरतां इंचाइंचानं जाळून झिजवितात आणि जिथं जतींद्रनाथ दासासारखे हुतात्मे शांति–समाधानाच्या स्वर्गाशीं एकरूप झालेले असतात!

\+ + +

[ ३ ]

पण दुसऱ्याच दिवशीं सायंकाळीं शहानवाझला दिल्लीस जावयाचं असल्यामुळं, त्याच दिवाणखान्यांतील एका कोपऱ्याच्या जागेंत मला बोलवून शहानवाझ माझ्याशीं बोलत बसला.

'आपली व नेताजीची प्रथम भेट केंव्हां झाली?' हा सलामीचा प्रश्न मी शहानवाझलाहि विचारला!

शहानवाज बोलला:—"२ जुलई १९४३ रोजीं सिंगापुरांत नेताजीची व माझी पहिली भेट झीली. जर्मनीहून ते आले त्या वेळीं, विमान-ठाणावरच मी त्यांचें स्वागत करण्यास हजर होतों. ही भेट औपचारिकच होती. त्यांनीं गार्ड ऑफ ऑनर्सची पाहणी केली अन् थोडेसें भाषण केलें."

‘ पुढं दुसऱ्यान केव्हां भेटले ? ’ मी फिरुन विचारलें. शहानवाझ उत्तरले:—“ १९४३ च्या आगष्टमध्यें; ज्या वेळीं तात्पुरत्या आझाद हिंद सरकारची स्थापना होऊन माझी एक मंत्री म्हणून नेमणूक झाली होती. मला पुढं नेताजींनींच कळविलं कीं, फील्ड मार्शल काऊंट तेराशी या आग्नेय आशियांतील जपानी फौजांच्या सरसेनापतींनीं मला खाण्यासाठीं निमंत्रिलें आहे. त्याप्रमाणें नेताजी कॅ. लक्ष्मी व मी काउंट तेराशीच्या बंगल्यावर गेलों. ”

“ खान्याचे वेळीं काउंट तेराशींनीं खुलासा केला कीं, जपानी फौजा आतां हिंदुस्थानकडे कूच करण्यासाठीं सज्ज असून फक्त नेताजींच्या हुकमाची वाट पहात आहे. ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून हांकलून लावण्यासाठीं सर्व प्रकारें सर्वस्वीं लढण्यासहि, जपानी सैनिक तयार असल्याचा खुलासा त्यांनीं केला. ब्रिटिशांना पूर्णपणें हिंदुस्थानांतून हाकलून लावल्यावर स्वतंत्र हिंदुस्थानाचीं सर्व सूत्रें हिंदी जनतेच्या हातीं देण्यासहि जपान सरकार तयार आहे, असेंहि का. तेराशीं म्हणाले. का. तेराशींच्या मतें नेताजींच्या सहकार्या पलीकडे जपान्यांना या बाबतींत कसलीहि दुसरी अपेक्षाच नाहीं ! ”

“ पण का. तेराशींना नेताजींनीं बजावलें कीं, जपान्यांनींच सर्व त्याग करून हिंदुस्थान स्वतंत्र झाला तर त्या स्वातंत्र्याचे स्वरूप गुलामगिरीपेक्षांहि हिडिस ठरेल ! हिंदुस्थानाच्या मोहिमेंत आघाडीवर आझाद हिंद फौज असल्यावांचून हिंदुस्थानवर चालून जाणाऱ्या फक्त जपानी फौजेशीं केव्हांहि सहकार्य करण्यास मी तयार नाहीं.

माझी आग्रही अट हीच आहे कीं, हिंदुस्थानच्या इभ्रतीचा मान राखण्यासाठीं आझादहिंदफौजेंतील हिंदी सैनिकांच्याच रक्ताचा पहिला थेंब हिंदभूमीच्या सरहद्दींत सांडला पाहिजे. ”

“ काउंट तेराशींनीं नेताजींच्या या अटी अखेर मान्य केल्यावर आम्हीं आमच्या यजमानाचे आभार मानून बाहेर पडलों. ”

“ आणखी कांहीं काळानंतर नेताजींनीं मला मुलाखतीसाठीं बोलावून घेतलं. या बैठकींत हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं कोणत्याहि प्रकारची कुचराई न करितां देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राणांसह सर्वार्पण करण्यास तयार असणारांची एक यादी तयार करावयाची असं आमचं ठरलं ! ”

“ पन्नास हजार अधिकारी व सैनिक यांच्यांतून नेताजींनीं तीन हजार आझादहिंदवीरांची वरील कसोटी लावून निवड केली. या तीन हजारांच्या गटाला ‘ सुभाष ब्रिगेड ’ असं नांव नेताजींनीं दिलं आणि या गटाचा मला सेनानी ठरविलं ! ”

× × × ×

[ ४ ]

आमची वरीलप्रमाणं मुलाखत सुरू असतांच कांहीं तरूण शहानवाझच्या भेटीसाठीं आले. त्यांपैकीं प्रत्येकाला आलिंगन देऊन मोठ्या खेळीमेळीनं त्यांच्याशीं शहानवाझनं गप्पा सुरू केल्या. हे लोक शहानवाझचे शाळासोबती असावे. कारण प्रत्येकजण, कांहींना कांहीं, शाळेंतील आपले ‘ बाल-पराक्रम ’ सांगत होता अन् सर्वजण पोट धरधरून खो खो हंसत होते ! हा हास्य–विनोद इतक्या खुल्या

दिलाचा आणि अकृत्रिम सौंदर्याचा होता कीं, क्षणभर आपणहि यांच्यापैकींच एक आहों, असा मला भास झाला!

यापुढं तरी शहानवाझ एकटाच आपल्या वांटणीला येणं शक्य नाहीं, याबद्दल माझी खात्री होऊन चुकली! तेव्हां माझा कॉलेज मित्र प्रेम सहानी याच्या शेजारीं मी जाऊन बसलों. हा माझा दोस्त दंतवैद्य असला तरी हिंदुस्थानच्या राजकारणाचे विचार–प्रवाह आणि इंगित समजून घेण्याची त्याला भारी हौस! चालू राजकारणांतील कांहीं खुबीदार प्रश्नांचा खुलासा त्याला मजकडून हवा होता.

मी माझ्या मित्राचं समाधान करण्याचा शक्य तो प्रयत्न केला खरा; पण माझं सर्व लक्ष्य शहानवाझच्या बोलण्यावरच खिळलं होतं! या शूर धीर वीराच्या तोंडून उत्कृष्ट चमत्काराची ताजी कथा माझ्या पदरांत पाडून घेण्यासाठीं माझी सर्व धडपड होती!

त्याच्याशीं बोलण्यांतील माझा तो उदासीनपणा प्रेम सहानीला बोचल्यावांचून राहिला नाहीं! त्यानं अखेर मला चांगलाच दम दिला अन् अखेर धाकहि घातला कीं, "फिरून माझ्या खोलीवर तरी ये बेट्या, म्हणजे तुझी ती रुपेरी मंजूषिका 'डलिवसी' सिगारेटसूनीं भरून देतो कां बघ!"

\+ + + +

[ ५ ]

इतक्यांत एक गौरवर्णाच्या व मध्यम वयाच्या बाई शहानवाझ बसला होता त्या कोचा समोरील आसनावर येऊन बसल्या. कोपऱ्या-

वरील आसन सोडून त्या मुद्दाम या आसनावर येऊन बसल्या; त्याअर्थी शहानवाझला त्यांना कांहीं माहिती विचारावयाची होतीसें मला दिसलें. काय व कसं विचारावं याबद्दल मनाची तयारी त्या करीत असाव्या असं त्यांच्या अस्थिर चुळबुळीवरून स्पष्टच लक्षांत येण्यासारखं होतं. लज्जेनं त्यांचा चेहेरा गोरामोरा होत होता !

अखेर, मोठ्या प्रेमळ मातेच्या, लडिवाळ शब्दांनीं त्या शहान-वाझला म्हणाल्या.

"हे पहा, आझाद हिंद फौजेंत तुम्ही प्रथम दाखल झाला त्या वेळीं हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा, तारुण्याचा देखील, होम कर, अशी तुम्हांला हृदयांतल्या परमेश्वरानं प्रेरणा कां केली होती ?"

हा प्रश्न केल्यावर त्या बाईंना हायसं वाटलं असावसं दिसलं. आझाद हिंद फौजेच्या येवढ्या मोठ्या सेनापतीशीं आपण बोललों, त्याच्या नजीक बसलों, अन् इतका जिव्हाळ्याचा प्रश्न धिटाईनं विचारला, ही वस्तुस्थितीच त्या बाईंना स्वतःबद्दल अभिमान वाटण्यासारखी नव्हती कां ? अन् त्या बाईंच्या चर्येवरून तसा अभिमान त्यांना वाटतहि होता असं प्रत्येक प्रेक्षकांनं म्हटलंहि असतं ! प्रेमला असाच प्रश्न मी लोरेंज हॉटेलमध्यें विचारला त्यावेळीं मीहि असाच नव्हतो कां फुशारलों ?

या प्रश्नावर किंचित् गोड स्मित करून शहानवाझ म्हणाला:—
'छे बुवा, मला तरी तसं कांही वाटलं नाहीं !'

पण अशानं कां हिंदी स्त्रीचं कधीं समाधान होणार? शहानवा-झच्या जीवनांतील क्रांतीचं रहस्य जाणून घेण्यासाठीं उत्सुक झालेल्या अशा आर्यमाते पुढं ब्रह्मदेव तरी आपलं गुपित लपवूं शकेल कां? मनाचा पक्का धडा करून ती शहानवाझला फिरून म्हणाली:-

" तर मग खरंच तुम्ही मला सांगा कीं, हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्या-साठीं अगदीं आपला प्राण देखील धोक्यांत घालण्याची स्फूर्ति तुम्हांला कशामुळं हो झाली? " प्रश्नांतील ' मला ' या शब्दावर बाईंचा विशेष जोर दिसला!

गोळी अगदीं वर्मीं लागल्याप्रमाणं अखेर निरुपाय होऊन आणि त्या बाईंच्या मातृवत् प्रेमळपणाची व औत्सुक्याची पुरी छाप अंतःकर-णावर पडून, शहानवाझनें प्रांजळपणानं सांगितलं:—

" आपल्याला कदाचित् माहित असेल कीं, ब्रिटिशांशीं आत्यंतिक निष्ठावंत असलेल्या एका कुटुंबांत माझा जन्म झाला. माझ्या कुटुंबां-तील प्रत्येक पुरुष ब्रिटिश फौजेंतच दाखल झालेला आहे. मीहि उपजतच सैनिक असून लढाईचा मला शोक आहे. सिंगापुरांत ज्या ब्रिटिश फौजा अखेर जपानला शरण गेल्या त्यांत माझी पलटण अगदीं अखेरची होती, याचं आपल्याला आश्चर्य वाटेल. मला मागूनहि जपानी फौजेनं वेढलेलं असल्यामुळें त्या लढाईत आपण पराभूत होणार हें मीं समजून चुकलों होतों. पण सच्चा आणि श्रद्धावंत सैनिक व मर्द माणूस या नात्यानं लढतां लढतां रणांगणावर मरण हेंच माझं कर्तव्य असल्याची मला पूर्ण जाणीव होती. रणांगणावर मृत्यूला कवटाळण्या इतका आनंद सच्चा सैनिकाला दुसरा कोणता असूं शकेल? "

" पण हाय ! आमचे सेनापति आले अन् शस्त्रें खालीं ठेवण्याचा हुकूम त्यांनीं सोडला ! मी व माझं रेजिमेंट यांना लढत राहण्याची संधि देण्याची मी त्यांना विनवणी केली. पण सेनापतींनीं मला विरोध करून सांगितलं कीं, शत्रूची फौज प्रमाणाबाहेर मोठी असल्यामुळं माझ्या सर्व सैनिकांसह मला हां हां म्हणतां ते कापून काढतील ! अशा वेळीं आम्ही शत्रूला विरोध करून त्यांचीं माणसं मारलीं तर, माझ्या रेजिमेंट मधील सैनिकांचा जपानी लोक अनन्वित छळ करतील, असाहि इषारा माझ्या ब्रिटिश सेनानीनं मला या वेळीं दिला ! "

" माझ्या सैनिकांचा अकारण छळ होणार, हा विचार वर्मी झोंबून मी सेनापतीचं म्हणणं मान्य केलं व माझ्या सैनिकांसह शस्त्रें खालीं ठेविलीं ! "

" नंतर आम्हांला युद्धकैदी म्हणून जपान्यांनीं ताब्यांत घेतलं. आम्हांला जपानी सेनानींच्या हवालीं करतांना आमचा ब्रिटिश सेनानी आम्हांला उद्देशून म्हणाला—यापुढं जपानी सेनापतीच्या हुकमाखालीं तुम्ही आहां. आतांपर्यंत माझे हुकूम पाळलेत तसेच त्यांचेहि पाळा; नाहींतर तुम्ही शिक्षेला पात्र व्हाल ! "

या नंतर ज्याच्या ताब्यांत आम्हांला देण्यात आलें त्या जपानी फौजेच प्रमुख आम्हांला बोलला—

" ब्रिटिश, अमेरिकन किंवा ऑस्ट्रेलियन सैनिकांप्रमाणें तुम्ही हिंदी लोक आमचे ' युद्धकैदि ' नाहीं. तुम्ही शस्त्र-संघटना करावी अन् ब्रिटिशांपासून आपलं स्वातंत्र्य हिसकून घ्यावं, अशी आमची इच्छा आहे. या कामीं तुम्हांला लागेल ती मदत व साधनें पुरविण्यास आम्ही तयार आहों ! "

" यानंतर आमची जी स्वतंत्र फौज संघटित करण्यांत आली ती कॅ. मोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालीं देण्यात आली. मी या 'बेगडी' स्वातंत्र्य-फौजेंत सामील होण्याचं साफ नाकारलं! जपानी लोकांचं हें औदार्य प्रामाणिक नसून यांत कांहींतरी बनवाबनवी असल्याचा जबर संशय मला वाटत होता!"

" जपान्यांनीं आमच्या असहायपणाचा फायदा उठविण्यासाठीं खचित हें ढोंग केलं आहे, असं माझं मत होतं. हिंदी जनतेंत जपान्यां विषयीं अनुकूल मत करून घेण्यासाठीं, प्रचार-तंत्रांतील हा एक मतलबी कावा होता अशी माझी ठाम समजूत होती!"

"पासिफिक बेटांनजिक दोस्त सैन्यांशीं लढण्याकरितां कांहीं हिंदी फौज जपान्यांनीं पाठविली असल्याचंहि पुढं आम्हांला समजलं!"

" आझाद हिंद फौज जर केवळ हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं संघटित करण्यांत येत असले तर, जपानच्या हितसंबंधांसाठींच केवळ लढल्या जाणाऱ्या या रणक्षेत्रांतील लढाईंत आझाद हिंद सैनिकाचं रक्त काय म्हणून सांडलं जात आहे, हा सवाल माझ्या मनांत स्पष्ट प्रगट झाला! याचा अर्थ हाच नाहीं काय कीं, जपानी लोकहि स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठींच हत्यारांसारखं आम्हांला वापरूं पहात आहेत?"

" म्हणून आझाद हिंद फौजेंत दाखल होण्यासाठीं मला दुसऱ्यांदा सवाल टाकण्यांत आला त्यावेळींहि, दाखल होण्यास मी नाकबूल झालों, अन् माझ्या रेजिमेंट मधील सैनिकांनाहि तसाच सल्ला दिला!"

नंतर थोडसं स्मित करून शहानवाझ त्या बाईंना पुढं सांगू लागला:- " त्यावेळीं आणखीहि एका संशयाची जबर पकड माझ्या मनावर होती.

मी मुत्सद्दी नसून साधा शिपाई खरा. पण आझाद हिंद फौजेच्या संघटनेचा परिणाम हिंदी जनतेवर कसा होईल, हा प्रश्न माझ्या काळजाला एकसारखा डिवचीत होता! आम्ही हिंदुस्थानांत गेल्यावर जनता आमचं स्वागत करील कीं धिक्कार? या व अन्य संशयांनीं माझं मन त्रस्त झाल्यामुळं आझाद हिंद फौजेच्या संघटनाचे गोत्यांत आपण सापडायचं नाहीं, हा माझा निश्चय कायम! '

" अखेर आझाद हिंद फौजेच्या प्रमुखांनीं मला विनविलं कीं आझाद–हिंद फौजेच्या संघटनेला होत असलेला सर्व विरोध नाहींसा व्हावा यावर जपान्यांचा कटाक्ष असल्यामुळं, निदान मी व्यक्तिशः तरी, आझाद हिंद फौजेंत सामील व्हावं "

" त्यानंतर मात्र माझ्या रेजिमेंट मधील प्रमुखांशीं मी विचार विनिमय केला अन् अखेर अशी तोड काढली कीं, व्यक्तिशः मींच तेवढं प्रथम आझाद हिंद फौजेंत दाखल होऊन सावधपणानं सर्व प्रचीति घ्यावी, अन नंतर मी सल्ला दिला तरच, माझ्या रेजिमेंट मधील बाकीच्यांनीं माझं अनुकरण करावं; तोंपर्यंत करूं नये! "

" मी आझाद फौजेंत दाखल झाल्यावर मला कळून चुकलं कीं, जपान्यांच्या सद्धेतू विषयींच्या माझ्या शंका खऱ्याच होत्या! प्रथम कॅ. मोहनसिंगांना वाटत असे कीं, जपान्यांचा या संघटनेबाबत शुद्ध हेतु आहे. पण पुढं त्यांचे डोळे उघडले व ते विरोधाची चुळबूळ करूं लागले! "

" अखेर बँगकॉक येथें आझाद हिंद फौजेंतील आम्ही कांहीं लोक एकत्र जमून विचार केल्यानंतर ठरविलं कीं, आतां झालं ते झालं,

या आझाद हिंद संघटनेशीं आपण आपला संबंध सोडावयाचा नाहीं, अन् ही संघटना मोडूनहि टाकायची नाहीं, येथेंच ठरल्याप्रमाणं आम्ही या संघटनेमार्फत कांहीं मागण्या जपानी अधिकाऱ्यांकडं केल्या; त्यांनीं अर्थातच त्या नाकारल्या ! ”

“ नंतर आझाद–हिंद–फौजांपुढं एका जपानी लष्करी अधिकाऱ्याचं भाषण झालं. ‘ हम् करेसो कायदा ’ हीच या अधिकाऱ्याची वृत्ति, अन् आम्हांला वागविण्याबाबत तोच त्याचा निर्धारहि दिसला ! कोणीहि विरोध करणारा आवाज काढला तर तो आवाज काढणाऱ्या-च्याहि कानीं तो फिरून पडूं नये, इतकी अक्राळविक्राळ हुकुमशाही या जपानी सेनाधिकाऱ्याचे ठिकाणीं आहे, असें आम्हांला समजलं ! ”

“ या जपानी हुकुमशहाचं भाषण संपल्याबरोबर मी एकदम उभा राहिलों अन् बोलण्यास सुरवात केली ! जळजळीत निखारेच मी त्या हुकुमशहाच्या दमबाजीवर ओतले म्हणाना ! मी त्या अधिकाऱ्याला खणखणीत शब्दांनीं पुढील प्रमाणें बजावलं:—

“ हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-ध्येयाबाबत जपानी जर खरोखरच इतके प्रामाणिक असतील तर, त्यांनीं तसं जगभर जाहीर करावं अन् त्या दृष्टीचे आझाद हिंद फौजेबरोबर ताबडतोब करार-मदारहि करून सोडावे ! आजची परिस्थिति मात्र आझाद-हिंद फौजेच्या संघटनेला आणि वाढीला खचित अनुकूल नाहीं. स्पष्टच नमूद करावायचं म्हणजे जर्मनींत सध्यां असलेले सुभाषचंद्र बोस इथं येऊन आमचे नेताजी बनतील, तरच त्यांच्या नेतृत्वाखालीं आम्ही स्वातंत्र्याचा लढा देऊं. ”

" वास्तविक सुभाषबाबूंना यापूर्वी मी कधीं पाह्यलंहि नव्हतं. त्यांचा धैर्यशाली स्वभाव, त्यांची बुद्धिमत्ता अन् त्यागी वृत्ति याबद्दल मात्र खूप ऐकलं होतं. पूर्व-आशियांत आमचं पुढारीपण पत्करण्याला त्यांच्यासारखा दुसरा पुढारी नाहीं, असं मला वाटलं. "

" मी वरील प्रकारें बोलत असतां मागून माझा कोट ओढून मला खालीं बसण्याची सूचना माझ्या शेजारीं बसलेले दोस्त मला देत होते ! या जपानी हुकूमशहानं नुसती नजरेची खूण केली कीं, माझी गर्दन मारली जाईल याबद्दल माझ्या दोस्तांची खात्री होती ! पण माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला जागून मी स्पष्ट बोलायचं ठरविल्यावर मला मरणाची पर्वा कुठं होती ? अन् असा कोण मायेचा पूत आहे कीं, जो सद्सद्विवेक बुद्धीचा आवाज दाबून टाकूं शकेल ? "

" माझं भाषण संपलं तरी मी ' जिवंत उभा ' असलेला पाहून माझे दोस्तंहि आश्चर्य चकितच झाले ! नंतर तो ' हुकूमशहा ' जपानी सेनानी उठला व बोलला:—

" या तरुण हिंदी जवान वीरानं माझ्यावर जवळ जवळ आगच पाखडली म्हणाना ! माझंहि रक्त प्रथम गरम झालं; पण पुढं लक्षपूर्वक ऐकल्यावर मला समजून चुकलं कीं, हा शिपाई गडी बोलतोय तें अगदीं आंतरिक तळमळीनं बोलत आहे. शिवाय त्याच्या बोलण्यांत खरेपणाहि आहे. हिंदुस्थानला खरोखर अशाच प्रामाणिक सेनानींची गरज आहे ! "

" येवढं बोलूनच तो जपानी हुकूमशहा थांबला नाहीं; तर त्यानं लवून तीनदां मला प्रणाम केला हें ऐकून तुम्हांला खचितच आश्चर्य वाटेल ! "

× × × ×

[ ६ ]

या वेळीं बैठकीच्या खोलींत अंदाजें २० माणसं होतीं व अगदीं शांतता होती. अगदीं फुलाची पाकळी टेबलावरून खालीं पडली तरी तिचा आवाज व्हावा इतकी स्तब्धता होती ! आम्ही शहानवाझची ही हकीगत ऐकण्यांत इतके रंगलों होतों कीं, डोकं खाजविण्याइतकं आम्हाला स्वतःचं भान नव्हतं !

शहानवाझच्या या धैर्याची व धाडसाची हकीगत ऐकून त्यांच्याविषयींचा सर्वांचा आदर विशेषच वाढला. शहानवाझविषयींचा वाढता आदर, प्रेम व कौतुक यांच्याच सुवासानं तो बैठकीचा दिवाणखाना जणुं दरवळून निघाला ! मला वाटलं या सुवासिक सद्गुणांचा ठेवा आपल्या छातींत, फुप्फुसांत, कोटाच्या खिशांत, फार कांय, शरीराच्या रोमरोमांत सांठवून घेऊन तो सर्रास वाटावा ! पण तो कसा, केव्हां अन् कोठें वांटणार ?

शहानवाझ पुढं सांगत होता:—

" नंतर नेताजी पूर्व आशियाच्या या टापूंत आले. मी सांगितलंच कीं त्यांची माझी या पूर्वीं गांठभेट देखील कधींहि नव्हती; त्यांना पाहयलं नव्हतं. 'एक शूर व स्वतंत्र बाण्याचा पुढारी', इतकीच त्यांच्याविषयींची मला माहिती. पण जपान्यांविषयीं त्यांचेंहि धोरण काय राहील याबद्दल मात्र मी साशंकच होतो."

" म्हणून पहिल्याच भेटीपासून नेताजींची एखाद्या गुप्त पोलिसाप्रमाणें पाहणी व चांचणी करण्याचा मी बाणा पत्करला. एखाद्या रोगसंशोधन-शाळेंत सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं रक्ताचा एक थेंब एका

कांचेवर पसरून, संशोधक डॉक्टर त्याचं बारकाईनं निरीक्षण आणि संशोधन करतो, त्याच बाण्यानं, तितक्याच काळजीनं आणि चिकाटीनं मी नेताजींच्या प्रत्येक हालचालीवर आणि आविर्भावावर भेदक नजर राखली. अशा रीतीनं कितीतरी दिवस मी नेताजींची सत्य परीक्षा केली!"

"आणि अखेर माझें आत्यंतिक समाधान झालें कीं, नेताजींच्या कोणत्याहि हालचालींत वा आविर्भावांत गुलामी प्रवृत्तीचा किंवा हीनगंडाचा लवलेशहि नाहीं!"

"कितीहि मोठा जपानी अधिकारी आला तरी त्याच्यापुढें नेताजीनीं मान लवविली नाहीं! ते सदैव शांत आणि धीरगंभीर दिसत. त्यांच्या सरळ जिवणींत दृढ निश्चयाची रेखीव रेषा स्पष्ट होई. त्यांच्या डोळ्यांत सदैव सच्चेपणाचें तेज तळपे. आणि नेताजींच्या कपाळावरील रेषांच्या नांगरटींत मूर्तिमंत श्रद्धेचेंच दर्शन घडे!"

"आणि त्या श्रद्धेचा स्पष्टार्थ कोणता? हिंदुस्थान स्वतंत्र झालाच पाहिजे, हाच तो स्पष्टार्थ! हिंदी लोक शूर शिपाई आहेत, अशीही नेताजींची श्रद्धा. पूर्व आशियांत आपण अशी आझाद हिंद फौज संघटित करूं शकूं कीं, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं या फौजेंतील प्रत्येक सैनिक आपल्या शरीरांतील रक्ताचा थेंबन्‌थेंब खर्ची घालण्यास सदैव सुसज्ज राहील. इतकंच नव्हे तर, कोणत्याहि बाहेरच्या देशांतील सैनिकांच्या मदतीशिवाय आझाद हिंद फौज स्वतःच्या हिंमतीनंच स्वातंत्र्याचं अंतिम ध्येय गांठूं शकेल!"

"माझ्या अंतःकरणांत ज्या या असामान्य सद्‌गुणांची तहानभूक होती ते सर्व सद्‌गुण नेताजींच्या ठिकाणीं आहेत, अशी माझी खूप

तपासणीनंतर खात्री पटल्यावर मात्र माझं सर्वस्व, माझं शरीर व आत्मा नेताजींच्या ध्येय–सिद्धीसाठीं समर्पण करण्याचा मी अखेरचा कृतसंकल्प केला ! नेताजींच्या सारख्या सेनानींच्या निशाणाखालीं आघाडीवर लढण्याइतकं हिंदी वीराला दुसरं भव्य अन् दिव्य असं भाग्यच नाहीं, याची मला सुस्पष्ट जाणीव झाली. त्याचप्रमाणें ब्रिटिश साम्राज्य-वाद्यांच्या बुटांच्या पोलादी टांचाखालीं चिरडल्या जाणाऱ्या ४० कोटी लोकांची गुलामगिरींतून सुटका करण्याइतकं अत्युच्च ध्येय तरी हिंदी वीराला दुसरं कोणतं असूं शकेल ?

× × × ×

[ ७ ]

शहानवाझचं वरील वाक्य पुरं होत असतां मी सभोंवार नजर टाकली. श्रोत्यांपैकीं स्त्रिया भावनावेगानं थरथर कांपत होत्या व त्यांच्या मुठी घट्ट वळल्या होत्या. त्यांच्या डोळ्यांत नव्या आवेशाचे स्फुलिंग तेजाळत होते ! जणुं काय, त्या दिवाणखान्यांतून बाहेर पडून शहानवाझच्या सेनापतित्वाखालीं या वीरांगना आतांच स्वातंत्र्य-संग्रामाच्या आघाडीवरच जाण्यास सुसज्ज झाल्या होत्या ! आपापल्या पतींची अनुज्ञा घेतल्यावांचूनच त्यांना स्वातंत्र्याच्या रण-क्षेत्रांत उड्या घ्यावयाच्या होत्या कां ? आपापल्या तान्हुल्यांना वक्षस्थळाच्या पाळण्यांत झोके देऊन ‘ जो जो ’ करविल्यावांचूनच कां या ललना लाल किल्ल्याच्या रोखानं कूच करणार होत्या ? जणुं यांपैकीं प्रत्येकीला आपण ‘ झांशीची राणी ’ बनल्याप्रमाणं वाटलं असावं ! ‘ हिंदुस्थानांत एकच कॅ. लक्ष्मीची पैदास झालेली नसून ह्या पहा

आम्ही सर्वजणी कॅ. लक्ष्म्याच आहोंत' असं शहानवाझला त्या बजावणार होत्या कां?

माझ्या या माता–भगिनींचा आवेश–त्या क्षणा पुरताच भावनावेश ठीक आहे! पण त्या पवित्र स्थानीं जमलेल्या माझ्या माता-भगिनी खरोखरंच कॅ. लक्ष्मी बनूं शकतील कां? शहानवाझ सारख्यांच्या मनावरील बोजा खरोखरंच त्या कमी करूं शकतील कां? लाल किल्ल्यावर कूच करून जातांना करावं लागणारं 'भयंकर दिव्य' मऊ-गाद्या-गिरद्यांवर लोळणाऱ्या लाहोर शहरांतील या ललनांना कसं काय मानवेल? यांच्या पैकीं एकजण तरी कुतुबमीनारच्या अत्युच्च सज्जावर चढून सभोंवार किलबिल करणाऱ्या पक्षिगणांना म्हणूं शकेल कां 'पांखरा, मार भरारी! भारत माता आतां आझाद झाली-स्वतंत्र बनली!'

वर व्यक्त झालेल्या मनोराज्यावर मी मल्लिनाथी कशाला करूं? दमधरतों, पाहरा जागवितो, अन् पहात राहतों!

\+ \+ \+

[८]

या सद्धेतु-प्रेरित भगिनी-मातांच्या सदरील मनोराज्यावरील मत-दर्शनाची कामगिरी त्यांच्याच सद्सद्विवेकावर सोंपवून शहानवाझ पुढं काय बोलतो तें ऐकूंया!

" आतां तुमच्या अंतःकरणाला आनंददायी अशा एका प्रसंगाचं वर्णन करतों. तात्पुरत्या आझाद हिंद सरकारची स्थापना झाल्यावर जपानी पार्लमेंटच्या एका बैठकीला हजर राहण्याचं निमंत्रण आम्हांला आलं होतं. आझाद हिंद सरकारच्या स्थापनेबद्दल नेताजींचं अभिनंदन करून ज. टोजो त्या प्रसंगीं बोलले:—

" आझाद हिंद फौजेनं हिंदुस्थानला गुलामगिरींतून बंधमुक्त केलें कीं, नेताजीच हिंदुस्थानची राज्यघटना घडवून तिचे प्रमुख होतील ! "

" तुम्हांला आश्चर्य वाटेल कीं, स्वतःविषयींचें ज. टोजोचें वरील विधान कानावर पडल्याबरोबर नेताजींचं रक्त उसळलं ! एकदम उभे राहून नेताजींनीं गर्जना केली;—" मला स्वतंत्र हिंदुस्थानचा प्रमुख नेमण्याचा अधिकार ज. टोजो यांना कोणी दिला ? हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर आपल्याला कोणत्या प्रकारची राज्यघटना हवी अन् राज्याचं प्रमुख कोणी राहावं हें ठरविण्याचा अधिकार व हक्क स्वतंत्र हिंदी प्रजाजनांचाच आहे. माझ्या पुरतंच बोलायचं तर मी म्हणेन कीं हिंदुस्थानचीं राज्यघटना ठरविण्यास अत्यंत समर्थ, अत्यंत सच्चे अन् अत्यंत सर्वमान्य असे कोणी असतील तर ते महात्मा गांधी, पं. नेहरू व मौ. आझाद हेच त्रिमूर्ति होत. मी एक सामान्य सेवक असून हिंदुस्थानांत जें कार्य हे थोर पुढारी करीत आहेत त्याचाच कित्ता अतिपूर्व प्रदेशांत मी गिरवीत आहे. "

" नेताजींची वरील विधानं माझ्या कानांवर पडल्याबरोबर माझ्या शंकाच फिटल्या कीं, नेताजी कधींहि जपान्यांपुढें मान वांकविणार नाहींत कीं कधीं स्वतःला सत्ता मिळण्याच्या लोभानं आपसांत भांडणारहि नाहींत ! असल्या हीन गोष्टी नेताजींच्या हांतून कालत्रयींहि घडणार नाहींत याबद्दल माझी खात्रीच पटून चुकली. "

" नेताजीविषयीं मला जो अमर्याद आदर होता तो ' मी एक सामान्य सेवक ' या त्यांच्या विधानामुळं अवर्णनीय पटींनीं वाढून त्यांच्या विषयींच्या भक्तिप्रेमानं त्या आदराची जागा पटकाविली ! आम्ही ज्याचा पाठपुरावा केलाच पाहिजे असाच हा आमचा नेताजी असल्याबद्दल माझी बालंबाल खात्री पटली ! "

‘ आतां पुष्कळ दिवस मला बोचून राहिलेली एक गोष्ट सांगतो. माझे वडील, मातुश्री परलोकीं गेल्याला पुष्कळच दिवस झाले. आतां मला एकच भाऊ असून त्याच्यावर माझें जिवापलीकडे प्रेम आहे. तो ब्रिटिशांच्या हिंदी लष्करांत असून ब्रम्हदेश-आघाडीवर लढत असल्याचें मला ठाऊक होतं. ‘ हा माझा जिवलग बंधु या लढ्यांत माझ्यासमोर शत्रुपक्षांत खडा राहिला असतां मी काय करीन ? ’ हाच मला बोचून राहिलेला प्रश्न होय! रायफल रोखून त्याला मी ठार करीन कां ? हातघाईच्या लढ्याचे प्रसंगीं तो समोर आला तर त्याच्या छातींत मी संगीन खुपशीन कां ? माझ्या भावाला, एका रक्ताच्या सख्या भावाला, माझ्या एकुलत्या एक भावाला, या माझ्याच हातांनीं मी ठार करीनच कां ? ”

“ वरील सवालानं माझ्या काळजांत नुसतं काहूर माजवून सोडलं ! भावाला ठार करायचा या नुसत्या कल्पनेनंच मला दरदरून घाम सुटे ! त्याच्या छातींत माझी संगीन घुसल्याचा देखावा माझ्या डोळ्यांपुढें येऊन माझ्या धमन्यांतून बाहेर रक्त भळाळल्याचाच मला भास होई ! कांहीं मिनिटें मी हतबुद्ध होऊन माझ्या हातपायांचे दगड धोंडे बनत ! मेणाच्या चित्रासारखा माझा चेहेरा पांढरा फटक पडे आणि शरीर निर्जीव बने ! ”

“ मग नेताजींच्या घोषणा माझ्या कानांवर पडत, ४० कोट हिंदी बांधवांचे आक्रोश कानठळ्या बसवीत स्वातंत्र्याची-खऱ्या जीवनाची-घनगर्जना कानांत शिरे ! आणि नंतर धैर्य एकवटून भावाचा मृत्यु-समयींचा आक्रोश व स्वातंत्र्याची जीवन-घोषणा यांपैकीं कशाची निवड करावी, या बद्दलचा कौल माझ्या अंतःकरणांतील ईश्वर मला देई ! ”

" शेवटीं मृत्यूच्या आक्रोशावर जीवनाच्या घनगर्जनेनेंच विजय मिळविला! मग फक्त जीवनाची गर्जनाच एकसारखी माझ्या कानांत निनादत राहिली. जीवनाचं संगीतच सर्वव्यापी व सर्वशक्तिमान् ठरलं! "

" स्वातंत्र्य-संग्रामांत माझा भाऊ माझ्या विरुद्ध उभा राहिला तर तो माझा भाऊच नव्हे. स्वातंत्र्यसंग्रामाच्या मार्गातील तो एक धोंडच नव्हें कां? अर्थात् स्वातंत्र्याचे ध्येय साध्य करण्यासाठीं करावयाच्या स्वातंत्र्य-संग्रामांत वाटेत जें जें आडवें येईल तें तें कापून काढणें हाच माझा उत्तम धर्म! "

+ + +

[ ९ ]

शहानवाझच्या भाषणानें आतां शिखर गांठलें असल्यामुळं तो आपल्या भाषणाचें भरत वाक्य बोलेल असा माझा अंदाज होता. पण तो कसचा थांबतो! बळकट स्नायु, उत्कृष्ट भावना! शहानवाझ वाढत्या आवेशानं बोलतच राहिलाः—

" नेताजी जर्मनीहून आले त्यावेळीं त्यांनीं आम्हांला सांगितलं कीं, जपानी लोक हिंदी माणसांना साधारणतः तुच्छच लेखतात! अतिपूर्वेंतील हिंदी फौजा या ' पराभूत फौजा ' असल्यामुळं त्या गलित गुण व गलित सत्त्व बनल्या आहेत असं जपान्यांचं मत! "

" वरील इषारा देऊन नेताजी आझाद फौजांना उद्देशून बोलले जपान्यांचं हें उथळ मत आपणहि उथळपणानंच खरं मानायचं? तळहातीं शीर घेऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठीं जिवावर उदार होऊन

अनुक्रम
विभाग
क्र

लढणारे सैनिकच आपल्यांत नाहींत कीं काय ? मातृभूमीच्या इभ्रती-साठीं रणांगणावर प्राणार्पण करणारे हिंदपुत्र आपल्यांत कसे असणार नाहींत ? ” मातृभूमीकरितां रक्ताचा थेंबन्थेंब सांडण्यास जे कोण तयार आहेत त्यांनीं आपले हात वर करावे ! ’

नेताजींच्या या सूचनेबरोबर पन्नास हजार आझाद सैनिकांच्या हातांचे प्रचंड रान एकदम उंचावलें !

“ तो देखावा पाहून सद्‌गदित अंतःकरण होऊन नेताजींच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा वाहूं लागल्या ! आझाद फौजांच्या हाताचं रान तसंच उभं होतं ! आपली निवड व्हावी अन् आघाडीवर कूच करण्यास आपल्याला पहिली संधि लाभावी, अशी तळमळ प्रत्येकाच्या ठिकाणीं स्पष्ट दिसत होती ! ”

“ सर्वांनाच शस्त्रें पुरवून सुसज्ज करण्याइतका पुरवठा आमच्या पुढं नसल्यामुळं, या पन्नास हजारांपैकीं फक्त तीनच हजार नेताजींनीं निवडले आणि ‘ सुभाष ब्रिगेड ’ असं या पलटणीला नांव देऊन तिचं नेतृत्व नेताजींनीं मजकडे दिलं. ”

“ हीच पलटण लढाईच्या आघाडीवर प्रथम गेली अन् शस्त्रें खालीं ठेवण्यांत तिचा क्रम शेवटचा होता ! ”

“ आपल्याजवळ रणगाडे नव्हते अन् वैमानिक संरक्षणहि आम्हांला पुरेसं नव्हतं. इतर शस्त्रास्त्रसाधनंहि फार खालच्या दर्जाची होतीं. तरीहि असल्या अपुऱ्याच साधनांनीं आमच्या आझाद हिंद फौजांनीं रणांगणावर जे पराक्रम गाजविले ते हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्य संग्रामाचे इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नोंदून ठेवण्याइतके उज्ज्वल आहेत ! ‘ आझाद-हिंद ’चें रणगीत गात गात आमचे वीर, शत्रु-फौजेची लांडगे–तोड करीत ! ”

" ब्रह्मदेशच्या जंगलांत आम्हांला पुरवण्यांत अलेली अन्न-रसद फारच अपुरी व कदान्नाची होती. मूठभर भात व ग्लासभर पाण्यावर आझाद फौजांनीं दिवस काढले, भुकेची पर्वाच त्यांना नव्हती! स्वातंत्र्याच्या भुकेनं मात्र आझाद फौजी व्याकुळ झाले होते! दिल्लीच्या लाल किल्ल्यांतच स्वातंत्र्याची ही भूक शमणं शक्य होतं. "

" रणांगणावर हजारों आझाद-हिंद सैनिक जखमी झाले. आघाडी-वरील अव्वल दर्जाच्या इस्पितळांत त्यांना आणण्यासाठीं आमच्याजवळ पुरेशा अँब्युलन्स–गाड्या देखील नव्हत्या. पडल्या जागीं यातना सोसण्यावांचून त्यांना गत्यंतर नव्हतं. जखमांतून रक्त वाहात असतांना अनेकांना ड्रेसिंग करतां आलें नाहीं. जखमा अखेर विषारी बनल्या; जखमांतून किडे वळवळतांना दिसल्याबरोबर अनेकांनीं आपल्या हातांनींच पिस्तुलं आपापल्या काळजांवर ठेवून गोळ्या झाडल्या आणि ' नेताजी नेताजी ' असा नेताजींच्या नांवाचा जप करीत प्राण सोडले! "

\+ + +

[१०]

' नेताजी ' हा शब्द-घोष शहानवाझच्या तोंडून फारच उत्कृष्ट व हृदयभेदक आवाजांत बाहेर पडला! जणुं काय नेताजींची मूर्तिच त्याच्यापुढं उभी होती व जयघोषपूर्वक तो त्या मूर्तीला प्रणाम करीत होता. शहानवाझच्या डोळ्यांतून भावनेच्या पुराचे अश्रु टप् टप् खालीं पडत होते! कांही मिनिटें त्याच्या कंठांतून आवाजहि बाहेर फुटणं कठीण झालं! "

शहानवाझ या वेळीं आझादहिंदफौजेंतील हुतात्म्यांना मानाचा प्रणाम करीत होता. या हुतात्मा वीरांची सोन्यासारखी नांवं जगाला अज्ञातच राहतील! या शूरांच्या अस्थि ब्रह्मदेशाच्या जंगलांत विखुरल्या आहेत. त्यांचं मांस गिधाडांनीं खाऊन फस्त केलं आहे. अन् त्यांची कुटुंब अन्नान्न दशेला लागलीं आहेत.

वाचकहो, हें वाचन आतां पुरे. उठा, आणि या आझाद हिंद-वीरांना नतमस्तकपूर्वक प्रणाम करा.

ज्या भूमीवर या आझादहिंद वीरांनीं प्राणार्पण केलं ती भूमि सकाळ–संध्याकाळीं त्यांच्या आत्मयज्ञाचं मूक संगीत गात असते.

या हुतात्म्यांच्या मृत देहांवर स्मारकाचीं थडगीं नसलीं तरी, पक्षी आपापल्या चोचींतून फुलें आणून, त्यांच्या मृतस्थानांची पूजा भक्तिभाव-पूर्वक बांधीत राहतील !

ज्या वृक्षराजींनीं 'नेताजी' अशा गर्जना या वीरांच्या तोंडून ऐकल्या त्यांचे प्रतिध्वनि वाऱ्यांनीं हालणाऱ्या डाहळयाडाहाळयांतून निघत राहतील!

दूरच्या टेकड्याहि 'नेताजी' या घोषणेचे प्रतिध्वनि परत फेंकून इतर सर्व घोषणांना त्यांत बुजवून टाकतील !

या घोषणांचें पावित्र्य ओळखून आकाशदेखील आपल्या अफाट व अमर्याद पोकळींत या घोषणांना गडप्प न करण्याचीच काळजी वाहील. फार काय, या घोषणांत अमृत–वर्षावाचें नवचैतन्य ओतून टेंकड्या टेंकड्यांतून त्यांचे ध्वनि-प्रतिध्वनि एकसारखें निनादत राहतील!

" ब्रह्मदेशच्या जंगलांत आम्हांला पुरवण्यांत अलेली अन्न-रसद फारच अपुरी व कदान्नाची होती. मूठभर भात व ग्लासभर पाण्यावर आझाद फौजांनीं दिवस काढले, भुकेची पर्वाच त्यांना नव्हती! स्वातंत्र्याच्या भुकेनं मात्र आझाद फौजी व्याकुळ झाले होते! दिल्लीच्या लाल किल्ल्यांतच स्वातंत्र्याची ही भूक शमणं शक्य होतं. "

" रणांगणावर हजारों आझाद-हिंद सैनिक जखमी झाले. आघाडी-वरील अव्वल दर्जाच्या इस्पितळांत त्यांना आणण्यासाठीं आमच्याजवळ पुरेशा अँब्युलन्स–गाड्या देखील नव्हत्या. पडल्या जागीं यातना सोसण्यावांचून त्यांना गत्यंतर नव्हतं. जखमांतून रक्त वाहात असतांना अनेकांना ड्रेसिंग करतां आलें नाहीं. जखमा अखेर विषारी बनल्या; जखमांतून किडे वळवळतांना दिसल्याबरोबर अनेकांनीं आपल्या हातांनींच पिस्तुलं आपापल्या काळजांवर ठेवून गोळ्या झाडल्या आणि ' नेताजी नेताजी ' असा नेताजींच्या नांवाचा जप करीत प्राण सोडले! "

\+ \+ \+

[ १० ]

' नेताजी ' हा शब्द-घोष शहानवाझच्या तोंडून फारच उत्कृष्ट व हृदयभेदक आवाजांत बाहेर पडला! जणुं काय नेताजींची मूर्तिच त्याच्यापुढं उभी होती व जयघोषपूर्वक तो त्या मूर्तीला प्रणाम करीत होता. शहानवाझच्या डोळ्यांतून भावनेच्या पुराचे अश्रु टप् टप् खालीं पडत होते! कांही मिनिटें त्याच्या कंठांतून आवाजहि बाहेर फुटणं कठीण झालं! "

शहानवाझ या वेळीं आझादहिंदफौजेंतील हुतात्म्यांना मानाचा प्रणाम करीत होता. या हुतात्मा वीरांची सोन्यासारखी नांवं जगाला अज्ञातच राहतील! या शूरांच्या अस्थि ब्रह्मदेशाच्या जंगलांत विखुरल्या आहेत. त्यांचं मांस गिधाडांनीं खाऊन फस्त केलं आहे. अन् त्यांची कुटुंब अन्नान्न दशेला लागलीं आहेत.

वाचकहो, हें वाचन आतां पुरे. उठा, आणि या आझाद हिंद-वीरांना नतमस्तकपूर्वक प्रणाम करा.

ज्या भूमीवर या आझादहिंद वीरांनीं प्राणार्पण केलं ती भूमि सकाळ–संध्याकाळीं त्यांच्या आत्मयज्ञाचं मूक संगीत गात असते.

या हुतात्म्यांच्या मृत देहांवर स्मारकाचीं थडगीं नसलीं तरी, पक्षी आपापल्या चोचींतून फुलें आणून, त्यांच्या मृतस्थानांची पूजा भक्तिभाव-पूर्वक बांधीत राहतील!

ज्या वृक्षराजींनीं 'नेताजी' अशा गर्जना या वीरांच्या तोंडून ऐकल्या त्यांचे प्रतिध्वनि वाऱ्यांनीं हालणाऱ्या डाहळयाडाहाळयांतून निघत राहतील!

दूरच्या टेकड्याहि 'नेताजी' या घोषणेचे प्रतिध्वनि परत फेंकून इतर सर्व घोषणांना त्यांत बुजवून टाकतील!

या घोषणांचें पावित्र्य ओळखून आकाशदेखील आपल्या अफाट व अमर्याद पोकळींत या घोषणांना गडप्प न करण्याचीच काळजी वाहील. फार काय, या घोषणांत अमृत–वर्षावाचें नवचैतन्य ओतून टेंकड्या टेंकड्यांतून त्यांचे ध्वनि-प्रतिध्वनि एकसारखें निनादत राहतील!

आम्हांपैकीं मोठ्यांत मोठे ताकदवाले एका दिवशीं मरून जातील; आणि श्रीमंतांतील श्रीमंत एक दिवस अदृश्य होतील. कालांतरानं आमच्या नांवांचा मागमूसहि कुठं उरणार नाहीं. भूतकाळांत—मृतभूत कालांत-आम्ही गडप्प होऊन जाऊं!

पण नेताजींच्या नांवाची सदरील घोषणा अमर होऊन राहील! तिला भूतकाल नाहीं अन् मृत्यूहि नाहीं! या अमर घोषणेचें, वर्तमान काळ आणि जीवन यांच्याशींच सदैव सान्निध्य असेल!

'वर्तमानाचें भविष्य अन् भविष्याचे वर्तमान' असा या घोषणेचा आवाज अमरच राहणार!

**जयहिंद! जयहिंद!! जयहिंद!!!**

REFBK-0007006

अनुक्रम 70607
विभाग वा-वि
क्रमांक 37C
नों. दि. 3/9/14
वा ल्य शाखा

दा. क्र. 6446 6004
शाखा